ब्रिजमोहन हेडा अनुवादित

अनासक्तियोग

महात्मा गांधी यांच्या गुजराथी पुस्तकाचा अनुवाद



लोकव्रत प्रकाशन

महात्मा गांधींनी श्रीमद्भगवदगीतेचा गुजरातीत जो अनुवाद केला होता त्याचा हा मराठीतील अनुवाद

अनासक्तियोग

मो. क. गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

प्रकाशक

सौजन्य: लोकव्रत प्रकाशन, पुणे

अर्पणपत्रिका

गीतेचा अभ्यास **प्रा. डॉ. सुशीला पाटील** यांच्या जीवनाचा अभिन्न भाग झाला होता. अध्ययन-अध्यापनाच्या क्षेत्रातील त्या आदर्श व्यक्ती होत्या. लेखनात मला त्यांचे सुरुवातीपासून मार्गदर्शन होत होते. माझ्या कुटुंबावर त्या निःस्वार्थ प्रेम करत होत्या. साधी राहणी आणि उच्च विचारसरणीचा आदर्श त्यांनी आपल्या जीवनात गिरवला होता. त्यांच्या स्मृतीला हा अनुवाद सादर समर्पित,

ब्रिजमोहन

ऋणनिर्देश

या पुस्तकाचा अनुवाद करण्याचे काम सर्वोदयचे श्री तुलसीदासजी सोमैय्या यांनीच मला सांगितले होते. यामुळेच मला हा अनुवाद करण्याची प्रेरणा मिळाली. याकरिता मी त्यांचा ऋणी आहे.

परंतु गेली ५-६ वर्षे हा अनुवाद तसाच पडून होता.श्री शिरीष कुळकर्णी यांनी तो प्रकाशित करण्याचे मनावर घेतले. यामुळे त्याला प्रकाश दिसत आहे. याकरिता मी त्यांचा ऋणी आहे.

सुप्रिया भारस्वाडकर यांनी माझ्या अनेक चुका दुरुस्त करून तो प्रकाशित होण्याकरिता मदत केली याकरिता मी त्यांचा ऋणी आहे.

ब्रिजमोहन हेडा

प्रस्तावना

फारसे शिक्षण न झालेल्या सर्वसामान्य गुजराती माणसाला गीतेचा संदेश कळावा म्हणून अनासक्तियोग हा गीतेचा अनुवाद गांधीजींनी केला होता आणि याची प्रस्तावना आणि टिपणेही प्रामुख्याने याच दृष्टीने लिहिली होती. त्याचबरोबर हे पुस्तक भारतातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावे आणि त्यांच्या आवाक्यात याची किंमत असावी अशीही त्यांची इच्छा होती. यामुळे हे पुस्तक शक्य तितके लहान असावे अशीही त्यांची इच्छा होती.

मूळ श्रीभग्वद्गीता केव्हा लिहिली आणि गीतेशी संबंधित अशाच इतर अनेक प्रश्नांची चर्चा गांधीजींनी इथे प्रयत्नपूर्वक टाळली आहे की ज्यामुळे सर्वसामान्य माणसाकरिता हे लहानसे पुस्तक कठीण झाले असते. या पुस्तकाकडे या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. ही याची सीमाही आहे आणि हा याचा गुणही आहे. यामुळेच त्यांनी गीतेचे मूळ श्लोकही यात टाकले नव्हते. परंतु काही विचक्षण वाचकांना मुळात काय होते हे पाहण्याची इच्छा झाल्यास ते पाहता यावे म्हणून मी यात मूळ संस्कृत श्लोकही टाकले आहेत.

गांधीजींचा दृढविश्वास होता की कृष्ण आपल्या सर्वांमध्ये आहे. आपल्या अंतःकरणातील वासना आणि अहंकार या गोष्टी दूर झाल्या आणि भौतिक गौष्टींमागे पळणे आपण बंद केले तर आपण आपल्या अंतरीच्या कृष्णाच्या प्रभावाखाली काम करू शकतो. आपले म्हणणे तो तेव्हाच ऐकेल जेव्हा आपण एकमेव त्याचा आश्रय घेऊ.

कृष्ण ऐतिहासिक व्यक्ती आहे की नाही हा प्रश्न गांधीजींकरिता गौण होता. गीतेत आलेला कृष्ण जेव्हा प्रथम पुरुषी भाषेत बोलतो तेव्हा तो वैयक्तिक कृष्ण नसतो तर तो अर्जुन आणि आपल्या सर्वांच्या अंतःकरणात असलेला कृष्ण असतो. गीतेत बोलणारा कृष्ण ईश्वराच्या, परमेश्वराच्या, सर्वोच्च ब्रह्माच्या नावाने बोलणारा कृष्ण आहे.

श्वेताश्वतर उपनिषदात शिव अथवा रुद्राचे जे वर्णन केले आहे ते काहीसे असे आहे -

एकच ईश्वर दडला आहे आपणा सर्वांमध्ये

जे काही अस्तित्वात आहे ते व्यापलेले आहे त्याने

जे काही करतो आपण त्यावर लक्ष असते त्याचे

असतो तो साक्षी जो काही आपण विचार करतो त्याचे

तो आहे गुणातीत.

अकर्ता असूनही नियंत्रित करत असतो तो सर्वांना

एकाच बिजाचे करतो तो रूपांतर अनेक वृक्षात.

ज्या सुज्ञ लोकांना आकळते हे सर्व

केवळ त्यांनाच मिळत असते आनंदाचे निधान.

गीतेत कृष्णाचे वर्णनही असेच काहीसे आहे. तो आत्मा आहे, परमात्मा आहे, पुरुषोत्तम आहे. कृष्णाचे एक नाव वसुदेवही आहे. वसुदेव म्हणजे ज्याचे घर सर्वांच्या आत्म्यात आहे तो असे महाभारतकार व्यास म्हणतात.

या आपल्या आत्म्यात वसलेल्या ईश्वराची जेव्हा आपण अनन्य भक्ती करतो तेव्हाच आपण खरे भक्त होतो. ही भक्ती एक विशिष्ट कृष्णाची नसून आपल्या अंतःकरणात वसलेल्या ईश्वराची आहे.

हे करू की ते करू; हे योग्य योग्य की ते योग्य असा प्रश्न आपल्याला अनेकदा पडत असतो. त्या वेळी अंतःकरणारात वादळ निर्माण होत असते. ते वादळ शमवण्याकरिता आपल्याला आपल्या अंतःकरणारतील श्रीकृष्णाकडे धाव घ्यावी लागत असते. पण आपला आत्मा याचे उत्तर तेव्हाच देईल जेव्हा आपण निस्वार्थ भावनेने कर्म करत असू, कर्तव्य म्हणून कर्तव्य करत असू.

कर्तव्य आपल्या हाती असते, फळ नसते. त्यात अनेक व्यवधान असतात, अडथळे असतात. कप आणि ओठ यात फार मोठे अंतर असते अशा अर्थाची इंग्रजीत एक म्हण आहे. अनेकांना वाटते की फलाशा असल्याशिवाय आपल्याला कर्तव्याकरिता प्रेरणा मिळू शकत नाही. पण आपण कलेकरिता कला हा सिद्धांत मान्य करतो. वास्तवात कर्तव्याकरिता कर्तव्याचा आनंद हा अधिक टिकाऊ असतो असा माझा अनुभव आहे.

फलाशा न ठेवता कर्तव्य करण्याचा संदेश गीता देते. गाधीजींना हाच संदेश अनासक्तीयोगमधून आपल्याला समजून सांगायचा आहे.

गांधीजींनी अनवाद केलेल्या या पुस्तकामुळे आपल्याला जशी गीता समजून घ्यायला मदत होते तशीच गांधीजींना समजून घेण्याकरिताही मदत होते. कोणत्याही अमर कृतीत काही शब्द प्रसरणशील असतात. त्यांचे वर्णन महाशब्द म्हणूनही करण्यात येते. हे शब्द कांद्याप्रमाणे असतात. कांद्याचा एक वलय काढला तरी कांदा जसा पूर्ण असतो तसे. त्यांच्या अर्थाचा एक वरवरचा पापुद्रा काढला तरी तो अर्थ पूर्ण असतो. त्या शब्दांचे अर्थ प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळे गवसतात आणि ती व्यक्ती त्यातून कोणता अर्थ स्वीकारते यावरून त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे आकलन थोडे अधिक चांगल्या प्रकारे करता येते.

अजून एक. गांधीजींचे विचार सतत विकसनशील राहिलेले आहेत. यामुळे या पुस्तकाच्या अनुवादानंतर त्यांच्या विचारात जे बदल झाले ते या पुस्तकात आढळतीलच असे नाही.

ब्रिजमोहन हेडा

सॅन होजे

२५ सप्टेंबर २०२०

(brijmohanheda@gmail. com)

अधिकृत आवृत्ती

श्रीमद्भग्वद्गीतेचा हा अनुवाद करण्याकरिता गांधीजींनी गीतेच्या शिकवणुकीनुसार जीवन जगण्याच्या आपल्या अखंड आणि उत्कट साधनेतून मोठ्या मुश्किलीने वेळ काढला होता. सुरुवातीसुरुवातीला आपल्या प्रवासादरम्यान गांधीजी दररोज एकाच श्लोकाचा अनुवाद करू शकत असत. परंतु तेवढे काम ते नियमितपणे करायचे. पुढेपुढे ते दररोज दोनदोन वा तीनतीन श्लोकांचाही अनुवाद करू लागले होते. असे करतकरत हिमालयातील कोसानी या ठिकाणी गांधीजींनी २४ जून १९२९ रोजी हा अनुवाद पूर्ण केला आणि तो राजकीय आंदोलनाच्या गोंधळलेल्या वातावरणात घाईगडबडीने प्रकाशित झाला.

अंतःकरणात कोरले जाईल असे अनासक्तियोग हे नाव गांधीजींनी या अनुवादाला दिले.

दांडीयात्रा सुरू करण्याच्या दिवशीच म्हणजे १२ मार्च १९३०ला हा अनुवाद प्रकाशित झाला होता आणि गांधीजी आणि त्यांचे ८० सहकारी दांडी यात्रेकरिता कूच करण्याकरिता बाहेर पाऊल टाकणार तोच या अनुवादाच्या प्रती गांधीजी आणि त्यांचे सहकारी याच्या हाती पडल्या होत्या.

या अनुवादाबरोबरच गीतेचे मूळ श्लोक द्यावे की देऊ नये यासंबंधीही त्या वेळी खूप चर्चा झाली होती. आपल्या अनुवादाबरोबर गीतेचे मूळ श्लोक देण्याची गांधीजींची इच्छा नव्हती. लोकांजवळ घरोघरी गीतेच्या संस्कृत श्लोकाची प्रत असल्यामुळे वाचकांवर परत गीतेच्या श्लोकांचा खर्च लादणे उचित नाही असे गांधीजींचे मत होते. हा वाद जेव्हा जोर पकडू लागला तेव्हा गांधीजींनी आपले म्हणणे आमच्यासमोर स्पष्ट शब्दांत मांडले. ते म्हणाले, "'अनासक्तीयोग' हा गीतेचा प्रामाणिक अनुवाद असला तरी यात आपणा आश्रमवासीयांचे जीवनदर्शनही आले आहे. यामुळे भविष्यात या ग्रंथाचा उपयोग गीतेचा प्रामाणिक अनुवाद म्हणून तर होईलच शिवाय स्वतंत्र विवेचक ग्रंथ म्हणूनही याचा उपयोग होईल." उदाहरण देत गांधीजी म्हणाले की इंग्रजीत बायबलचा जो अधिकृत अनुवाद झाला आहे त्यालाच इंग्लंडचे लोक आपले अधिकृत बायबल मानतात. मूळ हिंब्रू वा ग्रीक बायबलकडे ते वळत नाहीत. त्याचा आधार घेत नाहीत.

यावर गांधीजी म्हणाले, "'अनासक्तियोग' हा गीतेचा माझा अनुवाद थोडा घाईगडबडीत झाला आहे. भाषा वगैरेच्या दृष्टीने त्यावर अजून थोडा हात फिरवणे आवश्यक आहे. **त्यानंतर त्यात कोणतेही परिवर्तन होणार नाही असा आग्रह आपण धरला पाहिजे.**" इंग्रजी बायबलचे उदाहरण परत देत ते म्हणाले, "त्या अधिकृत बायबलच्या शैलीचाही इंग्रजी भाषेवर फार परिणाम झाला आहे."

अनासक्तियोगवर परत हात फिरवण्याची इच्छा असूनही तसे करणे गांधीजींना शक्य झाले नाही. अखेरीस नवजीवनच्या जीवनजी देसाईंचे मला पत्र आले. त्यात लिहिले होते, "पूज्य बापूंच्या उपवासापूर्वी मी दिल्लीला गेलो होतो. त्या वेळी 'अनासक्तियोगसंबंधी' त्यांच्याशी माझी चर्चा झाली होती. श्री किशोरीलालभाईंनी भाषेच्या दृष्टीने त्यात जी सुधारणा केली होती ती सुधारित प्रत श्री महादेवभाईंच्या संग्रहात मिळाली होती. गांधीजींच्या अवलोकनार्थ मी ती प्रत पाठवली होती. आता हे काम करण्याकरिता त्यांना वेळ मिळणे शक्य नसल्यामुळे ही जबाबदारी त्यांनी तुमच्यावर सोपवली आहे. अगदी सुरुवातीला हा अनुवाद जेव्हा प्रकाशित झाला तेव्हा तुम्ही त्यावर बरेच श्रम घेतले होते. आता बापूजींनी सांगितले आहे की 'ही प्रत काकासाहेबांना सोपवा आणि ते या अनुवादाला जे काही रूप देतील त्याचा स्वीकार करून तोच या अनुवादाचा अंतिम तर्जुमा आहे असे समजण्यात यावे आणि तशाच स्वरूपात तो अनुवाद प्रकाशित करण्यात यावा.' यामुळे यथावकाश ही प्रत पाहून त्यात आवश्यक त्या सुधारणा करून आपण ती माझ्याकडे पाठवावी. त्यानंतर या पुस्तकाची नवीन आवृत्ती प्रकाशित करता येईल."

पुज्य बापूजींशी माझी अखेरची भेट ८ आणि ९ जानेवारीला झाली होती. त्यानंतर त्यांची वरील आज्ञा मला कळली. बापूजींचा तो सर्वात मोठा कृपाप्रसाद आहे असे समजून ती जबाबदारी मी माझ्या शिरावर घेतली आणि कामाला लागलो. स्वर्गीय महादेवभाई यांनी 'अनासक्तियोग'चा केलेला इंग्रजी अनुवाद, किशोरीलाल भाईंनी केलेल्या सविस्तर सूचना आणि विनोबा भावे यांची 'गीताई' या संपूर्ण साहित्यानिशी आणि वर्षांपूर्वी पूज्य बापूजींशी गीतेच्या प्रत्येक महत्त्वाच्या

श्लोकासंबंधी माझी जी चर्चा झाली होती त्याच्या आठवणी शक्त तितक्या ताज्या करून भक्तिभावपूर्वक नम्रपणाने अनासक्तियोगच्या संपादनाचे काम मी पूर्ण केले आहे.

यासंबंधी काही किरकोळ गोष्टींचे स्पष्टीकरण मी इथे करू इच्छितो.

अनासक्तियोगच्या या आवृत्तीत विषयानुसार ५६ अधिकरण करण्यात आले आहेत. गीतेच्या मूळ १८ अध्यायांच्या रचनेत कोणत्याही प्रकारचा फेरफार न करता हे अधिकरण करता येणे शक्य झाले आहे.

'लोकसंग्रह' या शब्दाचा सर्वसाधारण लोक सामान्यपणे असा अर्थ करत असतात - 'जनमत राखण्याकरिता आणि लोकांना दुखवण्याऐवजी खुश करण्याकरिता चुकीच्या जनभावना आणि अपसमजांना मान्यता देऊन त्यांचे अज्ञान कायम ठेवण्याचा प्रयत्न करणे.' हा प्रचलित अर्थ चुकीचा आहे हे दाखवण्याकरिता शंकराचार्यांनी दिलेला 'लोकसंग्रह' या शब्दाचा जो बरोबर अर्थ आहे तो मी एका टिपेत जोडला आहे.

ही आवृत्ती प्रकाशित करण्याच्या वेळी (जून १९६०) गांधीजींच्या 'गीताबोध'मधील दोनतीन वाक्ये जोडण्याची सूट मी घेतली आहे. या वाक्यांमुळे गांधीजींच्या भावना अधिक स्पष्ट झाल्या आहेत.

चौथ्या अध्यायात १८व्या श्लोकाखाली देण्यात आलेल्या टिपेचा नेमका अर्थ मला पूर्णपणे कळू शकलेला नाही. "जो अकर्ता आत्मा स्वतःला कर्ता समजतो त्याला जणू काय पक्षाघात झालेला असतो. . ." इत्यादी जे काही तिथे लिहिण्यात आले आहे त्याचा अर्थ मला पूर्णपणे कळू शकलेला नाही. महादेवभाईंनी आपल्या इंग्रजी अनुवादात हा भाग सोडूनच दिलेला आहे. मी मात्र तो भाग तसाच राहू दिलेला आहे.

२

उपनिषद, ब्रह्मसूत्र आणि गीता या तिन्हींचा समन्वय करून या प्रस्थानत्रयीच्या सारातून एकाच तत्त्वज्ञानाचे जी व्यक्ती दर्शन घडवते तिला भारतीय दर्शनपरंपरेत आचार्य समजण्यात येते आणि तिचेच म्हणणे ऐकले आणि मान्य केले जाते.

याचे कारण असे आहे - उपनिषदच्या ऋषींनी उत्कट साधनामय जीवन जगून त्यातून ज्या तत्त्वज्ञानाचा शोध घेतला तो मुळात त्यांच्या अनुभवावर आधारित आहे. यामुळे त्या ऋषींनी वेगवेगळ्या प्रकारे आपले म्हणणे मांडलेले असले तरी त्याचा सार बहुधा एकच असू शकतो.

या उपनिषदांमधील आर्ष वचनांमधून निघणाऱ्या निष्कर्षाच्या स्वरूपातील तत्त्वज्ञानाला म्हणजेच वेदांत दर्शनाला जन्म देण्याचे कार्य ब्रह्मसूत्रांनी केले आहे.

आणि अखेरीस उपनिषदातील याच वचनांच्या आधारे आणि ब्रह्मवाचक सूत्रांच्या मदतीने गीतेने जीवन जगण्याची सर्वोच्च कला प्रस्तुत केली आहे. अशा प्रकारे सर्व उपनिषदांचे दोहन करून निघालेले गीतारूपी उपनिषदाचे हे पायस भगवान श्रीकृष्णांनी गायीले आहे. यामुळे यात संपूर्ण ब्रह्मविद्यासुद्धा आली आहे. आणि त्या ब्रह्मविद्येच्या आधारे जीवन घडवण्याकरिता माणसाने कसा व्यवहार केला पाहिजे याची गुरुकिल्ली सांगणारे योगशास्त्रही या गीतेत आले आहे. या योगशास्त्राचे आणि ब्रह्मविद्येचे अनेक पैलू समजावे म्हणून महर्षी व्यासांनी हे संपूर्ण विवेचन गीतेत प्रश्नोत्तराच्या रूपात - संवादाच्या रूपात केले आहे. यात अर्जुन कर्मवीर भक्त आहे आणि स्वतः श्रीकृष्ण ज्ञानमूर्ती योगेश्वर.

त्या योगेश्वर श्रीकृष्णाच्या उपदेशाचा अर्थ सत्यधर्मी कर्मवीर गांधीजींनी आपल्या पारमार्थिक जीवनाच्या आधारावर आपल्या भाषेत (गुजरातीत) लावला आहे. यामुळे या अर्थामध्ये जीवनवीर गांधीजींची जीवनदृष्टी प्रतिबिंबित झाली आहे. यामागे अनुभवाचा आधार असल्यामुळे ही गोष्ट स्वयंप्रमाण झाली आहे. वाचकांनी या अर्थाकडे याच दृष्टीने पाहिले पाहिजे. गांधीजींच्या त्या वेळेच्या शब्दांत सांगायचे तर -

या अनुवादामागे गत ३८ वर्षांच्या आचरणाचा माझा दावा आहे. यामुळे ज्या गुजराती स्त्रीपुरुषांना आपल्या आचरणाचा आधार धर्म असावा असे वाटत असेल त्या सर्वांनी हा अनुवाद वाचला पाहिजे, त्यावर विचार केला पाहिजे आणि त्यातून शक्ती प्राप्त करून घेतली पाहिजे.

दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर

मुंबई, ६ जून १९४९

प्रस्तावना

१

स्वामी आनंद आणि इतर मित्रांच्या प्रेमाने अंकित होऊन मी सत्याच्या प्रयोगाच्या सीमेपर्यंत आत्मकथा लिहिण्याला सुरुवात केली होती. त्याचप्रमाणे या मित्रांच्या आग्रहाने मी गीताजींचा अनुवाद करायलाही सुरुवात केली होती. असहकार आंदोलनाच्या दरम्यान स्वामी आनंद मला म्हणाले होते, “तुम्ही गीतेचा जो अर्थ लावला तो आम्हाला तेव्हाच कळू शकेल जेव्हा तुम्ही संपूर्ण गीतेचा अनुवाद कराल आणि आम्ही तो अनुवाद सुरुवातीपासून तर शेवटपर्यंत वाचू. इतस्ततः विखुरलेल्या श्लोकांमधून तुम्ही अहिंसेचा जो अर्थ लावता तो आम्हाला कळू शकत नाही. हे बरोबर नाही.” त्यांच्या या म्हणण्यात तथ्य असल्याचे माझ्या लक्षात आले. मी म्हणालो, “सवड मिळताच मी हे काम करीन.” त्यानंतर मी तुरुंगात गेलो. तिथे मी गीतेचा अजून काहीसा अभ्यास करू शकलो. लोकमान्य टिळकांचे ज्ञानभांडार (गीतारहस्य) मी वाचले. त्यांनी त्याआधी “गीतारहस्य”ची मूळ मराठी प्रत पाठवली होती आणि त्याचबरोबर गुजराती आणि हिंदी प्रतीही प्रेमपूर्वक पाठवल्या होत्या आणि तुम्हाला मराठी वाचता येत नसेल तर गुजराती अवश्य वाचा असे लिहिले होते.

तुरुंगाबाहेर मला वाचणे शक्य झाले नाही, परंतु तुरुंगात मी गुजराती अनुवाद वाचला. हा अनुवाद वाचल्यानंतर मला गीतेवरील इतर साहित्य वाचण्याची इच्छा झाली. आणि मग मी गीतेशी संबंधित अनेक पुस्तके वाचली.

एडविन अर्नोल्ड यांच्या गीतेच्या पद्य अनुवादाद्वारे (सॉंग सेलेस्टियल - कालेलकर) १८८८-८९ साली माझी गीतेशी पहिली ओळख झाली होती. त्यानंतर गीतेचा गुजराती अनुवाद वाचण्याची मला तीव्र इच्छा झाली आणि गीतेचे मला जितके अनुवाद मिळाले तितके मी वाचून काढले.

परंतु अशा वाचनाच्या बळावर गीतेचा माझा स्वतःचा अनुवाद जनतेसमोर ठेवण्याचा अधिकार मला मिळत नाही. शिवाय माझे संस्कृतचे ज्ञान अतिशय अल्प आहे. गुजरातीचे ज्ञानही विद्वानांना शोभावे असे नाही. असे असताना गीतेचा अनुवाद करण्याचे धार्ष्ट्य मी का केले?

गीता मला जशी कळली त्याप्रमाणे आचरण करण्याचा माझा आणि माझ्या काही सहकाऱ्यांचा प्रयत्न राहिला आहे. आमच्याकरिता गीता आध्यात्मिक निदानग्रंथ (गोंधळलेल्या अवस्थेतून मार्ग दाखवणारे शास्त्र - कालेलकर) आहे. गीतेनुसार आचरण करण्यात आम्हाला दररोज अपयश येते. आणि प्रयत्न केल्यानंतरही हे अपयश येते. या अपयशातून आम्हाला यशाच्या उगवत्या किरणांचे दर्शन मात्र होते. आम्ही काही थोडेसे लोक गीतेनुसार आचरण करण्याचा जो प्रयत्न करत आहो व त्यातून जो अर्थ आम्हाला उमगतो तोच या अनुवादातून सांगण्यात आला आहे.

याशिवाय ज्यांना फार कमी अक्षरज्ञान आहे अशा स्त्रिया, वैश्य, शुद्र् अशासारखे लोक, ज्यांच्याजवळ मूळ संस्कृत गीता समजून घेण्याकरिता वेळ नाही, इच्छा नाही परंतु ज्यांना गीतेसारख्या ग्रंथाच्या मदतीची आवश्यकता आहे अशा लोकांकरिताही या अनुवादाची कल्पना करण्यात आली आहे.

गुजराती भाषेचे माझे ज्ञान अतिशय अल्प असले तरी त्या ज्ञानाच्या मदतीने माझ्याजवळ जे काही भांडवल आहे ते सर्व गुजराती लोकांना देण्याची मला नेहमीच उत्कंठा लागलेली असते. आज घाणेरड्या आणि अश्लील साहित्याचा प्रवाह वेगात वाहू लागला आहे अशा या काळात हिंदू धर्मात जो अद्वितीय ग्रंथ आहे असे समजण्यात येते त्याचा साध्या भाषेत केलेला अनुवाद गुजराती जनतेला मिळावा आणि तो वाचून अश्लील साहित्याच्या त्या घाणेरड्या प्रवाहाला विरोध करण्याची शक्ती त्यांना व्हावी

या इच्छेमागे गुजरातीतील गीतेच्या इतर अनुवादांची अवगणना करण्याचा हेतू नाही. त्या सर्वांचे आपापले स्थान असू शकते. परंतु त्या अनुवादामागे आचरण करण्याचा दावा असल्याची मला कल्पना नाही. या अनुवादामागे गत ३८ वर्षांचा अनुभव असल्याचा माझा दावा आहे.

यामुळेच ज्या गुजराती स्त्रीपुरुषांना धार्मिक आचरणाच्या क्षेत्रात उतरण्याची इच्छा असेल त्यांनी हा अनुवाद वाचावा, त्यावर विचार करावा व त्यातून शक्ती प्राप्त करून घ्यावी.

या अनुवादामागे माझ्या सहकाऱ्यांची मेहनत आहे. माझे संस्कृतचे ज्ञान अर्धवट असल्यामुळे शब्दांच्या नेमक्या अर्थाबद्दल मी आश्वस्त असू शकत नाही. यामुळे हा अनुवाद विनोबा, काका कालेलकर आणि किशोरीलाल मश्रूवाला यांनी पाहिलेला आहे.

२

आता गीतेच्या अर्थावर येतो. सन १८८८ - ८९ मध्ये गीतेची माझी पहिली डोळाभेट झाली असतानाच मला वाटू लागले होते की गीता हा ऐतिहासिक ग्रंथ नाही तर हिच्यात भौतिक युद्धाच्या निमित्ताने माणसाच्या हृदयात सतत सुरू असलेल्या द्वंद्वयुद्धाचे वर्णन करण्यात आले आहे. मानव योद्धाची रचना द्वंद्वयुद्धाचे वर्णन रसपूर्ण होण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. धर्माचे आणि गीतेचे विशेष चिंतनमनन केल्यानंतर तर मनात स्फुरलेला हा विचार अजूनच दृढावला. महाभारत वाचल्यानंतर या चिंतनाला अजूनच बळकटी आली. महाभारत हा ग्रंथ आधुनिक अर्थाने ऐतिहासिक ग्रंथ आहे अशी माझी मान्यता नाही. याचे पक्के पुरावे आदिपर्वात आहेत. पात्रांच्या अमानुषी आणि अतिमानवी उत्पत्तीचे वर्णन करून भगवान व्यासांनी राजा आणि प्रजेचा इतिहास पुसून टाकला आहे. महाभारतात वर्णन केलेल्या पात्रांचे मुळात ऐतिहासिक अस्तित्व असू शकेल. परंतु महाभारतात त्यांचा उपयोग धर्मदर्शनार्थच केलेला आहे.

महाभारतकारांनी भौतिक युद्धाची आवश्यकता सिद्ध केलेली नसून त्यांनी त्याचे वैय्यर्थ सिद्ध केले आहे. विजयी लोकांना त्यांनी रडायला लावले आहे. दु:खाशिवाय त्यांनी त्यांच्या जीवनात काहीही शिल्लक राहू दिलेले नाही.

या महान महाभारत ग्रंथात गीता सर्वोच्च स्थानावर विराजमान झालेली आहे. तिच्या दुसऱ्या अध्यायातून भौतिक युद्धाचे शिक्षण देण्याऐवजी स्थितप्रज्ञाच्या गुणांची शिकवण देण्यात आली आहे. सामाजिक युद्धाशी स्थितप्रज्ञाचे कोणतेही संबंध असू शकत नाहीत ही गोष्ट

स्थितप्रज्ञाच्या लक्षणातच अंतर्भूत असल्याचे मला जाणवू लागले. कौटुंबिक भांडणासारख्या क्षुद्र गोष्टीच्या वर्णनाकरिता गीतेसारख्या महान ग्रंथाची रचना होऊ शकत नाही.

गीतेतील कृष्णाला मूर्तीमंत शुद्ध ज्ञान आहे. परंतु तो काल्पनिक आहे. कृष्णासारख्या अवतारी पुरुषाचा निषेध करण्याचा माझा इथे हेतू नाही. मला केवळ इतकेच सांगायचे आहे की संपूर्ण कृष्ण काल्पनिक आहे. त्याच्याबद्दलची पूर्णावताराची कल्पना नंतरची आहे.

अवताराचा अर्थ आहे शरीरधारी विशिष्ट पुरुष, जीवमात्र ईश्वराचे अवतार आहेत, परंतु लौकिक भाषेत या सर्वांचा उल्लेख आपण अवतार म्हणून करत नाही. जो पुरुष आपल्या काळात सर्वात धार्मिक असतो, त्याची भविष्यात लोक अवतारी पुरुष म्हणून पूजा करू लागतात. यात काही चूक आहे असे मला वाटत नाही. यामुळे ईश्वराच्या महत्तेला ना काही डाग लागतो ना सत्याला काही धक्का लागतो. "माणूस देव नाही, परंतु देवाच्या रूपापासून वेगळा नाही". ज्या पुरुषामध्ये आपल्या काळात सर्वात जास्त धर्मजागृती झालेली असते त्याला विशेषावतार मानण्यात येत असते. या विचारसरणीप्रमाणे आज हिंदू धर्मात कृष्णरूपी संपूर्णावताराला सम्राटाचे पद मिळालेले आहे.

अवतारावरील ही श्रद्धा माणसाच्या अंतिम अभिलाषेची सूचक आहे. ईश्वररूप प्राप्त केल्याशिवाय माणसाला सुख मिळू शकत नाही, शांततेचा अनुभव येऊ शकत नाही. ईश्वरूपी बनण्याकरिता करण्यात येणाऱ्या प्रयत्नांचे नावच खरे आणि एकमेव पुरुषार्थ आहे आणि तेच आत्मदर्शन आहे. सर्व धर्मांचा विषय ज्याप्रमाणे हे आत्मदर्शन आहे त्याचप्रमाणे गीतेचाही हा विषय आहे. परंतु गीताकारांनी या विषयाचे प्रतिपादन करण्याकरिता गीतेची रचना केलेली नाही. आत्मार्थीला आत्मदर्शन होण्याचा अद्वितीय मार्ग, उपाय सांगणे हा गीतेचा उद्देश आहे. जी गोष्ट हिंदू धर्मात इतस्ततः विखुरलेली आढळते ती गोष्ट गीतेत पुनरुक्तीचा दोष पत्करूनसुद्धा वेगवेगळ्या रूपाने आणि पद्धतीने सिद्ध करण्यात आली आहे.

हा अद्वितीय उपाय आहे कर्मफलाचा त्याग.

याच विषयाच्या अवतीभवती गीतेतील संपूर्ण विषयाची मांडणी करण्यात आलेली आहे. भक्ती, ज्ञान इत्यादींनी या केंद्रबिंदूसभोवती तारामंडळाच्या रूपात आपापले स्थान ग्रहण केले आहे. जिथे देह आहे तिथे अपरिहार्यपणे कर्म आहेच. कर्मापासून कोणताही माणूस मुक्त नाही. असे असले तरी सर्व धर्मांमध्ये प्रतिपादन करण्यात आले आहे की या देहाला ईश्वराचे मंदिर बनवल्यामुळे कर्मापासून मुक्ती मिळू शकते. परंतु प्रत्येक कर्मामध्ये काही ना काही दोष हा असतोच, आणि मुक्ती तर केवळ निर्दोष माणसालाच मिळू शकते. असे असताना कर्मबंधनापासून म्हणजे कर्माच्या दोषांपासून माणसाला कशा प्रकारे मुक्ती मिळू शकेल? या प्रश्नाचे उत्तर गीतेत निश्चित स्वरूपात सांगितलेले आहे. तो असा आहे - “निष्काम कर्म करून, यज्ञार्थ कर्म करून, कर्मफलाचा त्याग करून सर्व कर्म ईश्वरार्पण करून म्हणजेच मन, वाचा, आणि काया यांना ईश्वराला होमणे, समर्पित करणे.”

परंतु ‘निष्कामता’, ‘कर्मफलाचा त्याग’ या शब्दांचा केवळ उच्चार केल्यामुळे या गोष्टीची सिद्धी प्राप्त होऊ शकत नाही. हा केवळ बौद्धिक प्रयोगाचा विषय नाही. हृदयमंथनानेच ही गोष्ट साध्य होऊ शकते. त्यागाची ही शक्ती प्राप्त करण्याकरिता ज्ञानाची आवश्यकता असते. एका प्रकारचे ज्ञान तर अनेक पंडितांजवळ असते. वेद इत्यादी त्यांना तोंडपाठ असतात. परंतु त्यांच्यातील बहुतेक भोगादीत ओतप्रोत झालेले असतात. ज्ञानाच्या आधिक्याने, पांडित्याने शुष्क रूप धारण करू नये म्हणून गीताकारांनी गीतेत ज्ञानाबरोबर भक्तीचा समावेश केलेला आहे आणि तिला पहिले स्थान दिले आहे. भक्तिविरहित ज्ञान विकृत रूप धारण करू शकते. यामुळेच ते म्हणतात की “भक्ती केली तर ज्ञान आपोआपच प्राप्त होईल”. परंतु भक्ती तर ‘शिराचा सौदा’ करण्यासारखे आहे. यामुळे गीताकारांनी भक्ताचे गुण स्थितप्रज्ञाच्या गुणांसारखेच असतात असे सांगितले आहे.

यामुळे गीतेतील भक्ती वेडगळपणाचीही नाही आणि अंधश्रद्धाही नाही. गीतेत सांगितलेल्या भक्तीचा बाह्य कृत्य अथवा काम यांच्याशी किमान संबंध आहे. माळ, टिळा, अर्घ्य इत्यादी साधनांचा भक्त जरी उपयोग करत असला तरी या भक्तीच्या खुणा नाहीत. जो कुणाचाही

द्वेष करत नाही, जो करुणासागर आहे, जो अहंकार आणि ममता यांपासून मुक्त आहे, ज्याच्याकरिता सुखदु:ख, उकाडाथंडी समान आहेत, जो क्षमाशील आहे, जो सदा संतुष्ट असतो, ज्याचा निर्धार कधीही ढळत नाही, ज्याने आपले मन आणि बुद्धी ईश्वराला समर्पित केलेली आहेत, ज्याचा लोकांना त्रास होत नाही वा जो लोकांना भीत नाही, जो हर्ष. शोक आणि भीती यांपासून मुक्त आहे, जो पवित्र आहे, जो कार्यदक्ष असूनही तटस्थ असतो, जो शुभाशुभाचा त्याग करणारा असतो, जो शत्रू आणि मित्र यांच्याबद्दल समभाव ठेवत असतो, ज्याच्या दृष्टीत मानापमान समान असतात, जो प्रशंसेने सुखावत नाही आणि निंदेने दुखावत नाही, जो मौन धारण करत असतो वा ज्याला एकांत प्रिय असतो आणि ज्याची बुद्धी स्थिर असते तो भक्त असतो.

अशी भक्ती आसक्त व्यक्तीत संभवू शकत नाही.

यावरून आपल्या लक्षात येते की ज्ञान प्राप्त करून घेणे, भक्त होणे हेच आत्मदर्शन आहे. याहून वेगळे असे आत्मदर्शन काहीही नाही. ज्याप्रमाणे एक रुपया देऊन जहर विकत घेता येते त्याचप्रमाणे अमृतही विकत घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे भक्तीच्या बदल्यात बंधन प्राप्त करून घेता येऊ शकते वा मोक्षप्राप्ती करून घेता येऊ शकते असे नाही. इथे साध्य आणि साधन पूर्णपणे जरी एक नसले तरी जवळपास समान आहेत. साधनांची पराकाष्ठा म्हणजेच मोक्ष. आणि गीतेच्या मोक्षाचा अर्थ आहे परम शांती.

परंतु अशा ज्ञानाला वा भक्तीला कर्मफलत्यागाची परीक्षा द्यावी लागत असते. सर्वसाधारण लोक शुष्क पंडितालाही भक्त समजत असतात. त्याच्याकरिता कोणतेही काम करण्याची आवश्यकता नसते. पेला उचलण्याचे कामही त्याच्याकरिता कर्मबंधनासारखे होत असते. यज्ञशून्य माणसाला जिथे ज्ञानी समजण्यात येते तिथे पेला उचलण्यासारख्या कामाला कसे काय स्थान असू शकते?

साधारण लोकांच्या कल्पनेत भक्त तो असतो जो ईश्वराच्या भक्तीत वेडा झालेला असतो, हातात माळ घेऊन देवाच्या नावाचा जप करत असतो, सेवेच्या कामामुळेही त्याच्या जपात व्यत्यय निर्माण होत असतो. यामुळे खाणेपिणे यासारख्या केवळ भोगांच्या गोष्टींकरिताच त्याच्या

हातातील माळ सुटत असते. जाते फिरवण्याकरिता वा सेवेच्या कामाकरिता तो आपल्या हातातील माळ कधीही सोडत नसतो.

अशा ज्ञानींना आणि भक्तांना स्पष्टपणे सांगण्यात आले आहे, "कर्माशिवाय कुणालाही सिद्धी प्राप्त होऊ शकत नाही. जनक इत्यादिकांनाही कर्माशिवाय गती प्राप्त होऊ शकली नव्हती. मी स्वतःही जर आळसविरहित होऊन कर्म करत राहिलो नाही तर या सर्व लोकांचा नाश होईल." असे असताना सामान्य लोकांबद्दल काय म्हणावे?

परंतु हेही निर्विवाद सत्य आहे की कोणतेही कर्म बंधन निर्माण करणारे असते. दुसरीकडे देहधारी माणून इच्छेने म्हणा वा अनिच्छेने कर्म करतच असतो. शरीराची वा मनाची प्रत्येक हालचाल कर्मच असते. असे असताना माणूस कर्मबंधनापासून कसा मुक्त होऊ शकतो? मला माहीत असल्याप्रमाणे या समस्येचे निराकरण जसे गीतेने केले आहे तसे इतर कोणत्याही धर्मग्रंथाने केलेले नाही. गीता सांगते, 'फलाशा सोडून कर्म करा, निष्काम कर्म करा'. गीतेची ही अशी हाक आहे की जी विसरली जाऊ शकत नाही. जो माणूस कर्म सोडतो त्याचे स्खलन होते. कर्म करत असतानाही जो कर्मफलाचा त्याग करतो तो मोठा होता. फलत्याग म्हणजे कर्माच्या फळाविषयी बेफिकीर असणे नाही. परिणामांचा आणि साधनांचा विचार करणे आणि दोघांचेही ज्ञान असणे अतिशय आवश्यक असते. इतके केल्यानंतर जो माणूस परिणामांची इच्छा केल्याशिवाय साधनात मग्न असतो त्याला फलत्यागी म्हणतात.

परंतु इथे कोणीही फलत्यागाचा अर्थ असा करू नये की त्यागीला कर्माचे फळ मिळतच नाही. गीतेत कुठेही असा अर्थ काढला जाण्याची शक्यता नाही. फलत्यागाचा अर्थ आहे फळाच्या आसक्तीचा अभाव. फलत्याग करणारास वास्तवात हजारपट फळ मिळत असते. गीतेच्या फलत्यागात तर माणसाच्या अढळ श्रद्धेची परीक्षा असते. जो माणूस परिणामांचा विचार करून काम करत असतो तो बहुधा कर्तव्य-कर्मभ्रष्ट होत असतो. त्याला धीर नसतो. त्यामुळे तो क्रोधाला बळी पडतो आणि नंतर जे काम करू नये ते करू लागतो. एका कर्मातून दुसऱ्या कर्मात, आणि दुसऱ्यातून तिसऱ्या कर्मात तो गुंतत जातो, कर्माची परिणामांची चिंता करणाऱ्या माणसाची

अवस्था विषयांध माणसासारखी होत असते, आणि अखेरीस विषयी माणसाप्रमाणे त्याचा बऱ्यावाईटाचा, नीतीअनीतीचा विवेक सुटतो आणि फळ मिळवण्याकरिता तो वाटेल त्या साधनांचा उपयोग करू लागतो व त्यालाच धर्म समजू लागतो.

फलासक्तीच्या अशा कटू परिणामांमुळे गीताकारांनी कर्मफलत्यागाचा सिद्धांत काढला आहे. आणि जगासमोर तो अतिशय आकर्शक भाषेत मांडला आहे.

सामान्यपणे असे समजले जाते की धर्म आणि अर्थ हे परस्पर विरोधी आहेत, "व्यापार इत्यादी सांसारिक कार्यात धर्माचे पालन होऊ शकत नाही, धर्माला त्यात कोणतेही स्थान असू शकत नाही, धर्माचा उपयोग केवळ मोक्षाकरिताच करता येऊ शकतो, धर्माच्या ठिकाणी धर्माला शोभा असते, अर्थाच्या ठिकाणी अर्थाला शोभा असते." गीताकारांनी हा भ्रम दूर केला आहे अशी माझी मान्यता आहे. त्यांनी मोक्ष आणि व्यवहार यात कोणतेही अंतर केलेले नाही, उलट धर्माला व्यवहारात उतरवले आहे. ज्या धर्माचा व्यवहारात उपयोग करता येऊ शकत नाही तो धर्म मुळी धर्मच नसतो ही गोष्ट गीतेत सांगितली आहे असे मला वाटते. यामुळे जे कर्म आसक्तीशिवाय होऊच शकत नाही ते त्याज्य ठरते, सोडून देण्यासारखे ठरते. हा सुवर्णनियम माणसाला अनेक धर्मसंकटांपासून वाचवतो. या नियमाप्रमाणे हत्या, असत्य, व्यभिचार इत्यादी कर्म स्वभावतःच त्याज्य ठरतात. यामुळे मानवी जीवन साधेसरळ होते आणि साधेसरळपणातून शांततेचा जन्म होतो. या विचारसरणीचे अनुसरण करताना मला असे वाटू लागले होते की गीतेच्या शिकवणुकीनुसार आचरण करणाऱ्या माणसाला स्वाभाविकपणेच सत्य आणि अहिंसेनुसार आचरण करावे लागत असते. फलासक्तीच्या अभावामुळे ना तर माणसाला खोटे बोलण्याचा मोह होतो ना हिंसा करण्याचा. हिंसा आणि असत्याच्या कोणत्याही कामाचा आपण विचार केला तर आपल्या लक्षात येईल की त्यात अपरिहार्यपणे परिणामांचा विचार हा असतोच.

परंतु गीतेला जर अहिंसा मान्य असेल अथवा अनासक्तीत स्वाभाविकपणे अहिंसा येतेच असे वाटत असेल तर मग गीताकारांनी भौतिक युद्धाचेच उदाहरण का घेतले? गीतायुगात अहिंसा ही धर्म मानली जात होती हे जरी खरे असले तरी त्या काळात भौतिक युद्ध सर्वसामान्य गोष्ट होती

आणि यामुळे गीताकारांना भौतिक युद्धाचे उदाहरण घेण्यात कोणताही संकोच वाटला नाही, वाटण्याचे कारणही नव्हते हे याचे उत्तर आहे.

परंतु फलत्यागाच्या महत्त्वाचा अंदाज करताना गीताकारांच्या मनात कोणते विचार होते, त्यात अहिंसेच्या सीमा ठरवण्यात आल्या होत्या काय याचा विचार करण्याची आपल्याला आवश्यकता नाही. एक महत्त्वाचा सिद्धांत कवी जगासमोर मांडत असल्यामुळे त्याला त्या सिद्धांताचे महत्त्व पूर्णपणे माहीत असलेच पाहिजे वा माहीत असले तरी तो ते जगासमोर योग्य भाषेत अभिव्यक्त करू शकतोच असे काही नाही. यातच काव्याची आणि कवीची महत्ता आहे. कवीच्या अर्थाला तर कोणतीच सीमा नसते.

ज्याप्रमाणे माणसाचा विकास होत असतो त्याचप्रमाणे महावाक्याचाही विकास होत असतो. भाषेचा इतिहास पाहिला तर आपल्याला कळून येईल की अनेक महान शब्दांचा अर्थ बदलत असतो वा विस्तारित होत असतो. हीच गोष्ट गीतेच्या अर्थासंबंधीही खरी आहे. गीताकारांनी स्वतःही महान रूढ शब्दांचा अर्थविकास केला आहे. गीता जरी वरवर तपासून पाहिली तरी हीच गोष्ट आपल्या लक्षात येईल. गीतायुगापूर्वी यज्ञात कदाचित पशुहत्या मान्य समजली जात असावी. परंतु गीतेत या गोष्टीचा दुरूनही वास येत नाही. गीतेत जपयज्ञाला सर्व यज्ञांचा राजा गणण्यात आले आहे. यज्ञाचा अर्थ परोपकारार्थ शरीराचा उपयोग असे गीतेच्या तिसऱ्या अध्यायात सांगितलेले आहे. तिसरा आणि चौथा अध्याय एकत्र वाचले तर यज्ञाच्या इतर व्याख्यांचाही शोध लागू शकेल, परंतु पशुहत्येचा अर्थ कुठेही लागू होत नाही.

गीतेतील संन्यास शब्दाच्या अर्थालाही हीच गोष्ट लागू होते. केवळ कर्मत्याग ही गोष्ट गीतेतील संन्यासाला मान्य नाही. गीतेतील संन्यासी अती-कर्मी असूनही अती-अकर्मी आहे. अशा प्रकारे गीताकारांनी महान शब्दांचा व्यापक अर्थ करण्याची गोष्ट आम्हाला शिकवली आहे. कर्मफलाचा संपूर्ण त्याग करणाऱ्या माणसाकडूनही भौतिक युद्ध होऊ शकते असा अर्थ गीताकारांच्या भाषेतील शब्दांमधून कदाचित निघूही शकेल, परंतु गीतेची शिकवण पूर्णपणे

आचरणात आणण्याचा सतत ४० वर्षे प्रयत्न करताकरता नम्रपणे मला वाटू लागले आहे की सत्य आणि अहिंसेच्या संपूर्ण पालनाशिवाय कर्मफलाचा संपूर्ण त्याग माणसाकरिता अशक्य आहे.

गीता काही सूत्रग्रंथ नाही. गीता एक महान धर्मकाव्य आहे. आपण तिच्यात जितकी खोल बुडी घेऊ तसतसे आपल्याला तिचे सुंदर अर्थ कळतील. गीता जनसामान्यांकरिता आहे. यामुळे तिच्यात एकच गोष्ट विविध प्रकारे सांगितली आहे. गीतेत आलेल्या महान शब्दांचा अर्थ प्रत्येक युगात बदलेल आणि व्यापक होत राहील. परंतु गीतेतील मूल मंत्रात कोणताही बदल होणार नाही. हा मंत्र ज्या रीतीने रुजवता येईल ती रीत लक्षात ठेवून गीतेतील महाशब्दांचा हवा ते अर्थ लावू शकतात.

गीता विधीनिषेधाचे विवेचन करणारा संग्रहग्रंथही नाही. एका माणसाकरिता जे कर्म विहीत असेल ते दुसऱ्याकरिता निषिद्ध असू शकते. एका काळात वा एका देशात जे कर्म विहीत असू शकेल ते कर्म दुसऱ्या काळात वा देशात निषिद्ध असू शकेल.अशा प्रकारे निषिद्धता केवळ फलासक्ती संबंधी आहे तर विहितता अनासक्ती संबंधी.

गीतेत ज्ञानाचा महिमा गाईला गेला आहे. आणि तरीही गीता बुद्धीगम्य नसून हृदयगम्य आहे. यामुळे ती अश्रद्ध माणसाकरिता नाही. गीताकार स्वतः सांगतात -

जो माणूस तपस्वी नाही, भक्त नाही, ज्याची ऐकण्याची इच्छा नाही आणि जो माझा द्वेष करतो त्याला तू हे ज्ञान कधीही सांगू नकोस. परंतु हे अतिशय गूढ ज्ञान जो माझ्या भक्ताला देईल तो माझी परम भक्ती केल्यामुळे निःसंशयपणे मला प्राप्त करील. याशिवाय जो माणूस द्वेषरहित होऊन श्रद्धापूर्वक हे सर्व ज्ञान ऐकेल तोसुद्धा पुण्यवान लोक राहत असलेल्या लोकात स्थान मिळवील. (अध्याय १८, श्लोक ६७, ६८ आणि ७१.)

कौसानी, (हिमालय),

सोमवार, ज्येष्ठ वद्य द्वितीया, १९८५

दिनांक २४ जून १९२९

अनुक्रमणिका

अधिकृत आवृत्ती - द. बा. कालेलकर -

प्रस्तावना - मो. क. गांधी -

१. अर्जुनविषादयोग -

२. सांख्ययोग -

३. कर्मयोग -

४. ज्ञानकर्मसंन्यासयोग

५. कर्मसंन्यास योग

६. ध्यान योग -

७. ज्ञानविज्ञानयोग -

८. अक्षरब्रह्मयोग -

९. राजविद्या - राजगुह्ययोग

१०. विभूतियोग

११. विश्वरूपदर्शन योग -

१२. भक्तियोग -

१३. क्षेत्रक्षेत्रज्ञविभाग योग -

१४. गुणत्रयविभागयोग -

१५ पुरुषोत्तमयोग -

१६. दैवासुरसंपदाविभागयोग -

१७. श्रद्धात्रयविभाग योग -

१८. संन्यासयोग

१. अर्जुनविषादयोग

चांगले काय आणि वाईट काय हे माहीत करून घेण्याची इच्छासुद्धा ज्याच्या मनात नसते त्याच्यासमोर धर्माच्या गोष्टींचा काय उपयोग? धर्मजिज्ञासेशिवाय ज्ञानप्राप्ती होऊ शकत नाही. दुःखाशिवाय सुख मिळत नाही. प्रत्येक जिज्ञासूला एकदा तरी धर्मवेदना, धर्मसंकट, हृदयमंथन यांना तोंड द्यावेच लागत असते.

१

धृतराष्ट्र उवाच -

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः।

मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत सञ्जय ।। १

हे संजय, धर्मक्षेत्ररूपी कुरुक्षेत्रात युद्ध करण्याच्या इच्छेने एकत्र आलेल्या माझ्या तसेच पंडूच्या पुत्रांनी काय केले? १

टीप - कुरुक्षेत्रातील युद्ध निमित्तमात्र आहे. अथवा खरे कुरुक्षेत्र आपले शरीर आहे. शरीराची उत्पत्ती पापातून होते आणि पापाचे भाजन बनून ते राहत असते. यामुळे ते कुरुक्षेत्र आहे.

ते मोक्षाचे द्वार बनू शकत असल्यामुळे ते कुरुक्षेत्रही आहे आणि धर्मक्षेत्रही आहे.

आपण जर शरीराला ईश्वराचे निवासस्थान मानले आणि तसे त्याला बनवले तर ते धर्मक्षेत्र होते त्या क्षेत्रात आपल्यासमोर दररोज कोणते ना कोणते युद्ध होत असते.

कौरव म्हणजे आसुरी वृत्ती. उलट पंडूपुत्र दैवी वृत्ती आहेत. प्रत्येक शरीरात चांगल्या आणि वाईट वृत्तीत युद्ध सुरू असते असा अनुभव कोणाला येत नाही? आणि अशी बहुतेक युद्धे 'हे माझे आणि हे तुझे' या कारणामुळे होत असतात. स्वजन, परजन असा भेद केल्यामुळे ही युद्धे होत असतात.

दृष्ट्वा तू पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।

आचार्यमुपसंङ्गम्य राजा वचनमब्रवित ।। २

पांडवांच्या सैन्याने केलेली व्यूहरचना पाहून दुर्योधन आचार्य द्रोण यांच्याकडे जाऊन म्हणाला, २

पश्यैतां पाण्डुपुत्राणाचार्य महती चमूम ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिषेण धीमता ।। ३

हे आचार्य! तुमच्या बुद्धिमान शिष्याने द्रुपदपुत्र धृष्टद्युम्नाने व्यूहरचना केलेल्या पांडवांच्या या विशाल सैन्याकडे पाहा. ३

अत्र शूरा महेश्वासाभीमार्जुन समा युधी ।
युयुधानो विराटश्च द्रिपदश्च महारथः ।। ४
धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजस्य वीर्यवान ।
पुरुचित्कुन्तिभोजश्च शैबश्च नरपुङ्गवः ।। ५
युधामन्यूश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ।। ६

इथे भीम आणि अर्जुन यांच्यासारखे निपुण महान धनूर्धारी, युयुधान, (सात्यकी) विराट, महारथी दृपद राजा, धृष्टकेतू, चेकितान, तेजस्वी काशीराज, पुरुजीत कुंतिभोज आणि पुरुषश्रेष्ठ शैब्य तसेच पराक्रमी युधामन्यू, बलवान उत्तमौजा, सुभद्रापुत्र (अभिमन्यू) आणि द्रौपदीचे पुत्र दिसत आहेत. ते सर्व महारथी (दिसत) आहेत. ४, ५, ६

अस्माकं तू विशिष्टा ये तान्निबोध निजोत्तम ।
नायका मम सैन्यस्य सञ्ज्ञार्थ तान्ब्रविमी ते ।। ७

हे ब्राह्मणश्रेष्ठ! आता आपल्याकडे जे योद्धे आहेत त्यांचीही माहिती करून घ्या. माझ्या सैन्यातील नायकांची नावे तुमच्या लक्षात असावी म्हणून मी ती तुम्हाला सांगतो. ७

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिञ्जयः।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ।। ८

अन्ये च बहवः सूरा मदर्थे त्यक्त जीविताः ।

नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ।। ९

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।

पर्याप्तं त्विदमेतेषा बलं भीमाभिरक्षितम् ।। १०

एक तर तुम्ही स्वतःच सावध आहा. शिवाय भिष्म, कर्ण, युद्धात विजय मिळवून देणारे कृपाचार्य, विकर्ण आणि सोमदत्तचा पुत्र भूरिश्रवा हेसुद्धा आपल्या सैन्यात आहेत. याशिवाय इतर अनेक शूरवीर योद्धे माझ्याकरिता प्राण अर्पण करायच्या तयारीने इथे उभे आहेत. हे सर्व विविध प्रकारचे शस्त्र चालवणारे आणि युद्धकलेत कुशल आहेत. ८, ९

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।

पर्याप्तं त्विदमेतेषा बलं भीमाभिरक्षितम् ।। १०

(तरीही) भिष्माद्वारे रक्षित आमच्या सैन्याची शक्ती अपुरी आहे. उलटपक्षी भीमाच्या संरक्षणातील पांडवांचे सैन्य पूर्ण आहे. १०

अयनेषू च सर्वेषू यथाभागमवस्थिताः ।

भीष्ममेवाभिरक्षन्तु भवतः सर्व एवही ।। ११

(अशा प्रकारे दुर्योधनाने द्रोणाचार्यांना सांगूनही द्रोणाचार्यांनी त्यावर काहीही उत्तर दिले नाही.)

यामुळे आपापल्या ठिकाणी राहून तुम्ही सर्वांनी भिष्म पितामहांचे चांगल्या प्रकारे रक्षण केले पाहिजे. ११

तस्य सढ्जनयन्हर्षकुरुवृद्धाः पितामहाः ।

सिंहनादं विनद्योच्चैवः शङ्खंदध्मौ प्रतापवान ।। १२

एवढ्यात दुर्योधनाला प्रसन्न करण्याकरिता कुरूमधील वयोवृद्ध पुरुष भिष्म पितामह यांनी उच्च स्वरात सिंहनाद करणारा आपला शंख वाजवला. १२

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।

सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत ।। १३

त्यानंतर शंख, नगारे, ढोल, मृदुंग आणि इतर रणवाद्ये एकदम वाजू लागली. तो आवाज अतिशय भयानक होता. १३

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दस्थितौ

माधवाः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ।। १४

अशा या प्रसंगी पांढरे घोडे असलेल्या रथात बसलेले श्रीकृष्ण आणि अर्जुन या दोघांनीही आपले दिव्य शंख वाजवले . १४

पाञ्चजन्यं हृषिकेशो देवदत्तं धनंजयाः ।

पौण्ड्रम दध्मौ महाशण्खं भीमकर्मा वृकोदरः ।। १५

श्रीकृष्णाने पांचजन्य शंख वाजवला. धनंजय अर्जुनाने देवदत्त शंख वाजवला आणि नकुलने सुघोष तर सहदेवने मणिपुष्पक शंख वाजवला. १५

अनन्तविजय राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः

नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ।। १६

कुन्तीपुत्र राजा युधिष्ठिरने अनंतविजय नावाचा आणि नकुल आणि सहदेवने सुघोष आणि मणिपुष्पक नावाचा शङ्ख वाजवला.

काश्यश्च परमेष्वासः शिण्खडीच महारथाः ।

धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजिताः ।। १७

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथ्वीवीपते ।

सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्ददध्मुः पृथक पृथक ।। १८

अशाच प्रकारे हे राजा मोठा धनुष्य असलेले काशीराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, राजा विराट, अपराजित सात्यकी, द्रुपदराज, द्रौपदीपुत्र, सुभद्रापुत्र महाबाहू अभिमन्यू या सर्वांनी आपापले वेगवेगळे शंख वाजवले. १७, १८

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत ।

नभश्च पृथ्वीवीं चैव व्यनुनादयन् ।। १९

पृथ्वी आणि आकाश व्यापणाऱ्या या भयानक नादाने कौरवांचे हृदय जणू चिरले गेले. १९

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान् कपिध्वजः ।

प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवाः ।। २०

आता हे राजन! कौरवांना युद्धबद्ध पाहून ध्वजावर हनुमान असलेल्या अर्जुनाने शस्त्र चालवण्याचा पवित्रा घेत धनुष्य हातात घेतला आणि हृषिकेशाला तो म्हणाला २०

हृषीकेशं तदा वाक्य मिदमाह महीपते ।

अर्जुन उवाच -

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ।।२१

यावदेता नीरेक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान ।

कैर्मया सह योद्धव्ययंमस्मिन्रणसमुद्यमे ।। २२

योत्स्यमानानवेक्षऽहं य एतेऽन्न समागतः ।

धार्तराष्ट्रस्य दुर्बद्धेर्युद्धे प्रियचिकिर्षवः ।। २३

हे अच्युत! माझा रथ दोन्ही बाजूच्या सैन्याच्या मध्ये नेऊन उभा कर. यामुळे युद्धाची इच्छा असणाऱ्या लोकांना मी पाहू शकेन, आणि या युद्धात कोणाकोणाशी लढायचे आहे हेही मला कळू शकेल. या युद्धात दुष्टबुद्धी दुर्योधनाला प्रिय असलेले कार्य करण्याची इच्छा असलेले जे योद्धा इथे गोळा झालेले आहेत त्यांना पाहण्याची माझी इच्छा आहे. २१. २२. २३

संजय उवाच -

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।

सेनयोरूभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ।। २४

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेशां च महीक्षिताम् ।

उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिती ।। २५

हे राजन! अर्जुन जेव्हा श्रीकृष्णाला असे म्हणाला तेव्हा श्रीकृष्णाने दोन्ही सैन्याच्या मधोमध, सर्व राजे आणि भिष्म आणि द्रोण यांच्यासमोर तो रथ नेऊन उभा केला आणि अर्जुनाला म्हणाला -

हे पार्थ एकत्र आलेल्या या कौरवांना तू पाहा २४, २५

२

तत्रापश्यत्स्थितान पार्थः पितृनथ पितामहान ।

आचार्यान्मातुलान्भ्रातृन्पुत्रान्पौत्रान्सखीस्थता ।। २६

श्वसुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।

तान्समीक्ष्यस कौन्तेयःसर्वान्बंधून्वस्थितान् ।। २७

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवित ।

दोन्ही सैन्यामध्ये उभे असलेले गुरुजन, पितामह, आचार्य, मामे, भाऊ, पुत्र. पौत्र, सासरे आणि स्नेहीजन इत्यादींना अर्जुनाने पाहिले. त्या नातलगांना - स्नेही स्वजनांना अशा रीतीने समोरासमोर उभे असलेले पाहून खेद होऊन दीनवाणा झालेला कुंतिपुत्र अर्जुन म्हणाला - २६, २७. २८

अर्जुन उवाच -

द्रष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितं ।। २८

सीदन्ती मम गात्राणि मुखंच परिशुष्यती ।

वेपथुश्च शरीरेमे रामहर्षश्च जायते ।। २९

गाण्डीवं स्त्रंसते हस्तात्वक्चैव परिदह्यते ।

न च शक्रोम्यवस्थातु भ्रमतीव च मे मनः ।। ३०

युद्ध करण्याकरिता एकत्र झालेल्या या आप्तस्वकीयांना पाहून माझे शरीर शिथिल होऊ लागले आहे, माझ्या तोंडाला कोरड पडू लागली आहे, शरीरात कंप सुरू झाला आहे आणि माझ्या शरीरावर शहारे उभे राहिले आहेत. माझ्या हातातील गांडीव घसरू लागला आहे. माझ्या शरीराची अतिशय लाहीलाही होऊ लागली आहे. माझ्याकडून उभे राहवत नाही कारण माझे डोके भणभणू लागले आहे. २८, २९. ३०

निमित्तानि च पश्यामी विपरितानि केशव ।

न च श्रेयोनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ।। ३१

याशिवाय हे केशवा मला इथे अशुभ आणि विपरीत चिन्हे दिसू लागली आहेत. या स्वजनांना युद्धात मारल्याने कोणतेही हित होईल असे मला दिसत नाही. ३१

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यंसुखानि च ।

किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ।। ३२

हे कृष्णा, यांना मारून ना तर मला विजय हवा आहे ना राज्य. तसेच मला ना विविध प्रकारच्या सुखोपभोगाची इच्छा आहे. हे गोविंद! आमच्याकरिता राज्याचा, उपभोगाचा वा जीवनाचा तरी काय उपयोग आहे? ३२

येषामर्थे काङ्क्षितं न राज्यं भोगः सुखानि च ।

त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वाधनानि च ।। ३३

आचार्याः पितराः पुत्रास्थैव च पितामहाः ।

मातुलाः स्वसुराः पौत्राः श्यालाः संबंधिन्स्तथा ।। ३४

ज्यांच्याकरिता मी राज्याची, भोगाची आणि सुखाची इच्छा केली ते आचार्य, गुरुजन, पुत्र, पौत्र, आजेआजोबा, मामा, सासरे, शालक आणि इतर आप्तस्वकीय तर इथे प्राणांची आणि धनसंपत्तीची पर्वा न करता लढण्याकरिता उभे आहेत. ३३, ३४

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।

अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं न महिकृते ।। ३५

त्यांनी जरी मला मारून टाकले तरी तिन्ही लोकांच्या राज्याकरितासुद्धा हे मधुसूदन मी यांची हत्या करू इच्छित नाही. मग या भूमीकरिता मी त्यांचा वध कसा काय करू शकतो? ३५

निहत्थ धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।

पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनाः ।। ३६

हे जनार्दन! धृतराष्ट्राच्या मुलांना मारून आम्हाला कोणता आनंद मिळू शकतो? या आततायींना मारूनही आम्हाला पापच लागेल. ३६

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान ।

स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ।। ३७

यामुळे हे माधवा, आमच्याच या भावंडांना, धृतराष्ट्रपुत्रांना आम्ही मारणे उचित होणार नाही. आपल्याच स्वजनांना मारून आपण कसे सुखी होऊ शकतो? ३७

यद्यपेते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।

कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहेच पातकम् ।। ३८

कथं न ज्ञेयमस्माभिःपापादस्मान्निवर्तितुम् ।

कलक्षय कृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ।। ३९

लोभाने चित्त मलीन झालेले असल्यामुळे कुलनाश आणि मित्रद्रोह यांमुळे होणारे पाप त्यांना दिसू शकत नसेलही, परंतु हे जनार्दन! कुलनाशदोषाचे ज्ञान असणाऱ्या आपल्यासारख्या

लोकांनाही यापासून होणाऱ्या पापापासून बचाव करण्याची गोष्ट कशी काय कळणार नाही? ३८, ३९

कुलक्षये प्रणश्यति कुसधर्माः सनातनाः ।

धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ।। ४०

कुलनाश झाला की परंपरेने चालत आलेल्या कुलधर्माचाही नाश होतो आणि कुलधर्माचा नाश झाला की अधर्म संपूर्ण कुळाला बुडवून टाकतो. ४०

अधर्माभिभवातकृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियाः ।

स्त्रीषु दुष्टासू वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ।। ४१

हे कृष्णा! अधर्म वाढला की कुलस्त्रिया दुषित होतात आणि त्या दुषित झाल्या की वर्णसंकर होतो. ४१

सङ्करो नरकायैव कुलाघ्नानां कुलस्य च ।

पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदक क्रियाः ।। ४२

असा कुलसंकर कुळाचा घात करणाराला आणि त्याच्या कुळाला नरकात पोहोचवतो. तसेच पिंडदानादी क्रिया न झाल्यामुळे त्याच्या पितरांचीही अधोगती होते. ४२

दोषैरेतैः कुलाघ्नानां वर्णसङ्करकारकैः ।

उत्साद्यंन्ते जातिधर्मः कुलधर्माश्च शाश्वतः ।। ४३

वर्णसंकर करणाऱ्या कुलघातकाच्या या दोषामुळे सनातन कुलधर्माचा आणि जातिधर्माचाही नाश होतो. ४३

उत्सन्न कुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।

नरकेऽनियतं वासो भवतित्यनुशुश्रुम ।। ४४

हे जनार्दन! ज्याच्या कुळाचा संपूर्ण नाश झालेला असतो अशा माणसाचा निश्चितच नरकात वास असतो असे आम्ही ऐकत आलो आहे. ४४

अहो बत महत्पापं कर्तुं व्यसिता वयम् ।

यद्राज्यसुखलोभेन हन्तु स्वजननुद्यता ।। ४५

अरे! अरे! किती भयानक पाप करण्याकरिता आम्ही उद्युक्त झालो आहो? राज्याच्या आणि सुखोपभोगाच्या मोहाने आम्ही आमच्या लोकांना मारण्याकरितासुद्धा तयार झालो आहो. ४५

यदि मामप्रतिकार शस्त्रंशस्त्रपाणयः ।

धर्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत ।। ४६

निःशस्त्र असलेल्या आणि प्रतिकार न करणाऱ्या मला जरी सशस्त्र धृतराष्ट्रांनी रणांगणात मारले तरी ते माझ्याकरिता अधिक कल्याणकारक होईल. ४६

संजय उवाच -

एवमुक्त्वार्जुनःसङ्खे रथोपस्थ उपविशत् ।

विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ।। ४७

अशा प्रकारे बोलून शोकाकुल अर्जुनाने धनुष्यबाणाचा त्याग केला आणि तो आपल्या रथाच्या मागील भागात जाऊन बसला. ४७

ॐ तत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला ‘अर्जुनविषादयोग’ नावाचा पहिला अध्याय इथे समाप्त होतो.

२. सांख्ययोग

मोहांना वश होऊन माणूस अधर्माला धर्म मानू लागतो. अर्जुनाने मोहामुळे आपल्या आणि परक्यांमध्ये भेद केला. हा भेद खोटा आहे असे सांगत भगवान श्रीकृष्ण आधी देह आणि आत्म्यातील अंतर समजावून सांगतात आणि देहाचे अनित्यत्व तसेच आत्म्याचे चिरंतनत्व व त्यांचे एकत्व सांगतात.

अर्जुनला पुढे समजावून सांगत श्रीकृष्ण म्हणतात की माणूस केवळ पुरुषार्थाचा, प्रयत्नांचा अधिकारी आहे, परिणामांचा नाही. यामुळे कर्तव्य काय आहे हे ठरवून त्याने निश्चिंत राहायला पाहिजे व कर्तव्यपरायण व्हायला पाहिजे. अशा प्रकारे कर्तव्यपरायण होऊनच मोक्षप्राप्ती होऊ शकते.

३

संजय उवाच -

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।

विषिदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ।। १

अशा प्रकारे करुणामय, व्याकूळ आणि अश्रूपूर्ण नेत्र असलेल्या दुःखी अर्जुनाला मधुसूदन म्हणाले - १

श्री भगवान उवाच -

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समपुस्थितम् ।

अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकिर्तिकरमर्जुन ।। २

हे अर्जुना, श्रेष्ठ पुरुषांकरिता अनुचित, स्वर्गापासून दूर नेणारा आणि अपयश देणारा हा मोह अशा विषम परिस्थितीत तुझ्यात कुठून आला? २

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।

क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।। ३

हे पार्थ! तू भ्याड बनू नकोस. तुला हे शोभत नाही. हे परंतप, हृदयात निर्माण झालेल्या या हीन दौर्बल्याचा त्याग करून तू ऊठ. ३

अर्जुन उवाच -

कथं भभिष्ममहं सङ्ख्ये द्रोणं च मधुसूदन ।

इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ।। ४

हे मधुसूदन, या रणांगणात भिष्म आणि द्रोण यांच्याशी धर्मयुद्ध कसे करू? हे अरिसूदन, ते तर माझ्याकरिता पूजनीय आहेत. ४

गुरूनहत्वा हि महानुभावा -

ञ्छ्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।

हत्वार्थ कामांस्तु गुरूनिहैव

भुञ्जीय भोगान रुधिरप्रदिग्धान ।। ५

या महानुभाव गुरुजनांना न मारल्यामुळे भीक मागून जरी निर्वाह करावा लागला तरी तेसुद्धा चांगले होईल. गुरुजनांना मारून मला त्यांच्या रक्ताने दुषित झालेले अर्थ आणि कामरूपी भोगच भोगावे लागतील. ५

न चैतद्विद्मः कतरन्नो गरियो -

यद्वा जयेय यदि वा न जयेयुः

यानेव हत्वा न जिजीविषाम

स्तेऽवस्थितः प्रमुखे धार्तराष्ट्राः ।। ६

युद्धात आम्ही त्यांंच्यावर विजय मिळवणे चांगले होईल की त्यांनी आमच्यावर विजय मिळवणे चांगले होईल? या दोनपैकी कोणती गोष्ट चांगली गणली जाईल हे मला माहीत नाही. ज्यांना मारून जगण्याची इच्छा होऊ नये असे धृतराष्ट्रपुत्र आमच्यासमोर उभे आहेत. ६

कार्पण्यदोषोहतस्वभावः

पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।

यच्छ्रेय स्वान्निश्चितम ब्रूहि तन्मे

शिष्यस्तेऽहं शाधिमां त्वां प्रपन्नम ।।७

दीनवाणेपणामुळे माझा मूळ स्वभाव नष्ट झाला आहे. कर्तव्यासंबंधी माझ्या मनात गोंधळ निर्माण झाला आहे. यामुळे ज्यात माझे निश्चित हित असेल ते मला सांग अशी माझी तुला विनंती आहे. मी तुझा शिष्य आहे, मी तुला शरण आलेलो आहे. तू मला मार्ग दाखव. ७

न हि प्रपश्यामिममापनुद्या -

द्यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ।

अवाप्य भूमावसपत्नमृद्धं -

राज्य सुराणामपि चाधिपत्यम् ।। ८

या लोकात धनधान्याने परिपूर्ण निष्कंटक राज्य मिळाले आणि परलोकात इंद्रासन मिळाले तरीही त्यामुळे इंद्रियांचे शोषण करत असलेल्या या व्याधीवरील उपाय सापडेल असे मला वाटत नाही. ८

संजय उवाच -

एवमुक्त्वा हृषिकेशं गुडाकेशः परन्तप ।

न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ।। ९

हे राजा, शत्रूंना संतप्त करण्यात विख्यात असलेला गुडाकेश अर्जुन ‘मी लढणार नाही’ असे हृषिकेश गोविंदला म्हणाला आणि गप्प बसला. ९

तमुवाच हृषिकेशः प्रहसन्निव भारत ।

सेनयोयुर्भयोमध्ये विषीदन्तमिदम वचः ।। १०

हे भारत, दोन्ही सैन्यांमध्ये अशा प्रकारे उदास होऊन बसलेल्या अर्जुनाशी जणू काय थट्टा करत हृषिकेश म्हणाले - १०

४

श्री भगवानुवाच -

अशोच्यानन्वशोचस्तं प्रज्ञावादांश्च भाषसे ।

गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पण्डिताः ।। ११

शोक न करण्यासारख्या गोष्टीचा तू शोक करतो आहेस आणि पंडिताप्रमाणे तू गोष्टी करतोस. परंतु पंडित लोक तर मृत वा जिवंत व्यक्तीकरिता शोक करत नसतात. ११

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ।

न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ।। १२

वास्तवात हे राजेमहारेजे कधी काळी नव्हते वा पुढे असणार नाहीत असे काही नाही. १२

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं योवनं जरा ।

तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यती ।।१३

देहधा

रीच्या देहाला ज्याप्रमाणे कुमारावस्था, युवावस्था आणि वृद्धावस्था प्राप्त होत असते त्याचप्रमाणे त्याला दुसरा देहही प्राप्त होत असतो. या सर्वांमुळे बुद्धिमान पुरुष व्याकूळ होत नसतो. १३

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः ।

आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ।। १४

हे कौंतेय, इंद्रियविषयांबरोबर थंडी, गरमी, सुख आणि दुःख या गोष्टीही येत असतात. या अनित्य आहेत. यामुळे या गोष्टी येतात आणि निघून जातात. हे भारत, हे सर्व तू सहन कर. १४

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ।

समदु:खमसुखं धीर सोऽमृतत्वाय कल्पते ।। १५

हे पुरुषश्रेष्ठ, सुखात आणि द:खात समभावाने राहणाऱ्या ज्या बुद्धिमान पुरुषास या गोष्टी व्याकूळ करत नाहीत तोच मोक्षाचा भागीदार होत असतो. १५

नासतो विद्यते भावो ना भावो विद्यते सतः ।

उभयोरपिदृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ।। १६

असत

चे अस्तित्व नसते आणि सतचा नाश होत नसतो. या दोन्हींचे ज्ञान ज्ञानी लोकांना असते. १६

अविनाशी तू तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।

विनाशामव्ययस्यास्यन कश्चित्कर्तुमर्हति ।। १७

ज्याने हे सर्व जग व्यापलेले आहे ते अविनाशी आहे हे लक्षात ठेव. या अविनाशी शाश्वत तत्त्वाचा नाश करणे कोणालाही शक्य नाही. १७

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ।

अनाशिनोऽअप्रमेयस्य तस्माद्द्युध्यस्व भारत ।। १८

नित्य असणाऱ्या,आणि तसेच मनाला आणि इंद्रियांना कळू न शकणाऱ्या या अविनाशी देहीचा (आत्मा) हा देह नाशमान आहे असे म्हणतात. यामुळे हे भारत तू युद्ध कर. १८

य एनं वेत्ती हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।

उभौ तो न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ।। १९

जे याला (आत्म्याला) मारणारा समजतात आणि जे याला मेलेला समजतात त्यांना काहीही कळत नसते. हा (आत्मा) ना तर कुणाला मारतो आणि ना कोणी याला मारू शकतो. १९

न जायते म्रियते वा कदाचि -

न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।

अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो -

न हन्यते हन्यमाने शरीरे ।। २०

हा कधीही जन्म घेत नाही आणि कधीही मरत नाही. हा आधी नव्हता आणि पुढे असणार नाही असे नाही. यामुळे हा आत्मा अज आहे, नित्य आहे, शाश्वत आहे, पुरातन आहे. शरीर मारल्या गेल्यामुळे हा मारला जात नाही. २०

वेदविनाशिनं नित्यं च एनमजमव्यम् ।

कथं च पुरुषाः पार्थ कं घातयति हन्ति कम् ।। २१

हे पार्थ, जो पुरुष आत्म्याला अविनाशी, नित्य, अज, आणि अव्ययी समजतो तो कुणाला मारायला लावू शकतो वा मारू शकतो? २१

वासांसिजिर्णानि यथा विहाय

नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।

तथा शरीराणि विहाय जिर्णा -

न्यन्यानि संयाति नवानि देही ।। २२

माणूस ज्याप्रमाणे जुने कपडे टाकून नवीन कपडे धारण करतो त्याचप्रमाणे देहधारी जीव जीर्ण झालेला देह टाकून देतो आणि नवीन देह धारण करतो. २२

नैनं छिदंन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकाः।

न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।। २३

याला (आत्म्याला) शस्त्र कापू शकत नाहीत, आग जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वायू वाळवू शकत नाही. २३

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।

नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ।। २४

या आत्म्याला कापता येऊ शकत नाही, जाळता येऊ शकत नाही, भिजवता येऊ शकत नाही, वाळवता येऊ शकत नाही. हा नित्य आहे, सर्वगत आहे, स्थिर आहे, अचल आहे आणि सनातन आहे. २४

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योनुच्यते ।

तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ।। २५

याशिवाय हा इंद्रियांना आणि मनाला अगम्य आहे, अविकारी आहे असे म्हटले जाते. हे सर्व ओळखून तू याकरिता शोक करायला नको. २५

अथ चैनं नित्य जातंनित्यं वा मन्यसे मृतम् ।

तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ।। २६

आणि तू जर याला नित्य जन्म घेणारा, नित्य मरण पावणारा मानत असशील तरीही हे महाबाहो याच्याकरिता तू शोक करण्याचे कारण नाही. २६

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।

तस्मादअपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।। २७

जन्मलेल्या प्रण्याकरिता मृत्यू आणि मेलेल्या प्राण्याकरिता जन्म अपरिहार्य आहे. यामुळे जे अनिवार्य आहे त्याकरिता शोक करणे उचित नाही. २७

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।

अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिवेदना ।। २८

हे भारत, भूतमात्राची जन्मापूर्वीची आणि मृत्यूनंतरची अवस्था पाहता येऊ शकत नाही. हा आत्मा अव्यक्त आहे. केवळ या दोन अवस्थांमध्ये हा व्यक्त होत असतो. यात काळजीला वाव तरी कुठे आहे? २८

टीप - इथे भूत याचा अर्थ स्थावर आणि जंगम सृष्टी असा आहे.

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन -

माश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ।

आश्चर्यवच्चैनमन्यः श्रृणोति

श्रृत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ।। २९

कोणी याच्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहतात. दुसरे कोणी 'आश्चर्य' म्हणून याचे वर्णन करतात तर तिसरे आश्चर्य स्वरूपी म्हणून याचे जे वर्णन करण्यात येते ते ऐकतात आणि ते ऐकल्यानंतरही याचे ज्ञान कोणालाही होत नाही. २९

देही नित्यं वध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।

तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ।। ३०

हे भारत, सर्वांच्या शरीरात वसलेला हा शरीरधारी आत्मा नित्य आणि अवध्य आहे. यामुळे भूतमात्रांविषयी तू शोक करणे उचित नाही. ३०

टीप - बुद्धिद्वारे आत्म्याचे नित्यत्व आणि देहाचे अनित्यत्व दाखवून एखाद्या परिस्थितीत देहाचा नाश करणे उचित आहे असे मानले गेले तर स्वजन आणि परजन असा भेद करून कौरव आपले स्वजन आणि त्यामुळे त्यांना कसे मारावे असा विचार मोहजन्य आहे असे इथे श्रीकृष्णाने सुचवले आहे.

आता श्रीकृष्ण अर्जुनाला क्षत्रियधर्म समजावून सांगतात.

५

स्वधर्मवपि च्यावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।

धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यतत्क्षत्रियस्य न विद्यते ।। ३१

स्वधर्माचा विचार करूनही युद्धापासून विन्मुख होणे तुझ्याकरिता उचित नाही कारण क्षत्रियाकरिता धर्मयुद्धापेक्षा अधिक श्रेयस्कर दुसरे काहीही नसते. ३१

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गदारमपावृतम् ।

सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमी दृशम् ।। ३२

हे पार्थ अशा प्रकारे स्वाभाविकपणे प्राप्त झालेले स्वर्गाचे द्वार उघडणारे असे युद्ध तर भाग्यशाली क्षत्रियांनाच प्राप्त होत असते. ३२

अथ चेत्वमिमं धर्म्यंसंग्रामं न करिष्यसि ।

ततः स्वधर्मं किर्ति च हित्वा पापंवाप्स्यसि ।। ३३

धर्म म्हणून प्राप्त झालेला हा संग्राम जर तू करणार नसशील तर तू स्वधर्म आणि कीर्ती या दोन्हींना मुकशील आणि पापाचा भागगीदार होशील. ३३

अकिर्ति चापि भूतानि

कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।

सम्भावितस्य चाकिर्ति -

र्मरणादतिरिच्यते ।। ३४

(यामुळे) सर्व लोक तुझी सतत निंदा करत राहतील आणि सन्माननीय पुरुषांकरिता तर अपकिर्ती मृत्यूपेक्षाही वाईट असते. ३४

भयाद्रणादुपरंतं मंस्यन्ते त्वां महारथाः ।

येषांच त्व बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।। ३५

ज्या महारथींमध्ये तू सन्मान मिळवला आहेस त्यांना तू रणांगणातून पळाला असे वाटेल व त्यांच्यामधील तुझी प्रतिष्ठा कमी होईल. ३५

अवाच्यवादांश्च बहुन्वदिष्यन्ति तवाहिताः ।

निन्दन्तस्तव सामर्थ्य ततो दुःखतरं नु किंम् ।। ३६

आणि तुझी निंदा करत असताना तुझे शत्रू जे अपशब्द बोलू नये तेही बोलतील. याहून अधिक दुःखदायी काय असू शकते? ३६

हतो वा प्राप्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महिम् ।

तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।। ३७

तू जर युद्धात मारला गेलास तर तुला स्वर्गप्राप्ती होईल आणि तू जर जिंकलास तर तुला पृथ्वीचा उपभोग करायला मिळेल. हे कौंतेय, युद्ध करण्याचा निर्धार करून तू उभा राहा. ३७

टीप - देवाने आधी आत्म्याचे नित्यत्व आणि देहाचे अनित्यत्व समजावून सांगितले. त्यानंतर सहजप्राप्त युद्ध करण्यात धर्माच्या दृष्टीने कोणतीही अडचण नाही असेही सांगितले. यामुळे एकतिसाव्या श्लोकापासून भगवान श्रीकृष्णाने परमार्थासोबत उपयोगितेचाही (लाभहानीच्या व्यावहारिक दृष्टीचा) मेळ घातला आहे.

भगवान आता गीतेच्या मुख्य उपदेशाचे दर्शन एका श्लोकात घडवतात

सुखदु:खे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।

ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।। ३८

सुख आणि दु:ख, लाभ आणि हानी, जय आणि पराजय, यांना समान समजून तू युद्धाकरिता तयार हो. असे केल्यामुळे तुला पाप लागणार नाही. ३८

एषा तेऽभिहिता सांङ्ख्ये बुद्धिर्योगे त्विमां श्रृणु ।

बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ।। ३९

सांख्य तत्त्वज्ञानानुसार तुझे कर्तव्य काय आहे हे मी तुला समजावून सांगितले आहे.

६

आता मी तुला योगवादाप्रमाणे समजावून सांगतो. ते तू ऐक. याचा आधार घेतल्यामुळे तू कर्मबंधन तोडू शकशील. ३९

नेहाभिक्रमनाशोस्ति प्रत्यवायो न विद्यते ।

स्वल्पमप्यस्यधर्मस्य त्रायते महतो भयात् ।। ४०

या निष्ठेने जो सुरुवात करतो त्याचा विनाश कधीही होत नाही.आणि विपरीत परिणामही त्यापासून कधीही निघत नाहीत. या धर्माचे अल्पसे पालन केल्यामुळेही माणसाची महाभयापासून मुक्ती होते. ४०

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन ।

बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ।। ४१

हे कुरुनंदन, (योगवादीची) निश्चयात्मक बुद्धी एकात्मक असते तर अनिश्चयी माणसाच्या बुद्धीच्या म्हणजे वासनांच्या अनेक शाखा असतात आणि ती अनंत असते. ४१

टीप - बुद्धी जेव्हा एक न राहता अनेक होते तेव्हा ती बुद्धी राहत नाही, ती वासनेचे रूप धारण करते. यामुळे इथे बुद्धीचा अर्थ वासना झाला आहे.

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्य विपश्चितः ।

वेदवादरतःपार्थ नान्यदस्तीति वादिनः ।। ४२

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।

क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्य गतिं प्रति ।। ४३

भोगैश्वर्य प्रवक्तानां तथापहृत चेतसाम् ।

व्यवसायात्मिका बुद्धिः माधौ न विधीयते ।। ४४

हे पार्थ, वेदांच्या शाब्दिक चर्चेत रस असलेले अज्ञानी 'याशिवाय दुसरे काहीही नाही' असे म्हणणारे, कामना असलेले आणि स्वर्गालाच श्रेष्ठ समजणारे लोक जन्ममरणरूपी कर्मफल देणाऱ्या आणि उपभोग आणि ऐश्वर्य प्राप्त करता यावे म्हणून करण्यात येणाऱ्या कर्माचे वर्णन अतिशयोक्त भाषेत करत असतात. भोग आणि ऐश्वर्य यांत आसक्त झालेल्या अशा लोकांची बुद्धी नष्ट झालेली असते. त्यांच्या बुद्धीत ना तर करारीपणा असतो ना ती समाधीच्या विषयात स्थिर होऊ शकते. ४२, ४३, ४४

टीप - वरील तीन श्लोकांमध्ये योगवादाच्या विरोधातील कर्मकांडाचे वर्णन करण्यात आले आहे. कर्मकांड अथवा वेदवादचा इथे अर्थ आहे फळ देणाऱ्या असंख्य क्रिया. या क्रिया वेदांतापेक्षा म्हणजे वेदात सांगितलेल्या रहस्यापेक्षा वेगळ्या आणि अल्प परिणामकारक असल्यामुळे त्या निरर्थक असतात.

वैगुण्य विषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।

निर्द्वंद्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।। ४५

हे अर्जुना, वेदाचे विषय असलेल्या या तीन गुणांपासून तू अलिप्त राहा. सुखदुःख इत्यादी द्वंद्वापासून मुक्त हो. सत्य वस्तूत तू स्थिर राहा. कोणतीही वस्तू मिळवण्याच्या आणि ती राखून ठेवण्याच्या दगदगीतून मुक्त आणि आत्मपरायण हो. ४५

यावनर्थ उदपाने सर्वतः सम्प्लुतोदके ।

तावान्सर्वेषू‌ वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ।। ४६

विहिरीपासून जे उद्दिष्ट सिद्ध होऊ शकते जवळपास तेच उद्दिष्ट सरोवरापासूनही सिद्ध होऊ शकते. अशाच प्रकारे सगळ्या वेदांमध्ये जे आहे तेच ब्रह्मपरायण ज्ञानी माणसाला आत्मानुभवातून प्राप्त होते. ४६

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

म कर्मफल हेतूर्भूर्मा ते सङ्‌गोऽस्त्वकर्मणी ।। ४७

हे धनंजय, तू आसक्ती सोडून आणि योगस्थ होऊन म्हणजे सफलता आणि निष्फलता यांबद्दल समत्वबुद्धी ठेवून कर्म कर. या समत्वबुद्धीलाच योग म्हणतात. ४७

योगस्थः कुरुकर्माणि सङ्‌गम त्यक्त्वा धनञ्जय ।

सिद्धसिद्ध्यौ समो भूत्वा समत्वं योग उच्यते ।। ४८

कर्मावरच तुझा अधिकार आहे. त्यापासून निर्माण होणाऱ्या विविध फळांवर तुझा काहीही अधिकार असू शकत नाही. कर्मफल तुझे उद्दिष्ट नसले पाहिजे. कर्म करण्याविषयीही तुझा आग्रह असू नये. ४८

दुरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धञ्जय ।

बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ।। ४९

हे धनंजया, समत्वबुद्धीने तुलना केली तर केवळ कर्म ही अतिशय तुच्छ गोष्ट आहे. तू समत्वबुद्धीचा आधार घे. फळाची आशा ठेवणारी पामर माणसे दयेला पात्र असतात. ४९

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।

तस्माद्योगाय युज्यस्य योगः कर्मसु कौशलम् ।। ५०

बुद्धियुक्त म्हणजे समत्ववान पुरूष या जगात स्वतःला पापपुण्याचा स्पर्श होऊ देत नाही. यामुळे तू समत्व साध्य करण्याचा प्रयत्न कर. समत्वताच कार्यकुशलता आहे. ५०

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषणः ।

जन्मबंध विनिर्मुक्ताः पदं गच्छंतनामयम ।। ५१

समत्वबुद्धी असलेले ऋषीमुनी कर्मामुळे उत्पन्न होणाऱ्या फळाचा त्याग करून जन्मबंधनापासून मुक्त होतात आणि निष्कलंक मोक्षपद प्राप्त करतात. ५१

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।

तदा गन्तासि निर्वेदम श्रोतव्यस्य श्रुतस्य च।। ५२

तू या मोहरूपी दलदलीतून जेव्हा बाहेर पडशील तेव्हा ऐकलेले विषय आणि ऐकण्याकरिता शिल्लक असलेले विषय यांच्यासंबंधी तू उदासीन होशील. ५२

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।

समाधावचला बुद्धिस्तदा योदमवाप्स्यसि ।। ५३

अनेक प्रकारचे सिद्धांत ऐकून गोंधळलेली तुझी बुद्धी जेव्हा समाधीत स्थिर होईल तेव्हाच तुला समत्वाची म्हणजे योगाची सिद्धी प्राप्त होईल. ५३

७

अर्जुन उवाच -

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।

स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किंम् ।। ५४

हे केशवा, स्थितप्रज्ञ म्हणजेच समाधिस्थ पुरुषाची लक्षणे कोणती आहेत? स्थितप्रज्ञ कसा बोलतो, कसा चालतो? ५४

श्री भगवान उवाच -

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।

आत्मन्येवात्मनातुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।। ५५

हे पार्थ, माणूस जेव्हा मनात निर्माण झालेल्या सर्व वासनांचा त्याग करतो आणि आत्म्यात आत्म्याद्वारेच संतुष्ट राहतो तेव्हा त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. ५५

टीप - आत्म्यात आत्म्याद्वारे संतुष्ट राहण्याचा अर्थ आहे आत्म्याच्या आनंदाचा आतून शोध घेणे. सुखदुःख देणाऱ्या बाह्यगोष्टींवर आपला आनंद अवलंबून नसणे.

आपण लक्षात ठेवले पाहिजे की आनंद सुखापेक्षा वेगळी गोष्ट आहे. मला संपत्ती मिळाली व मी तिच्यात सुख मानू लागलो तर तो माझा मोह होईल. मी भिकारी झालो आणि भुकेने माझी तडफड होत असतानाही मी चोरीच्या वा दुसऱ्या कशाच्या मोहात पडलो नाही आणि त्यामुळे मला आनंद होत असेल तर त्या गोष्टीला आत्मसंतोष म्हणता येऊ शकेल.

दुःखेश्वअनुद्विग्नमनः सुखेषु विगतस्पृहः ।

वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ।। ५६

दुःखांनी जो दुःखी होत नाही आणि सुखाची जो इच्छा ठेवत नाही आणि जो राग, भय आणि क्रोध यांच्यापासून मुक्त झालेला असतो त्या मुनीला स्थितप्रज्ञ म्हणतात. ५६

यह सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।

नभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञाप्रतिष्ठिता ।। ५७

जो सर्वत्र रागविरहित असतो आणि शुभप्राप्तीनंतरही जो त्याचे स्वागत करत नाही आणि अशुभ प्राप्तीमुळे व्याकूळ होत नाही त्याची बुद्धी स्थिर असते. ५७

यदा संहरते चायंकूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।

इन्द्रियाणीन्द्रियार्थे भ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ५८

ज्याप्रमाणे कासव आपली इंद्रिये आत ओढून घेतो त्याचप्रमाणे हा पुरुष जेव्हा आपल्या इंद्रियांना सर्व विषयांपासून ओढून घेतो तेव्हा त्याची बुद्धी स्थिर आहे असे म्हणता येऊ शकते. ५८

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।

रस वर्जं रसोऽप्यस्य परं द्रष्ट्वा निवर्तते ।। ५९

देहधारी माणूस जेव्हा निराहार राहतो तेव्हा त्याचे विषय शिथिल होतात हे जरी खरे असले तरी त्यासंबंधीची (विषयासंबंधीची) त्याची ओढ नाहीशी होत नाही. ही ओढ तर परमेश्वराच्या दर्शनाने, परमेश्वराचा साक्षात्कार झाल्यामुळेच शांत होऊ शकते. ५९

टीप - हा श्लोक उपवास इत्यादींचा निषेध करत नाही तर त्यांच्या मर्यादा सांगतो. विषयादींना शांत करण्याकरिता उपवास इत्यादी आवश्यक आहेतच, परंतु विषयांचे मूळ म्हणजे त्याबद्दलची गोडी तर ईश्वराचे दर्शन झाल्यानंतरच नाहीशी होऊ शकते. ईश्वराच्या साक्षात्कारामध्ये ज्याची गोडी निर्माण होते त्याला इतर कोणत्याही विषयात गोडी वाटत नाही. इतर सर्व रस तो विसरून जातो.

यततो ह्यपि कौन्तेय पुरुष्यस्य विपश्चितः ।

इन्द्रियाणि प्रमाथीनी हरन्ति प्रसभं मनः ।। ६०

हे कौंतेय शहाणा आणि बुद्धिमान माणूस प्रयत्न करत असला तरी इंद्रिये अशी दुर्दम्य आहेत की ती त्याच्या मनाला बळजबरीने पकडीत घेतात. ६०

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसित मत्परः ।

वशे हियस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ६१

या सर्व इंद्रियांवर ताबा मिळवून योगी माणसाने माझ्यात तल्लीन होऊन राहिले पाहिजे, कारण ज्याची इंद्रिये त्याच्या ताब्यात असतात त्याचीच बुद्धी स्थिर असते. ६१

टीप - याचा अर्थ भक्ती आणि त्यामुळे मिळणारी ईश्वरी मदत याकरिता माणसाचे प्रयत्न व्यर्थ आहेत.

ध्यायतो विषयान्पुसाः सङ्गस्तेषूपजायते ।

सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।। ६२

विषयाचे चिंतन करणाऱ्या पुरुषाच्या मनात विषयांसंबंधी आसक्ती निर्माण होत असते. आसक्तीतून कामना निर्माण होतात आणि कामनांमधून क्रोध निर्माण होत असतो. ६२

टीप - कामना असणाऱ्या पुरुषाला क्रोध येणे अपरिहार्य असते कारण कामना कधीही तृप्त होत नसतात.

क्रोधात्भवति संमोहः संमोहात स्मृविभ्रमः ।

स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।। ६३

क्रोधातून मूढपणा निर्माण होतो आणि मूढपणामुळे स्मृतिभ्रंश होतो. स्मृतिभ्रंशाने ज्ञानाचा नाश होतो आणि ज्या पुरुषाच्या ज्ञानाचा नाश झालेला असतो त्याचा स्वतःचाही नाश होतो. (त्याची सर्व प्रकारे अधोगती होते.) ६३

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।

आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।। ६४

परंतु ज्याचे मन आपल्या ताब्यात असते आणि जो रागद्वेषविरहित असतो आणि आपल्या इंद्रियांद्वारे (योग्य) विषयांचा स्वीकार करतो त्याला चित्ताची प्रसन्नता लाभते. ६४

प्रसादे सर्वदु:खानां हानिरस्योपजायते ।

प्रसन्न चेतसो ह्याशुबुद्धिः पर्यवतिष्ठते ।। ६५

चित्ताच्या प्रसन्नतेमुळे त्याची सर्व दु:खे नाहीशी होतात आणि प्रसन्नताप्राप्त पुरुषाची बुद्धी लगेच स्थिर होते. ६५

नास्ति बुद्धिर्युक्तस्य न चायुक्तस्य भावना ।

न चा भावयतः शान्तिरशान्तस्य कुतः सुखम् ।। ६६

ज्याच्यात समत्व नसते त्याच्यात विवेक नसतो आणि भक्तीही नसते. ज्याच्यात भक्ती नसते त्याला शांतता मिळू शकत नाही आणि ज्याला शांतता लाभलेली नसते त्याला सुख तर अगदीच मिळू शकत नाही. ६६

इन्द्रियाणां हि तरतां यन्मनोऽनुविधीयते ।

तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ।। ६७

ज्याप्रमाणे वायू नावेला कुणीकडेही वाहून नेतो त्याचप्रमाणे विषयात भटकणाऱ्या इंद्रियांमागे ज्याचे मन धावत असते त्याचे मन त्याच्या बुद्धीला वाटेल तिकडे घेऊन जाते. ६७

तस्माद्यस्य महाबाहोनिगृहीतानि सर्वशः ।

इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।। ६८

यामुळे हे महाबाहो, ज्याची इंद्रिये चोहोकडून विषयाबाहेर ओढली जाऊन त्याच्या ताब्यात येतात त्या पुरुषाची बुद्धी स्थिर असते. ६८

या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ।

यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।। ६९

ज्या वेळी सर्व प्राणी झोपलेले असतात त्यावेळी संयमी पुरुष जागा असतो. आणि ज्यावेळी सर्व लोक जागे असतात त्यावेळी ज्ञानी मुनी झोपत असतो. ६९

टीप - उपभोगात रत असलेला मनुष्य रात्रीच्या बाराएक वाजेपर्यंत नाचगाणे, रागरंग, खाणेपिणे इत्यादी गोष्टीत आपला वेळ घालवतो आणि मग सकाळी सातआठ वाजेपर्यंत झोपून राहतो. संयमी माणूस रात्री सातआठ वाजता झोपून जातो आणि मध्यरात्री उठून ईश्वराचे ध्यान करतो.

याशिवाय भोगी माणूस संसारात गुंतत जातो आणि ईश्वराला विसरतो. उलटपक्षी संयमी माणूस सांसारिक गोष्टींबद्दल अनभिज्ञ असतो व तो ईश्वरी साक्षात्काराच्या प्रयत्नात असतो. अशा प्रकारे भोगी आणि संयमी यांचे मार्ग वेगवेगळे असतात असे श्रीकृष्णाने या श्लोकातून सूचीत केले आहे.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम-
समुद्रमापः प्रविश्यंति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविश्यन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ।। ७०

चोहोकडून पाणी भरत राहिल्यानंतरही सीमा अचल राहत असलेल्या समुद्रात सर्व पाणी येऊन गोळा होते. अशाच प्रकारे ज्या माणसाची सांसारिक भोगाची इच्छा शांत होते त्यालाच शांतता प्राप्त होते, कामी पुरुषाला नाही. ७०

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ।
निर्ममो निरहङ्कारः शान्तिमधिगच्छति ।। ७१

सर्व कामनांचा त्याग करून जो पुरुष इच्छा, ममता, आणि अहंकार यांच्यापासून मुक्त होऊन या जगात राहतो त्यालाच शांतता प्राप्त होते. ७१

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वास्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ।। ७२

हे पार्थ, ईश्वराला ओळखणाऱ्या पुरुषाची स्थिती ही अशी असते. ही स्थिती प्राप्त केल्यानंतर तो मोहांना वश होत नाही आणि मृत्यूच्या वेळीही ही स्थिती कायम राहिली तर त्याला ब्रह्मनिर्वाण प्राप्ती होते. ७२

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'सांख्ययोग' नावाचा दुसरा अध्याय इथे समाप्त होतो.

३. कर्मयोग

हा अध्याय गीतेचे स्वरूप कळण्याची किल्ली आहे. कर्म कसे करावे आणि खरे कर्म कशाला म्हणतात हे यात सांगण्यात आले आहे. खऱ्या ज्ञानाचे परिणाम पारमार्थिक कर्माच्या रूपात दृग्गोचर झालेच पाहिजे हेही यात सांगण्यात आले आहे.

८

अर्जुन उवाच -

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्जन ।

तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसी केशव ।। १

हे जनार्दन, जर तू कर्मापेक्षा बुद्धीचे स्थान उच्च आहे असे मानत असशील तर हे केशवा तू मला हे घोर कर्म करण्याकरिता का प्रवृत्त करतो आहेस? १

टीप - इथे बुद्धीचा अर्थ समत्वबुद्धी आहे.

व्यामिश्रेणव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ।

तदेकं वद निश्चित्य येनश्रेयोऽहमाप्नुयाम् ।। २

तुझे हे व्यामिश्र शब्द माझ्या बुद्धीला शंकेखोर बनवत आहेत. यामुळे माझे कल्याण होईल अशी नेमकी एकच गोष्ट मला निश्चितपणे सांग. २

टीप - अर्जुन संभ्रमात पडतो कारण एकीकडे भगवान शिथिल होण्याकरिता त्याला टोमणा मारतात तर दुसरीकडे दुसऱ्या अध्यायातील ४९ आणि ५० व्या श्लोकात कर्मत्यागाच्या उपदेशाचा भास होतो.

खोलवर विचार केला तर असे काही नाही असे भगवान सांगतात.

श्री भगवान उवा.च -

लोकेऽस्मिन द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ।

ज्ञानयोगेन साङ्ख्यानां कर्योगेन योगिनाम् ।। ३

हे पापविरहित अर्जुन, मी आधीच सांगितले आहे की या जगात दोन प्रकारच्या निष्ठा असतात. एक ज्ञानयोगाद्वारे सांख्याची, आणि दुसरी कर्मयोगाद्वारे योगींची. ३

नचकर्माणामनारम्भान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ।

नच सन्न्यसनादेव सिद्धिं सनधिगच्छति ।। ४

कर्माची (केवळ) सुरुवात न केल्यामुळे माणसाला नैष्कर्म्याचा अनुभव येऊ शकत नाही. आणि बाह्यतः कर्माचा त्याग केल्यामुळे त्याला सिद्धी वा मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही. ४

टीप - नैष्कर्म्याचा अर्थ आहे मन, वाणी आणि शरीराने कर्म न करण्याचा भाव. परंतु कर्म न करून अशा नैष्कर्म्यतेचा अनुभव माणसाला येऊ शकत नाही. अशा अवस्थेत नैष्कर्म्याचा अनुभव माणसाला कसा येऊ शकतो याचा विचार आता करायचा आहे.

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्य कर्मकृत् ।

कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ।। ५

वास्तवात कोणताही माणूस कर्म केल्याशिवाय एक क्षणभरही राहू शकत नाही. प्रकृतीपासून निर्माण झालेले गुण प्रत्येक पराधीन माणसाला कर्म करायला लावत असतात. ५

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।

इन्द्रियार्थान्विनमूढात्मा मिथ्याचारः स उच्चते ।। ६

जो माणूस कर्म करणाऱ्या इंद्रियांना अडवतो, परंतु त्या इंद्रियांच्या विषयांचे चिंतन करतो त्या मूढात्म्याला मिथ्याचारी म्हणतात. ६

टीप - उदाहरणार्थ जो माणूस वाणीला अडवतो परंतु मनातून कोणाला शिव्या देतो तो नैष्कर्मी नसतो तर मिथ्याचारी असतो.

याचा अर्थ असा नाही की जोपर्यंत मनाला अडवता येत नाही तोपर्यंत शरीराला अडवणे निरर्थक आहे. शरीराला अडवल्याशिवाय मनावर अंकुश निर्माण करताच येऊ शकत नाही. परंतु शरीरावर अंकुश ठेवत असतानाच मनावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

भीती, लाज वा अशाच इतर बाह्य कारणामुळे शरीराला अडवणाऱ्या, परंतु मनाला मात्र न अडवणाऱ्या, एवढेच नाही तर मनाने विषयोपभोग करणाऱ्या आणि संधी मिळताच शरीरानेसुद्धा उपभोग घेणाऱ्या मिथ्याचारी लोकांची इथे निंदा करण्यात आली आहे.

यापुढील श्लोकात याउलट भाव सांगितला आहे.

यत्विन्द्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ।

कर्मेन्द्रियैः कर्मयोगसक्तः स विशिष्यते ।। ७

परंतु हे अर्जुना, जो मनाने इंद्रियांना नियंत्रणात ठेवतो आणि निःसंग होऊन कर्मेंद्रियांद्वारे कर्माची सुरुवात करतो तो श्रेष्ठ पुरुष असतो. ७

टीप - यात बाह्य आणि आतील गोष्टींमध्ये मेळ घालण्यात आला आहे. मनावर नियंत्रण ठेवल्यानंतरही माणूस शरीराद्वारे कोणते ना कोणते काम करीलच. परंतु ज्याचे मन नियंत्रणात असते त्याचे कान दुषित गोष्टी ऐकण्याऐवजी ईश्वराचे भजन ऐकतील, सत्पुरुषांच्या गुणांची प्रशंसा ऐकतील. ज्याच्या ताब्यात त्याचे मन असेल तो माणूस ज्यांना आपण विषयांच्या नावाने ओळखतो त्यात रस घेणार नाही. असा माणूस आत्म्याला शोभेल असेच कर्म करील. अशा प्रकारे कर्म करण्याच्या मार्गाला कर्ममार्ग म्हणतात. ज्या कर्मामुळे शरीराच्या बंधनातून आत्म्याची सुटका होते त्याला कर्मयोग म्हणतात. यात विषयासक्तीला कोणतेही स्थान असू शकत नाही.

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।

शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ।। ८

यामुळे तू तुझे नियत कर्म कर. कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे अधिक चांगले. कर्माशिवाय तुझ्या शरीराचे व्यापारही सुरू राहू शकत नाहीत. ८

टीप - नियत हा शब्द मूळ श्लोकात आला आहे. त्याचा संबंध पुढील श्लोकाशी आहे. मनाद्वारे इंद्रियांना नियंत्रणात ठेवणाऱ्या आणि मोहरहित होऊन कर्म करणाऱ्या माणसाची यात स्तुती करण्यात आली आहे. यामुळेच इथे नियत कर्माची म्हणजेच इंद्रियांना नियंत्रणात ठेवून करावयाच्या कर्माची शिफारस करण्यात आली आहे.

९

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ।

तदर्थ कर्म कौन्तेय मुक्त सङ्गः समाचर ।। ९

यज्ञार्थ करण्यात यावयाच्या कर्माशिवाय इतर कर्मांमुळे या जगात बंधन निर्माण होतात. यामुळे हे कौंतेय तू रागविरहित होऊन कर्म कर. ९

टीप - यज्ञाचा अर्थ आहे परोपकारार्थ केलेले कर्म, लोककल्याणार्थ, ईश्वराकरिता केलेले कर्म.

सहयज्ञः प्रजाःसृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।

अनेन प्रसविष्यध्वमेषवोऽस्त्विकामधुक् ।। १०

देवान्भावयतानेन ते देवा भावयन्तु वः ।

परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ ।। ११

इष्टान्भोगान्ही वो देवा दास्यते यज्ञभाविताः ।

तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव स ।। १२

यज्ञासहित प्रजेला निर्माण करून प्रजापिता ब्रह्मदेव म्हणाले,”या यज्ञाद्वारे तुम्ही बुद्धी मिळवा ती तुम्हाला इच्छित फळ देवो. यज्ञाद्वारे तुम्ही देवांचे पोषण करा आणि ते तुमचे पोषण करो. अशा प्रकारे एक दुसऱ्याचे पोषण करून परम कल्याणाची अवस्था प्राप्त करून घ्या.

यज्ञाद्वारे संतुष्ट देव तुम्हाला इच्छित भोग देतील. जो माणूस मोबदला चुकवल्याशिवाय त्या भोगांचा उपभोग करतो तो निश्चितपणे चोर असतो." १०, ११, १२

टीप - इथे देव शब्दाचा अर्थ आहे भूतमात्र, ईश्वरीसृष्टी. भूतमात्राची सेवा हीच देशसेवा आहे आणि तीच यज्ञ आहे.

यज्ञशिष्टाशिनाः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः ।
भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात ।। १३

जे लोक यज्ञातील अवशिष्ट भाग खातात ते सर्व पापातून मुक्त होतात. जे केवळ स्वतःकरिताच भोजन बनवतात ते पाप खातात. १३

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ।
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ।। १४
कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम ।। १५

अन्नातून भूतमात्र निर्माण होतात, अन्न पावसापासून निर्माण होते, पाऊस यज्ञामुळे होतो आणि यज्ञ कर्मामुळे होतो. तू लक्षात ठेव की कर्म प्रकृतीपासून निर्माण होते, आणि प्रकृती अक्षरब्रह्मापासून निर्माण होते. यामुळे सर्वव्यापी ब्रह्म नेहमीच यज्ञामध्ये उपस्थित असतो.१४, १५

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ।
अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ।। १६

अशा प्रकारे चालणाऱ्या या चक्राचे जो माणूस अनुसरण करत नाही तो आपले जीवन पापपूर्ण बनवतो. तो इंद्रियसुखांमध्ये मग्न राहतो आणि हे पार्थ, त्याचे जीवन व्यर्थ असते. १६

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ।
आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ।। १७

परंतु जो माणूस आत्म्यात मग्न असतो, जो आत्म्यातच तृप्त असतो, आत्म्यातच संतुष्ट असतो त्याच्याकरिता काहीही करण्याची आवश्यकता नसते. १७

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ।

न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थ व्यपाश्रयः ।। १८

कर्म करण्यात वा न करण्यात त्याचा मुळीच स्वार्थ नसतो. भूतमात्राविषयी त्याचा कोणताही वैयक्तिक स्वार्थ नसतो. १८

तस्मादसक्तः सततं कार्य कर्म समाचार ।

असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ।। १९

यामुळे संगविरहित होऊन करण्यायोग्य कर्म तू सतत करत राहा. संगरहित होऊन कर्म करणाऱ्या माणसाला मोक्ष प्राप्त होतो. १९

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ।

लोकसङ्ग्रहमेवापि सम्पश्यन्कर्तमर्हसी ।। २०

जनकासारख्या अनेक लोकांना कर्माद्वारेच परमसिद्धी प्राप्त झाली आहे.

१०

यामुळे लोकसंग्रहाचा विचार करूनसुद्धा तू कर्म केले पाहिजे. २०

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।

स यत्प्रमाणं करुते लोकस्तदनुवर्तते ।। २१

(कारण) उत्तम पुरुष जे कोणते आचरण करतात त्याचे अनुसरण सर्वसामान्य लोक करत असतात. २१

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेशू किञ्चन ।

नानावाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ।। २२

हे पार्थ, माझ्याकरिता तिन्ही लोकांत करण्यासारखे काहीही नाही. आणि असेही काही नाही की एखादी प्राप्तेय गोष्ट मला मिळाली नाही. असे असतानाही मी नेहमी कर्म करत असतो. २२

टीप - सूर्य, चंद्र, पृथ्वी इत्यादींच्या निरंतर आणि अचूक गतीतून ईश्वराचे कर्म सूचीत होते. ही कर्मे मानसिक नाही तर शारीरिक समजली जातील.

ईश्वर निराकार असूनही शारीरिक कर्म करतो हे कसे शक्य आहे अशी शंका घेण्याला इथे वाव नाही कारण तो अशरीरी असूनही शरीरीप्रमाणे व्यवहार करताना दिसून येते. यामुळे तो कर्म करत असतानाही 'अकर्मकृत' आणि अलिप्त असतो.

ज्याप्रमाणे ईश्वराची प्रत्येक कृती यंत्राप्रमाणे काम करत असते त्याचप्रमाणे माणसाने बुद्धिपूर्वक परंतु यंत्राप्रमाणे नियमितपणे काम केले पाहिजे. यंत्रगतीचा अनादर करून स्वच्छंद होण्यात माणसाचा मोठेपणा नसून ज्ञानपूर्वक त्या गतीचे अनुसरण करण्यात आहे ही गोष्ट माणसाला कळली पाहिजे.

माणूस अलिप्त राहून निःसंगपणे यंत्रवत काम करू लागला तर त्यामुळे त्याचे शरीर कधीही क्षीण होणार नाही. तो मृत्यूपर्यंत ताजा आणि स्फूर्तीने भरलेला राहील. शारीर नियमांचे अनुसरण करून आपला वेळ पूर्ण झाल्यानंतर शरीर नष्ट होते, परंतु त्यात वसलेला आत्मा जसाच्या तसा कायम असतो.

यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पारथ सर्वशः ।। २३
उत्सिदेयुरिमेलोका न कुर्या कर्म चेदहम् ।
सङ्करस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ।। २४

मी जर आळस झाडण्याकरिता न थांबता सतत काम करत राहिलो तर हे पार्थ, सर्व प्रकारे लोक माझ्या या उदाहरणाचे अनुसरण करतील. मी जर कर्म केले नाही तर हे सर्व लोक नष्ट होतील. मी अव्यवस्थेकरिता कारणीभूत होऊन सर्व मानवजातीचा विनाश करून टाकीन. २३, २४

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कर्वन्ति भारत ।

कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसङ्ग्रहम् ।। २५

हे भारत, ज्याप्रमाणे अज्ञानी लोक आसक्त होऊन कर्म करतात त्याचप्रमाणे ज्ञानीयाने आसक्तिविरहित होऊन लोककल्याणाच्या इच्छेने कर्म केले पाहिजे. २५

न बुद्धिभेदं जनयेज्ञानां कर्मसङ्गिनाम् ।

जोषयेत्सर्वकर्माणी विद्वान्युक्तः समाचरन् ।। २६

कर्मात आसक्त झालेल्या अज्ञानी माणसाच्या बुद्धीला ज्ञानी माणसाने विचलित करू नये. उलट समत्व कायम ठेवून योग्य प्रकारे कर्म करून अशा माणसाला सर्व कर्म करण्याकरिता त्याने प्रेरित केले पाहिजे. २६

टीप - लोकांनी उलट्या मार्गाने चालून समाजाचा नाश करू नये. या हेतूने त्यांचे मार्गदर्शन करून लोककल्याण साध्य करणे यालाच लोकसंग्रह म्हणतात. - कालेलकर

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ।

अहङ्कारविमूढात्मा कर्ताहमिती मन्यते ।। २७

तत्तवित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ।

गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते ।। २८

सर्व कर्म प्रकृतीद्वारेच केले जातात. परंतु अहंकाराने मूढ झालेला माणूस 'मी कर्ता आहे' असे समजत असतो. या विपरीत हे महाबाहो, गुण आणि कर्माच्या विभागाचे रहस्य जाणणारा माणूस 'गुण गुणावर काम करतात' हे लक्षात ठेवून त्यांच्यावर आसक्त होत नाही. २७, २८

टीप - ज्याप्रमाणे श्वासोच्छवास इत्यादी क्रिया आपोआप होतात, त्यांची माणसाला आसक्ती वाटत नाही आणि जेव्हा या क्रिया करणाऱ्या इंद्रियांना काही व्याधी वा रोग होतो तेव्हाच माणसाला त्यांची काळजी घ्यावी लागत असते. अथवा त्याला आपल्या त्या अवयवांच्या अस्तित्वाची जाणीव होते. अशाच प्रकारे स्वाभाविक कर्म

आपोआप झाले तर त्यांच्याबद्दल आसक्ती वाटत नाही. ज्याचा स्वभाव उदार आहे त्याला स्वतःला आपण उदार आहो याची जाणीवही नसते. दान केल्याशिवाय तो राहूच शकत नाही. माणसाला अशी अनासक्ती अभ्यासाने आणि ईश्वरी कृपेनेच पात्र होत असते.

प्रकृतेर्गुणसम्मूढाः सज्जन्ते गुणकर्मसु ।
तानकृत्स्नविदो मन्दान्कृस्नविन्न विचालयेत ।। २९

प्रकृतीच्या गुणांच्या मोहात पडलेला माणूस गुणांच्या कार्याबद्दल आसक्त असतो. ज्ञानी पुरुषांनी या अज्ञानी मंदबुद्धी लोकांचा बुद्धिभेद होईल असे काही करू नये. २९

११

मयि सर्वाणि सन्न्यस्याध्यात्मचेतसा ।
निराशीनिर्ममो भूत्वा युध्यस्य विगतज्वरः ।। ३०

अध्यात्मवृत्ती ठेवून, सर्व कर्मे मला अर्पण कर आणि आसक्ती आणि ममत्व सोडून तसेच रागविरहित होऊन तू हे युद्ध कर. ३०

टीप - ज्याप्रमाणे सेवक स्वामीच्या आश्रयाने राहतो आणि सर्व काही स्वामीला अर्पण करतो त्याचप्रमाणे जो माणून देहात वास करणाऱ्या आत्म्याला ओळखतो आणि आत्माच परमात्म्याचा अंश आहे हे ज्याला माहीत असते तो माणूस परमात्म्याला सर्व काही अर्पण करील.

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठन्ति मानवः ।
श्रद्धावन्तोऽनसुयन्तो मुच्यन्ते तेऽपि कर्मभिः ।।३१

श्रद्धापूर्वक आणि दोषविरहित होऊन जे याप्रमाणे आचरण करतात तेही कर्मबंधनापासून मुक्त होत असतात. ३१

ये त्वेतभ्यसूयन्तो नानुतिष्ठन्ति मे मतम् ।

सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ।। ३२

परंतु जो माणूस माझ्या या मतात दोष काढतो आणि त्यानुसार आचरण करत नाही तो ज्ञानहीन आणि मूर्ख असतो. त्याचा नाश झालेला अहे असे तू समज. ३२

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ।

प्रकृति यान्ति भूतानि निग्रहः किं करिष्यति ।। ३३

(हे खरे आहे की) ज्ञानी पुरुषही आपापल्या स्वभावाप्रमाणेच वर्तत असतात. प्राणिमात्र आपापल्या स्वभावाचे अनुसरण करत असतात. यात बळजबरी कोणती असू शकते? ३३

टीप - हा श्लोक दुसऱ्या अध्यायातील श्लोक क्रमांक ६१ ते ६८च्या विरोधी नाही. इंद्रियांचा निग्रह करताना माणसाची मरण पत्करण्याचीही तयारी असली पाहिजे. परंतु असे करताना त्याला यश आले नाही तर माणसाचा निग्रह अथवा बळजबरी व्यर्थ ठरतात. यात निग्रहाला दोष देण्यात आलेला नाही. स्वभावाच्या साम्राज्याचे महत्त्व इथे सांगितलेले आहे. 'हा तर माझा स्वभाव आहे' असे म्हणून कोणी जर चुकीच्या मार्गाने जात असेल तर त्याला या श्लोकाचा अर्थ कळला नाही असे समजायला पाहिजे.

आपल्या स्वभावाची आपल्याला कल्पना नसते. प्रत्येक सवय आपला स्वभाव नाही, आणि आत्म्याचा स्वभाव उर्ध्वगामी आहे. यामुळे आत्म्याचे जेव्हा स्खलन होते तेव्हा त्याचा विरोध करणे माणसाचे कर्तव्य असते.

इन्द्रियस्येन्द्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थिती ।

तयोर्न वशमागत्छेत्तौ ह्यस्य परिपन्थिनौ ।। ३४

आपापल्या विषयांसंबंधी इंद्रियांचे रागद्वेष असतातच. (ही गोष्ट लक्षात ठेवून) माणसाने त्या रागद्वेषांमध्ये गुंतू नये, कारण हे दोन्ही माणसाचे शत्रू आहेत. ३४

टीप - कानाचा विषय ऐकणे आहे. जे चांगले असेल ते ऐकणे कानाला आवडते. याला राग म्हणतात. जे चांगले नाही ते ऐकण्याची कानांना इच्छा नसते. याला द्वेष म्हणतात.

'हा तर माझा स्वभाव आहे' असे म्हणून रागद्वेषांना वश होण्याऐवजी माणसाने त्यांना विरोध केला पाहिजे.

आत्म्याचा स्वभाव सुखदु:खापासून अलिप्त राहण्याचा आहे. त्या स्वभावापर्यंत माणसाने पोहोचायला पाहिजे.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।। ३५

दुसऱ्याचा धर्म जरी सुलभ असेल तरी आपला कमी प्रतीचा धर्म त्याहून चांगला असतो. परधर्म भयावह असतो. ३५

टीप - समाजात एका माणसाचा धर्म झाडू काढण्याचा असू शकतो आणि दुसऱ्याचा हिशोब ठेवण्याचा. हिशोब ठेवणाराला जरी समाज श्रेष्ठ मानत असला तरी झाडू काढणाराने आपला धर्म सोडून दिला तर तो भ्रष्ट होईल आणि समाजाची हानी करील.

ईश्वराच्या दरबारात या दोन्हींचे मूल्य त्यांच्या निष्ठेनुसार ठरवले जाईल. ईश्वराच्या दरबारात कोणत्याही व्यवसायाची किंमत सारखी असते. ईश्वरपरायणबुद्धीने जर दोघेही आपले कर्तव्य पार पाडतील तर दोघेही मोक्षाचे समान भागीदार होतील.

१२

अर्जुन उवाच -

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः ।

अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ।। ३६

हे वार्ष्णेय, इच्छा नसतानाही बळजबरी केल्याप्रमाणे माणूस पापकर्मात गुंततो. तो कोणत्या प्रेरणेमुळे? आणि त्याच्या हातून पाप कसे काय घडते? ३६

श्री भगवान उवाच -

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ।

महाशनो महापाप्मा विद्धोनमिह वैरिणम ।। ३७

रजोगुणातून उत्पन्न झालेले हे प्रेरक काम, क्रोध आहेत. त्यांचे पोट कधीही भरत नाही. ते महापापी आहेत. या जगात तू त्यांना आपला शत्रू समज. ३७

टीप - आपला खरा शत्रू आपल्या अंतःकरणात राहणारे काम आणि क्रोध हेच आहेत.

धूमेनव्रियते वन्हिर्यथादर्शो मलेन च ।

यथोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ।। ३८

ज्याप्रमाणे धुराने अग्नी, मळाने आरसा आणि नाळेने गर्भ झाकलेला असतो त्याचप्रमाणे कामक्रोधरूपी शत्रूंनी ज्ञान झाकलेले असते. ३८

आवृत्तं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ।

कामरूपेण कौन्तेय दुष्पूरेणालन च ।। ३९

हे कौंतेय, तृप्त न होणारा हा कामरूपी अग्नी आमचा चिरंतन शत्रू आहे. यामुळे ज्ञानीचे ज्ञान झाकले जात असते. ३९

इन्द्रियाणी मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्चते ।

एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्यदेहिनम् ।। ४०

या शत्रूचे निवासस्थान इंद्रिये, मन, आणि बुद्धी आहेत. यां तिन्हींद्वारे ज्ञानाला झाकून हा शत्रू देहीला - आत्म्याला मोहात टाकत असतो. ४०

टीप - इंद्रिये कामाने व्यापलेली असतात. यामुळे मन मलीन होते. मन मलीन झाल्यामुळे विवेकशक्ती मंद होते आणि विवेकशक्ती मंद झाल्यामुळे ज्ञानाचा नाश होतो. पाहा अध्याय २, श्लोक ६२ ते ६४

तस्मात्त्वमिद्रियाण्यादौनियम्य भरतर्षभ ।

पाप्मानं प्रजहि ह्येन ज्ञानविज्ञाननाशनम ।। ४१

यामुळे हे भरतर्षभ, तू आधी इंद्रियांवर ताबा मिळवून ज्ञान आणि अनुभव यांचा नाश करणाऱ्या या पापींचा निग्रहपूर्वक त्याग कर. ४१

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।

मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः।। ४२

इंद्रिये सूक्ष्म आहेत आणि इंद्रियाहूनही अधिक सूक्ष्म मन आहे, मनाहून सूक्ष्म बुद्धी आहे, आणि बुद्धीपेक्षा सूक्ष्म आत्मा आहे. ४२

टीप - यामुळे इंद्रियांना जिंकले तर त्याहून सूक्ष्म गोष्टींना जिंकणे सोपे होते.

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ।

जहि शत्रूं महाबाहो कामरूपंदुरासदम् ।। ४३

अशा प्रकारे बुद्धीहून सूक्ष्म असलेल्या आत्म्याला ओळखून आणि आत्म्याद्वारे मनावर ताबा मिळवून कामरूपी दुर्जय शत्रूचा तू पराभव कर. ४३

टीप - माणूस जर देहात राहणाऱ्या आत्म्याला ओळखेल तर मन त्याच्या ताब्यात राहील, इंद्रियांच्या ताब्यात राहणार नाही. आणि मनावर जर विजय मिळवता आला तर काम काय करू शकेल?

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला ‘कर्मयोग’ नावाचा तिसरा अध्याय इथे समाप्त होतो.

४. ज्ञानकर्मसंन्यासयोग

या अध्यायात तिसऱ्याच अध्यायाचे अधिक विवेचन करण्यात आले आहे आणि काही वेगवेगळ्या यज्ञांचे यात वर्णन करण्यात आले आहे.

१३

श्री भगवान उवाच -

इमं विवस्तते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।

विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत ।। १

हा अविनाशी योग मी विवस्वानला म्हणजे सूर्याला सांगितला, सूर्याने तो मनूला सांगितला आणि मनूने तो इक्ष्वाकूला सांगितला. १

एवं परम्पराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ।

स कालेनेह महता योगो नष्टः परन्तप ।। २

अशा प्रकारे परंपरेद्वारेप्राप्त झालेल्या या योगाची माहिती राजर्षींना होती. परंतु हे परंतप, नंतर दीर्घ कालावधी लोटल्यामुळे तो लुप्त झाला. २

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ।

भक्तोऽसि मे सखा चेतिरहस्यं ह्येतदुत्तमम् ।। ३

तू माझा भक्त आणि मित्र दोन्ही असल्यामुळे आणि या पुरातन योगात श्रेष्ठ मर्मज्ञान - गूढज्ञान असल्यामुळे मी आज तो तुला सांगितला आहे. ३

अर्जुन उवाच -

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ।

कथमेतद्विजानीयां प्रमादौ प्रोक्तवानिती ।। ४

तुझा जन्म तर आताचा आहे आणि विवस्वानचा जन्म फार पूर्वीच्या काळात झाला आहे. असे असताना हा योग सर्वात आधी तुला माहीत होता हे मी कसे काय मान्य करू? ४

श्री भगवान उवाच -

बहूनि मे व्यतीतानि जन्मनि तव चार्जुन ।

तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परन्तप ।। ५

अरे अर्जुना, माझे आणि तुझेही अनेक जन्म झालेले आहेत.. मला ते माहीत आहेत, परंतु हे परंतप तुला त्यांची माहिती नाही. ५

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ।

प्रकृतिं स्वामधिष्ठाय सम्भवाम्यात्ममायया ।। ६

मी अजन्मा अविनाशी असलो तरी आणि सर्व भूतमात्रांचा ईश्वर असलो तरी माझ्या स्वभावधर्मानुसार माझ्या मायेच्या आधारे मी जन्म धारण करत असतो. ६

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानंधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। ७

हे भारत, जेव्हा जेव्हा धर्म मंद होतो (म्हणजे धर्माची हानी होते) तेव्हा तेव्हा मी जन्म धारण करतो. ७

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।

धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ।। ८

साधूंच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या विनाशाकरिता तसेच धर्माचा पुनरुद्धार करण्याकरिता मी युगायुगांनी जन्म घेत असतो. ८

टीप - इथे श्रद्धाळूंना आश्वासित करण्यात आले आहे आणि सत्यापासून - धर्मापासून कधीही विचलित न होण्याची प्रतिज्ञा आहे. या जगात चढउतार तर येतच असतात, परंतु अखेरीस धर्माचाच विजय होत असतो. संतांचा नाश होत नाही कारण सत्याचा नाश होत नसतो, दुष्टांचा निश्चितपणे नाश होत असतो. असत्याचे कोणतेही

अस्तित्व नसते हे लक्षात घेऊन माणसाने कर्तृत्वाच्या अहंकारात हिंसा करू नये, दुराचार करू नये. यालाच अवतार वा ईश्वराचा जन्म म्हणतात. वास्तवात ईश्वराकरिता जन्म असूच शकत नाही.

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।

त्यक्त्वा देहं पुनर्जन्मनैति मामेति सोऽर्जुन ।। ९

अशा प्रकारे ज्या माणसाला माझ्या दिव्य जन्मांची आणि कर्माच्या रहस्याची कल्पना असते तो हे अर्जुना, देहत्याग केल्यानंतर पुनर्जन्म घेत नसतो तर मला भेटत असतो. ९

टीप - कारण माणसाला जेव्हा खात्री वाटू लागते की ईश्वर सत्याचाच विजय घडवून आणत असतो तेव्हा तो सत्याचा त्याग करत नाही तर धैर्य धारण करून दुःख सहन करतो. तसेच ममतारहित असल्यामुळे जन्ममरणाच्या चक्रातून तो मुक्त होतो व ईश्वराचे ध्यान धरून त्यात लीन होतो.

वीतरागभयक्रोधा मन्मथा मामुपाश्रिताः।

बहवो ज्ञान तपसा पूता मद्भाव मागताः ।। १०

राग, भय, क्रोध यांच्यापासून मुक्त असलेले, माझेच ध्यान करणारे, माझाच आधार घेणारे आणि ज्ञानरूपी तपाने पवित्र झालेले अनेक पुरुष माझ्या स्वरूपाशी एकाकार झाले आहेत. १०

ये यथा मांमप्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम ।

मम वर्तमानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।। ११

माणूस ज्या प्रकारे माझा आधार घेतो तसेच फळ मी त्याला देतो. अशा प्रकारे कोणीही असला तरी हे पार्थ, माणूस माझ्याच मार्गाचे अनुसरण करत असतो, माझ्याच अनुशासनात राहत असतो. ११

टीप - . म्हणजेच कोणताही माणूस ईश्वरी नियमाचे अनुल्लंघन करू शकत नाही. माणूस जसे पेरतो तसेच फळ त्याला मिळते. जसे करतो तसेच भरतो. ईश्वरी नियमाला, कर्माच्या नियमाला कोणताच अपवाद नसतो. सर्वांना समान म्हणजे आपापल्या पात्रतेप्रमाणे न्याय मिळतो.

काङ्क्षन्तः कर्मणां सिद्धिं यजन्त इह देवताः ।

क्षिप्रं हि मानुषे सिद्धिर्भवती कर्मजा ।। १२

कर्माच्या सिद्धीची, फळाची इच्छा करणारे या जगात देवतांची पूजा करतात. कर्मापासून उत्पन्न होणारे फळ या जगात त्यांना ताबडतोब मिळते. १२

टीप - इथे देवतांचा अर्थ स्वर्गात वसलेले इंद्र, वरुण इत्यादी देव नाहीत. देवतांचा अर्थ ईश्वराची आंशिक शक्ती. या अर्थाने माणूसही देवता आहे. वाफ, वीज, इत्यादी महान शक्ती देवता आहेत. यांची आराधना केली तर त्या आराधनेचे फळ आपल्याला ताबडतोब मिळते हे आपण पाहतच असतो. हे फळ क्षणिक असते. या फळांमुळे जिथे आत्मिक समाधानसुद्धा होऊ शकत नाही तिथे यांच्यापासून मोक्ष कसा काय मिळणार?

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ।

तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ।। १३

गुण आणि कर्मानुसार मी चार वर्ण केले आहेत. त्यांचा कर्ता असूनही तू मला त्यांचा अविनाशी अकर्ता समज. १३

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा ।

इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ।। १४

कर्म मला स्पर्श करत नाहीत. त्यांच्या फळांबद्दल मला कोणतीही लालसा नाही अशा रीतीने जे लोक मला ओळखतात ते कर्मबंधनाने बांधले जात नाहीत. १४

टीप - यामुळे भगवान श्रीकृष्ण म्हणतात की कर्म करत असतानाही अकर्मी राहण्याचे माणसासमोर सर्वोत्तम उदाहरण माझे आहे. आणि सर्व कर्माचा कर्ता ईश्वरच आहे, आपण केवळ निमित्तमात्र आहो. असे असल्यामुळे आम्हाला कर्तेपणाचा अभिमान कशाला असायला पाहिजे?

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ।

करु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ।। १५

हे लक्षात घेऊन प्राचीन काळातील मुमुक्षुंनी कर्म केले आहेत. यामुळे ज्याप्रमाणे आपले पूर्वज कर्म करत आले त्याचप्रमाणे तूही कर्म करत राहा. १५

१४

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहितः ।

तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्मा मोक्ष्यसेऽशुभात् ।। १६

कर्म काय आहे आणि अकर्म काय आहे याबद्दल बुद्धिमान लोकही मोहात पडतात. यामुळे कर्माबद्दल मी तुला चांगल्या प्रकारे समजावून सांगेन. ते समजल्यानंतर तू अशुभापासून वाचू शकशील. १६

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।

अकर्मणश्च बोद्धव्यंगहना कर्मणो गतिः ।। १७

कर्म, विकर्म म्हणजे निषिद्ध कर्म आणि अकर्म यांच्यातील भेद कळायला हवा. कर्माची गती गूढ आणि गहन आहे. १७

कर्मण्य कर्म यः पश्येदकर्मणिच कर्म यह ।

स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत ।। १८

जो माणूस कर्मात अकर्म आणि अकर्मात कर्म पाहतो त्याला माणसांमधील बुद्धिमान समजले जाते. तो योगी असतो आणि संपूर्ण रूपाने कर्म करणारा असतो. १८

टीप - कर्म करत असतानाही जो माणूस कर्तेपणाचा अभिमान ठेवत नाही, त्याचे कर्म अकर्म असते. उलट ज्या माणसाने बाह्यतः कर्माचा त्याग केलेला असतो परंतु मनात हवाई किल्ले बांधत असतो त्याचे ते अकर्मही कर्म असते.

पक्षाघात झालेला माणूस जाणूनबुजून म्हणजे प्रयत्नपूर्वक अंग हलवील तेव्हाच पक्षाघात झालेल्या शरीराच्या भागातील इंद्रियांची त्याला हालचाल करता येते. आजारी शरीराच्या इंद्रियांची हालचाल करणारा तो कर्ता होतो. अकर्तेपणा हा आत्म्याचा गुण आहे. जो आत्मा मोहग्रस्त होऊन स्वतःला कर्ता समजतो त्या आत्म्याला जणू पक्षाघात झालेला असतो आणि अहंकारग्रस्त होऊन तो कर्म करत असतो.

अशा प्रकारे ज्या बुद्धिमान योग्याला कर्माची गती कळलेली असते त्यालाच कर्तव्यपरायण म्हणून संबोधले जाते. मी करणारा आहे असे समजणारा पुरुष कर्म आणि विकर्म यांच्यातील भेद विसरतो आणि साधनांच्या सारासारतेचा तो विचार करत नाही. आत्म्याची स्वाभाविक गती ऊर्ध्व आहे. यामुळे माणूस जेव्हा नीतीचा मार्ग सोडतो तेव्हा असे म्हणतात की त्याच्यात निश्चितपणे मीपणाची भावना निर्माण होते. अभिमानविरहित सर्व कर्म सात्त्विक असतात.

यस्य सर्वे समारंभाः कामसङ्कल्प वर्जिताः ।
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ।। १९

ज्या पुरुषाच्या सगळ्या कामांची सुरुवात कामना आणि संकल्पविरहित असते आणि ज्याचे सर्व कर्म ज्ञानरूपी अग्नीने भस्मसात झालेले असतात त्या पुरुषाला ज्ञानी लोक पंडित समजत असतात. १९

त्यक्त्वा कर्मफलासङ्गं नित्यतृप्तो निराश्रयः ।
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किञ्चितकरोति सः ।।२०

कर्मफलाची आसक्ती सोडून जो माणूस सदैव संतुष्ट असतो आणि ज्याला कोणत्याही प्रकारच्या आश्रयाची लालसा नसते तो कर्मात चांगल्या प्रकारे लीन झालेला असला तरी काहीही करत नाही असे म्हणता येऊ शकते. २०

टीप - सांगण्याचा अर्थ हा की त्याला कर्मबंधत भोगावे लागत नाहीत.

निराशीर्यचित्तात्मा त्यक्त सर्व परिग्रहः ।

शरीरंकेवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। २१

जो आशारहित असतो, ज्याचे मन त्याच्या ताब्यात असते, ज्याने सर्व प्रकारच्या संग्रहाचा त्याग केलेला असतो आणि ज्याचे केवळ शरीरच कर्म करत असते तो कर्म करत असतानाही दोषाचा भागीदार होत नाही. २१

टीप - कर्म कितीही सात्त्विक असले तरी जर ते अभिमानाने केलेले असेल तर ते बंधनकारक होते. कर्म जेव्हा ईश्वरार्पण बुद्धीने अभिमानाची भावना न ठेवता केले जाते तेव्हाच ते बंधनविरहित होते. मी शून्यतेच्या पातळीवर पोहोचलो, माझे केवळ शरीरच कार्य करत असते असे त्याच माणसाला म्हणता येऊ शकते. जो कैदी इच्छा नसतानाही दडपणामुळे नांगर चालवतो त्याचे केवळ शरीरच काम करत असते. जो माणूस स्वतःहोऊन ईश्वराचा कैदी होतो त्याचेही केवळ शरीरच काम करत असते कारण तो स्वतः शून्य झालेला असतो.

यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ।

समः सिद्धवसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते ।। २२

जो माणूस विनासायास मिळालेल्या लाभात खुश राहतो, जो सुखदुःखाच्या द्वंद्वातून मुक्त झालेला असतो, जो द्वेषरहित झालेला असतो आणि जो यशापयशाबद्दल तटस्थ झालेला असतो तो कर्म करतानाही कर्मबंधनात बंदिस्त होत नाही. २२

गतसङ्गस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ।

यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ।। २३

जो मणूस आसक्तिविरहित असतो, ज्याचे चित्त ज्ञानात स्थिरावलेले असते, जो मुक्त असतो केवळ तोच यज्ञाच्या भावनेने कर्म करत असतो. यामुळे त्याच्या सर्व कामनांचा लय होतो. २३

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रम्हाग्नौ ब्रह्मणा हुतम् ।

ब्रहौव तेन गंतव्य ब्रह्मकर्मसमाधिना ।। २४

(यज्ञात) अर्पणाची क्रिया ब्रह्म आहे, हवी म्हणजे हवन करायची वस्तूही ब्रह्म आहे. अशा प्रकारे कर्माबरोबर ज्याने यज्ञाचा मेळ साधला आहे त्याला ब्रह्मप्राप्ती होते. २४

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ।

ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ।। २५

श्रोत्रादीनीन्द्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ।

शब्दादीन्विषयानन्य इन्द्रियाग्निषु जुह्वती ।। २६

याशिवाय काही योगी देवतांच्या पूजेच्या स्वरूपातील यज्ञच करत असतात, तर इतर काही ब्रह्मरूपी अग्नीत यज्ञाद्वारा यज्ञाचाच हवी देत असतात. आणि इतर काही योगी श्रवणादी इंद्रियांच्या संयमाचे यज्ञ करत असतात, आणि अजून काही शब्दादी विषयांना इंद्रियरूपी अग्नीत होमत असतात. २५, २६

टीप - ऐकणे वगैरे क्रियांचा संयम करणे एक गोष्ट आहे आणि इंद्रियांचा उपयोग करत असतानाही त्यांच्या विषयांना प्रभूच्या कामात घेणे - उदाहरणार्थ भजन वगैरे ऐकणे - दुसरी गोष्ट आहे. परंतु वास्तवात या दोन्ही गोष्टी एकच आहेत.

सर्वाणीन्द्रियकर्माणी प्राण कर्माणि चापरे ।

आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ।। २७

दुसरे योगी लोक इंद्रियांच्या तसेच प्राणाच्या सर्व कर्मांना ज्ञानरूपी दीपकाने पेटवलेल्या होमाग्नीत होमतात. २७

टीप - म्हणजेच परमात्म्यात तन्मय होतात.

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।

स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रतः ।। २८

अशा प्रकारे कोणी यज्ञात द्रव्य देणारे असतात, कोणी तप करणारे असतात, कोणी अष्टांग योगसाधना करणारे असतात, जेव्हा की इतर काही स्वाध्याय आणि ज्ञानयज्ञ करत असतात. हे सर्व तीक्ष्ण व्रतधारी याज्ञिक आहेत. २८

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथापरे ।

प्राणापानगतीरुद्ध्वा प्राणायामपरायणाः ।। २९

इतर काही प्राणायामाकरिता तत्पर असणारे योगी अपानवायूला प्राणवायूत होमतात अथवा प्राणवायू आणि अपानवायू या दोन्हींना अडवतात. २९

टीप - तीन प्रकारचे प्राणायाम आहेत - रेचक, पूरक आणि कुंभक.

संस्कृतमध्ये प्राणवायूचा अर्थ सामान्यपणे समजला जातो त्यापेक्षा उलट आहे. हा प्राणवायू आतून बाहेर पडणारा आहे. आपण जो वायू आत घेतो त्याला प्राणवायू वा ऑक्सिजन म्हणून आपण ओळखतो.

अपरेनियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ।

सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ।। ३०

आणि इतर काही आहाराचा संयम करून प्राणाला प्राणातच होमतात. यज्ञाद्वारे ज्यांनी आपल्या पापाला क्षीण केलेले असते अशा या सर्व लोकांना यज्ञाची माहिती असते. ३०

यज्ञशिष्टामृतभुजो यान्ति ब्रह्म सनातनम् ।

नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ।। ३१

हे कुरुसत्तम, यज्ञातून वाचलेले अमृत खाणाऱ्या लोकांना सनातन ब्रह्म प्राप्त होते. जो माणूस यज्ञ करत नाही त्याच्याकरिता जिथे हा लोकही राहत नाही तिथे परलोक कसा काय राहू शकेल? ३१

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ।

कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ।। ३२

अशा प्रकारे वेदांमध्ये अनेक प्रकारच्या यज्ञांचे वर्णन करण्यात आले आहे. हे सर्व यज्ञ कर्मामधून उत्पन्न झालेले आहेत हे तू लक्षात ठेव. या ज्ञानाने तुला मोक्षप्राप्ती होईल. ३२

टीप - इथे 'कर्म' या शब्दाचा व्यापक अर्थ आहे - शारीरिक, आत्मिक आणि मानसिक. अशा कर्मांशिवाय यज्ञ होऊ शकत नाही. यज्ञाशिवाय मोक्षप्राप्ती होऊ शकत नाही. हे कळण्याचा आणि या ज्ञानानुसार आचरण करण्याचा अर्थ आहे यज्ञाचे रहस्य कळणे.

सांगण्याचा आशय हा आहे की माणसाने आपल्या शरीराच्या, बुद्धीच्या आणि आत्म्याच्या शक्तीचा उपयोग प्रभूप्रित्यर्थ - लोकसेवेर्थ - केला नाही तर तो चोर सिद्ध होईल. तो मोक्षाकरिता योग्य ठरू शकत नाही. जो माणूस केवळ आपल्या बौद्धिक शक्तीचा उपयोग करतो आणि शरीराच्या आत्म्याच्या शक्तीचा उपयोग करत नाही तो पूर्ण याज्ञिक नसतो. या तिन्ही शक्तींचा मेळ साधल्याशिवाय यांचा परोपकारार्थ उपयोग होऊ शकत नाही. यामुळे आत्मशुद्धीशिवाय शुद्ध लोकसेवा असंभव आहे. सेवकाने आपल्या शारीरिक, बौद्धिक आणि आत्मिक अशा तिन्ही शक्तींचा विकास केला पाहिजे.

१५

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परन्तप ।

सर्व कर्माखिलं पात्र ज्ञाने परिसमाप्यते ।। ३३

हे परंतप, द्रव्ययज्ञापेक्षा ज्ञानयज्ञ चांगला आहे कारण हे पार्थ, सर्व कर्म ज्ञानातच पराकोटीला पोहोचतात. ३३

टीप - परोपकार वृत्तीने दिलेले द्रव्यही ज्ञानपूर्वक दिले नाही तर अनेकदा हानिकारक सिद्ध होते असा अनुभव कोणाला येत नाही? शुभ वृत्तीने केलेली सर्व कामे तेव्हाच शोभा देतात जेव्हा त्यांच्याशी ज्ञानाचे मीलन झालेले असते. यामुळे सर्व कर्मांची पूर्णाहुती ज्ञानातच होत असते.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।

उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ।। ३४

तत्व जाणणाऱ्या ज्ञानी लोकांची सेवा करून आणि नम्रतापूर्वक त्यांना वारंवार विवेकपूर्ण प्रश्न विचारून तू हे ज्ञान मिळव. ते तुझी जिज्ञासा पूर्ण करतील. ३४

टीप - ज्ञान मिळवण्याच्या तीन अटी - प्रणिपात, परिप्रश्न, आणि सेवा - अतिशय काळजीपूर्वक लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. प्रणिपात म्हणजे नम्रता, विवेक. परिप्रश्नचा अर्थ आहे वारंवार विचारणे. सेवाविरहित नम्रता खुशामत समजली जाऊ शकते. यामुळे अतिरिक्त शोध आणि चौकशीशिवाय ज्ञानप्राप्ती शक्य नाही. समजत नाही तोपर्यंत शिष्याने गुरूला नम्रपणे प्रश्न विचारत राहिले पाहिजे. हे जिज्ञासेचे चिन्ह आहे. यात श्रद्धेची आवश्यकता असते. ज्या गुरूबद्दल आपल्या मनात श्रद्धा नसते त्याच्याबद्दल अंतःकरणापासूनची नम्रता असू शकत नाही. असे असताना आमच्याकडून त्याची सेवा कशी काय होऊ शकते?

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पाण्डव ।

येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यातमन्यथो मयि ।। ३५

हे पांडवा, हे ज्ञान मिळाल्यानंतर तुला परत मोह होणार नाही. या ज्ञानाद्वारे तू प्राणिमात्रांना स्वतःत आणि माझ्यात पाहशील. ३५

टीप - पिंडी ते ब्रह्मांडीचा हाच अर्थ आहे, ज्याला आत्मदर्शन झाले आहे त्याला स्वतःच्या आणि इतरांच्या आत्म्यात कोणताही भेद दिसत नाही.

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तम ।

सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं सन्तरिष्यसि ।। ३६

सर्व पाप्यांमध्ये तू जरी सर्वात मोठा पापी असलास तरी ज्ञाननौकेच्या मदतीने तू सर्व पापांना ओलांडून पलीकडे जाशील. ३६

यथैधांसी समिद्धोऽग्निर्भस्मसातकुरुतेऽर्जुन ।

ज्ञानाग्नीः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ।। ३७

हे अर्जुना ज्याप्रमाणे प्रज्ज्वलित अग्नी इंधनाला जाळून भस्म करून टाकतो त्याचप्रमाणे ज्ञानरूप अग्नी सर्व कर्मांना जाळून भस्म करतो. ३७

न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

तत्स्वयं योगसंसिद्ध कालेनात्मनि विन्दति ।। ३८

या जगात ज्ञानासारखी पवित्र आणि शुद्ध करणारी इतर कोणतीही गोष्ट नाही. योगात म्हणजे समत्वात पूर्णत्व प्राप्त झालेला माणूस वेळ मिळताच स्वतःमध्ये ज्ञान मिळवतो. ३८

श्रद्धावॉंलभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।

ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ।। ३९

श्रद्धावान, ईश्वरपरायण आणि जितेंद्रिय पुरुष ज्ञान मिळवतो आणि ज्ञानप्राप्ती होताच त्याला परम शांती मिळते. ३९

अज्ञश्चाश्रद्‍धानश्च संशयात्मा विनश्यति ।

नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशायात्मनः ।। ४०

जो माणूस अज्ञान आणि अश्रद्धा यांच्यामुळे संशयात असतो त्याचा नाश होतो. संशयी माणसाकरिता ना तर हा लोक आहे ना परलोक. त्याला कुठेही सुख मिळत नाही. ४०

योगसन्न्यस्तकर्माणं ज्ञानसञ्छिन्नसंशयम् ।

आत्मवंतं न कर्माणि निबद्धन्ति धनंजय ।। ४१

समत्वरूपी योगाद्वारे ज्यानेज्याने कर्मांचा म्हणजे कर्मफलांचा त्याग केला आहे आणि ज्ञानाद्वारे संशयाचा नाश केला आहे त्या आत्मदर्शीकरिता हे धनंजय कर्म बंधनकारक होत नाही. ४१

तस्मादज्ञानसम्भुतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ।

छित्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ।। ४२

म्हणून हे भारत, हृदयात निर्माण झालेल्या संशयाचा आत्मज्ञानरूपी तलवारीने नाश कर आणि योगरूपी समत्व धारण करून उभा राहा. ४२

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'ज्ञानकर्मसंन्यासयोग' नावाचा चौथा अध्याय इथे समाप्त होतो.

५. कर्मसंन्यास योग

कर्मयोगाशिवाय कर्मसंन्यास होऊच शकत नाही आणि वास्तवात हे दोन्ही एकच आहेत असे या अध्यायात सांगण्यात आले आहे.

१६

अर्जुन उवाच -

सन्न्यासं कर्मणा कृष्ण पुनर्योगं च शंससि ।

यच्छ्रेय एतयोरेकम तन्मे ब्रुहि सुनिश्चितम् ।। १

हे कृष्णा, तू कर्मत्यागीची आणि कर्मयोगीची सारखीच स्तुती करतोस. परंतु या दोन्हींमध्ये श्रेयस्कर काय आहे ते तू मला सांग. १

श्री भगवान उवाच -

सन्न्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ।

तयोस्तु कर्मसन्न्यासात्कर्मयोगो विशिष्यते ।। २

कर्मसंन्यास आणि कर्मभोग हे दोघेही मोक्ष देणारे आहेत. परंतु या दोघांत कर्मयोग कर्मसंन्यासापेक्षश्रेष्ठ आहे. २

ज्ञेयः स नित्यसन्न्यासी यो न द्वेष्टि न काङ्क्षति ।

निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ।। ३

जो माणूस कोणाचाही द्वेष करत नाही आणि कशाचीही इच्छा करत नाही त्याला नेहमीच संन्यासी समजायला पाहिजे. कारण हे महाबाहो जो माणूस सुखदुःखांच्या द्वंद्वांपासून मुक्त आहे तो सहजपणे (कर्म)बंधनातूनमुक्त होतो. ३

टीप - इथे हे सांगण्याचा हेतू आहे की कर्मत्याग संन्यासाचे मुख्य लक्षण नाही तर द्वंद्वातीत होणे मुख्य लक्षण आहे. एक माणूस कर्म करत असतानाही संन्यासी होऊ शकतो तर दुसरा कर्म न करताही मिथ्याचारी असू शकतो. पाहा अध्याय ३, श्लोक ६.

साङ्ख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदन्ति न पण्डिताः ।

एकमप्यास्थितःसम्यगुभयोर्विंन्दते फलम् ।। ४

सांख्य आणि योग म्हणजेच ज्ञान आणि कर्म हे दोन वेगवेगळे आहेत असे अज्ञानी लोक म्हणतात, पंडित नाही. यापैकी कोणत्याही एकात राहणाऱ्या माणसाला दोन्हींचेही फळ मिळते. ४

टीप - लोकसंग्रहरूपी कर्मयोगाचे जे विशेष फळ आहे ते ज्ञानयोगी केवळ संकल्प करून प्राप्त करून घेतो तर कर्मयोगी बाह्यतः कर्म करत असतानाही आपल्या अनासक्तीमुळे ज्ञानयोग्याच्या शांततेचा सहजपणे उपभोग घेतो.

यत्साङ्ख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ।

एकं साङ्ख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ।। ५

सांख्यमार्गी जे स्थान मिळवतो तेच स्थान ज्ञानयोगीही मिळवतो. जो माणूस सांख्य आणि योग यांना एकाच रूपात पाहतो तोच खऱ्या अर्थाने पाहत असतो. ५

सन्न्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ।

योगयुक्तो मुनिर्ब्रह्म नचिराणाधिगच्छति ।। ६

हे महाबाहो, कर्मयोगाशिवाय कर्मसंन्यास सिद्ध करणे अतिशय कठीण असते. परंतु समत्ववान मुनीला फार लवकर मोक्षप्राप्ती होते. ६

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेन्द्रियः ।

सर्व भूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ।। ७

ज्याने योगसिद्धी केलेली असते, ज्याने आपले हृदय शुद्ध बनवलेले असते ज्याने मन आणि इंद्रिये यांच्यावर विजय मिळवलेला असतो, जो सर्व प्राणिमात्रांना समान समजतो तो माणूस कर्म करत असतानाही त्यापासून अलिप्त असतो. ७

नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ।

पश्यञ्श्रृण्वन्स्पृशञ्जिघ्नन्नश्नन्गच्छन्स्वपञ्श्वसन ।। ८

प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निमिशन्नपि ।

इन्द्रियाणीन्द्रियार्थेषु वर्तन्त इति धारयन् ।। ९

सत्याचे ज्ञान असणारे योगी पाहत असताना, ऐकत असताना, स्पर्श करत असताना, वास घेत असताना, खात असताना, चालत असताना अथवा डोळ्यांची उघडझाप करत असताना केवळ इंद्रियेच आपापली कामे करत आहेत अशी भावना ठेवतो व 'मी काहीही करत नाही' असे समजतो. ८, ९

टीप - जोपर्यंत माणसाला वासना आणि देहाभिमान असतो तोपर्यंत अशी अलिप्तावस्था येऊ शकत नाही. यामुळेच विषयांचा भोग मी करत नाही, इंद्रिये आपापली कामे करत आहेत असे म्हणून विषयासक्त माणूस आपली सुटका करून घेऊ शकत नाही. असा अनर्थ करणाऱ्या माणसाला ना तर गीता समजते ना धर्म. पुढील श्लोक ही गोष्ट स्पष्ट करतो.

ब्रह्मण्याधाय कर्माणि सङ्गं त्यक्त्वा करोति यः ।

लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।। १०

जो माणूस आपले कर्म ब्रह्मसमर्पित करतो तो पापांपासून तशाच प्रकारे अलिप्त असतो ज्याप्रमाणे पाण्यात राहणारे कमलपत्र पाण्यापासून अलिप्त असते. १०

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिन्द्रियैरपि ।

योगिनः कर्म कुर्वन्ति सङ्गं त्यक्त्वात्मसुद्धये ।। ११

शरीर, मन बुद्धी अथवा इंद्रिये यांच्यापासून आसक्तिविरहित राहून योगीलोक आत्मशुद्धीकरिता कर्म करत असतात. ११

युक्तः कर्मफलंत्यक्त्वा शान्तिमाप्नोति नैष्ठिकीम् ।

अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबध्यते ।। १२

समतावान योगी कर्मफलांचा त्याग करून परम शांती मिळवत असतो. उलट रागद्वेष असणारा माणूस कामनांनी प्रेरित झालेला असल्यामुळे कर्मफलात आसक्त होतो व परिणामी कर्मबंधनात अडकतो. १२

सर्वकर्माणि मनसा सन्न्यस्यास्ते सुखं वशी।

नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ।। १३

संयमी पुरुष मनाने सर्व कर्मांचा त्याग करून नऊ दारांच्या नगरात राहतो. असे असतानाही तो ना तर काही करत असतो आणि ना काही करवून घेत असतो.अशा प्रकारे तो तिथे सुखात राहतो. १३

टीप - दोन नाकपुड्या, दोन कान, दोन डोळे, मलनिःसारणाची दोन ठिकाणे आणि तोंड अशी शरीराची नऊ प्रमुख दारे आहेत. तसे पाहिले तर कातडीला असलेली असंख्य छिद्रेही शरीराची दारे आहेत.

या दारांवरील पहारेकरी केवळ या दारांमधून येजा करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच येजा करू देऊन आपल्या धर्माचे पालन करत असेल तर ती येजा सुरू असतानाही पहारेकरी त्यात भाग घेत नाही, तो केवळ त्यांचा साक्षी असतो. यामुळे तो ना तर काही करतो ना करवितो असे म्हणता येऊ शकते.

१७

न कर्तृत्वं न कर्माणी लोकस्य सृजती प्रभुः

न कर्फलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ।। १४

जगत्प्रभू कर्तेपणाची रचनाही करत नाही आणि कर्माचीही रचना करत नाही. तसेच तो कर्म आणि फळ यांचा समन्वयही करत नाही. प्रकृतीच सर्व काही करत असते. १४

टीप - ईश्वर कर्ता नाही. कर्माचा नियम अचल आणि अनिवार्य आहे. आणि माणूस जसे करतो तसेच त्याला भरावे लागत असते. यातच ईश्वराची महाकृपा समाविष्ट आहे. त्याचा न्याय समाविष्ट आहे. शुद्ध न्यायात शुद्ध दया असते. शुद्ध न्यायाच्या विरोधात नसलेली दया खरी दया नसते तर क्रूरता असते. परंतु माणूस त्रिकालदर्शी नाही. यामुळे माणसाकरिता दया-क्षमा हाच न्याय आहे.तो स्वतःच सदैव न्यायाकरिता पात्र असल्यामुळे क्षमेचा याचकही असतो. क्षमा करूनच तो इतरांसोबत न्याय करू शकतो. स्वतःमध्ये तो क्षमेचा गुण विकसित करील तर तो अखेरीस अकर्ता, योगी, समतावान आणि कर्मकुशल होऊ शकतो.

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यति जन्तवः ।। १५

ईश्वर कोणाचेही पापपुण्य आपल्या डोक्यावर घेत नसतो. अज्ञानाने ज्ञान झाकले जाते आणि त्यामुळे प्राणी मोहात फसतात. १५

टीप - माणूस अज्ञानाने 'मी करतो' या भावनेने कर्मबंधनात फसतो. असे असले तरीही चांगल्यावाईट फळांचा आरोप तो ईश्वरावर करतो. हे मोहजाल आहे.

ज्ञानेन तू तदज्ञानं येषां नासितमात्मनः ।
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम्।। १६

परंतु आत्मज्ञानाद्वारे ज्या माणसाच्या अज्ञानाचा नाश होतो त्या माणसाचे सूर्यासारखे प्रकाशमय ज्ञान परम तत्त्वाचे दर्शन घडवते. १६

तद्बुद्धयस्तदात्मानस्तनिष्ठास्तत्परायणाः ।
गच्छन्त्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूत कल्मषाः ।। १७

ज्ञानाने पाप धुतले गेले आहेत अशा लोकांना, ईश्वराचे ध्यान करणारांना, ईश्वरमय झालेल्यांना, ईश्वरात स्थिर राहणारांना आणि ईश्वरालाच सर्वस्व मानणारांना मोक्षप्राप्ती होत असते. १७

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।

शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ।। १८

विद्वान, विनयी ब्राह्मण, गाय, मोठे हत्ती, कुत्रे तसेच कुत्रे खाणारे,चांडाळ या सर्वांबद्दल ज्ञानी लोक समभावना ठेवत असतात. १८

टीप - म्हणजेच कोणताही भेदभाव न करता आवश्यकतेप्रमाणे ते समभावनेने ते सर्वांची सेवा करत असतात. ब्राह्मण आणि चांडाळ यांच्याबद्दल समभावना ठेवण्याचा अर्थ आहे ब्राह्मणाला सर्पदंश झाल्यानंतर ज्याप्रमाणे तो त्याचे विष शोषून घेईल त्याचप्रमाणे तो चांडाळाला सर्पदंश झाला तर त्याचेही विष शोषून घेईल. असा प्रकारे तो सर्वांशी समान व्यवहार करील.

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।

निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद् ब्रह्मणि ते स्थिताः ।। १९

ज्या लोकांचे मन समत्वात स्थिर असते ते या देहात राहत असतानाही जन्ममरणाच्या चक्रावर विजय मिळवतात. ब्रह्म निष्कलंक आहे आणि समदृष्टी असणारे आहे. यामुळे असे लोक ब्रह्मातच स्थिर होतात. १९

टीप - माणूस जसे आणि ज्याचे चिंतन करतो तसाच तो होतो. यामुळे समत्वाचे चिंतन करून निर्दोष होऊन समत्वमूर्तीप्रमाणे तो निर्दोष ब्रह्मप्राप्ती करतो,

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेतप्राप्य चाप्रियम् ।

स्थिरबुद्धिरसम्मूढो ब्रह्मविद् ब्रह्मणि स्थिताः ।। २०

ज्या माणसाची बुद्धी स्थिर झालेली असते, ज्याचा मोह नष्ट झालेला असतो ज्याला ब्रह्मज्ञान असते आणि जो ब्रह्मात स्थिर असतो त्याला प्रिय गोष्ट प्राप्त झाल्याने सुख होत नाही आणि अप्रिय गोष्ट मिळाली तर दुःख होत नाही. २०

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विन्दत्यात्मनी यत्सुखम् ।

स ब्रह्मयोग युक्तात्मा सुखमक्षयमश्नुते ।। २१

बाह्य गोष्टीत आसक्ती न ठेवणाऱ्या पुरुषाला अंतःकरणातून जो आनंद मिळतो तोच अक्षय आनंद ब्रह्मपरायण पुरुषालाही प्राप्त होत असतो. २१

टीप - जो माणूस अंतर्मुख झालेला असतो त्यालाच ईश्वराचा साक्षात्कार होत असतो आणि त्यालाच परमोच्च आनंदाची प्राप्ती होत असते. विषयांपासून निवृत्त होऊन कर्म करणे आणि ब्रह्मसमाधीत लीन होणे या दोन गोष्टी भिन्न नसून एकाच गोष्टीकडे पाहण्याचे दोन दृष्टिकोन आहेत, एकाच नाण्याच्या या दोन बाजू आहेत.

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनव एव ते ।

आद्यन्तवंतः कौन्तेय न तेषू रमते बुधः ।। २२

विषयांपासून निर्माण होणारे भोग निश्चित दुःखाचे कारण आहेत. हे कौंतेय, त्यांना आदी आणि अंत आहे म्हणजेच ते अनित्य आहेत. समंजस माणूस त्यात आनंद मानत नाही. २२

शक्नोतीहैव यः सोढूं प्राक्शरीरविमोक्षणात् ।

कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ।। २३

शरीराचा त्याग करावा लागण्यापूर्वीच जो माणूस काम आणि क्रोध यांच्या आवेगावर विजय मिळवतो आणि याच देहात असताना म्हणजे याच जन्मात त्यांना पचवण्याची शक्ती मिळवतो त्यांच्यातच समत्वाची भावना सिद्ध झालेली असते व तोच सुखी असतो. २३

टीप - मृत शरीराकरिता ज्याप्रमाणे इच्छा वा द्वेष नसतात, सुखदुःख नसतात त्याचप्रमाणे जो माणूस जिवंत असतानाही मृताप्रमाणे, जडभरताप्रमाणे, देहातीत होऊन राहू शकतो तोच या जगात विजयी होऊन राहत असतो आणि त्यालाच खऱ्या आत्मसुखाचा अनुभव मिळत असतो.

योऽन्तःसुखोऽन्तरारामस्तथान्तर्ज्योतिरेव यः

स योगी ब्रह्मनिर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छति ।। २४

ज्याला आतील आनंदाचा अनुभव येतो, ज्याला आंतरिक शांती मिळालेली असते, ज्याला अंतर्ज्ञान प्राप्त झालेले असते, तो योगी ब्रह्मस्वरूप होऊन ब्रह्मनिर्वाण प्राप्त करत असतो. २४

लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ।

छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रतः ।। २५

ज्याचे पाप नष्ट झालेले आहेत, ज्याच्या शंका आणि द्विधा मनःस्थिती संपलेल्या आहेत, ज्यांनी मनावर ताबा मिळवलेला आहे आणि जे प्राणिमात्रांच्या हितार्थ कामाला लागलेले असतात ते ऋषी ब्रह्मनिर्वाण प्राप्त करत असतात. २५

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ।

अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ।। २६

जे स्वतःला ओळखतात, ज्यांनी काम आणि क्रोधांवर विजय मिळवला आहे, ज्यांनीज्यांनी मनावर ताबा मिळवला आहे अशा यतींकरिता सर्वत्र ब्रह्मनिर्वाणच असते. २६

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवोः ।

प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ।। २७

यतेन्द्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ।

विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः ।। २८

जो मुनी बाह्य विषयांचा बहिष्कार करून, दोन भुवयांमध्ये दृष्टी स्थिर करून नाकाच्या मार्गाने जाणारा आणि येणारा प्राणवायू आणि अपान वायू यांची गती समान ठेवतो तसेच मनबुद्धीला ताब्यात ठेवून भयक्रोधविरहित झालेला असतो तो मोक्षपरायण मुनी सदैव सुखी असतो. २७, २८

टीप - प्राणवायू आतून बाहेर जाणारा आणि अपान वायू बाहेरून आत येणारा आहे. या श्लोकात प्राणायाम इत्यादी क्रियांचे समर्थन करण्यात आले आहे. प्राणायाम इत्यादी बाह्य क्रिया आहेत आणि त्यांचा उपयोग शरीर स्वस्थ ठेवण्याकरिता आणि परमेश्वराला राहण्यालायक ते मंदिर व्हावे म्हणून आहे. भोगींकरिता व्यायाम इत्यादींची मदत इंद्रियांना उत्तेजित करण्याकरिता होत असते. शरीर निरोगी आणि काटक बनवत असतानाच प्राणायामादी क्रिया इंद्रियांना शांत ठेवण्याकरिता योगीला मदत करत असतात. आजच्या काळात प्राणायामादी क्रिया फार कमी लोकांना येतात आणि ज्यांना त्या येतात त्यांच्यातील फार कमी लोक त्यांचा सदुपयोग करतात. इंद्रिये, मन, आणि बुद्धी यांच्यावर ज्या लोकांनी किमान प्राथमिक विजय मिळवला आहे, ज्यांना मोक्षाची तीव्र इच्छा आहे, आणि ज्यांनी रागद्वेषादींना जिंकून भीतीचा त्याग केला आहे त्यांच्याकरिता प्राणायामादी क्रिया निश्चितच उपयोगी आणि सहाय्यक सिद्ध होतील.

आंतरिक शुद्धी नसल्यास प्राणायामादी क्रिया बंधनांचे साधन होतील आणि त्या माणसाला बंधनांच्या अधिक खोल विहिरीत ढकलू शकतील, नव्हे ढकलतात असा अनेकांचा अनुभव आहे. यामुळे योगींद्र पतंजलींनी यमनियमांना प्रथम स्थान दिले असून त्यांना सिद्ध करण्याकरिता प्राणायामादी क्रियांना मोक्षमार्गातील सहायकाचे स्थान दिले आहे.

यम पाच आहेत - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, आणि अपरिग्रह.

नियम पाच आहेत - शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान.

भोक्तारं यज्ञतपसांसर्वलोकमहेश्वरम् ।

सुहृदं सर्वभूतानंज्ञात्वा मां शान्तिमृच्छती ।। २९

मला यज्ञ आणि तपाचा भक्त तसेच सर्व लोकांचा महेश्वर आणि भूतमात्रांचा हितकर्ता समजणारे (मुनी) शांती प्राप्त करतात. २९

टीप - हा श्लोक या अध्यायातील १४व्या आणि १५व्या अध्यायातील श्लोकांच्या तसेच इतर श्लोकांच्या विरोधी आहे असे कोणी समजू नये. ईश्वर सर्वशक्तिमान असल्यामुळे तो कर्ता-अकर्ता, भोक्ता-अभोक्ता असे जे म्हणाल ते आहे. तो अवर्णनीय आहे. तो मानवी भाषेपलीकडील आहे. यामुळे त्याच्यावर परस्पर विरोधी गुणांचा आरोप करूनही माणूस त्याच्या दर्शनाची अपेक्षा ठेवू शकतो.

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'कर्मसंन्यासयोग' नावाचा पाचवा अध्याय इथे समाप्त होतो.

६. ध्यानयोग

या अध्यायात योगसाधनेची म्हणजेच समत्व सिद्ध करणारी काही साधने सांगितली आहेत

१८

श्री भगवान उवाच -

अनाश्रितः कर्मफलं कार्य कर्म करोति यहः ।

स सन्न्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ।। १

जो माणूस कर्मफलाचा आश्रय घेतल्याशिवाय विहीत कर्म करतो तो माणूस संन्यासीही असतो आणि योगीही असतो. जो माणूस अग्नीचा म्हणजे अग्निहोत्राचा त्याग करतो तो माणूस नसतो. १

टीप - इथे 'विहित'चा अर्थ आहे कर्तव्याच्या स्वरूपात प्राप्त झालेला. अग्नीचा अर्थ आहे साधनमात्र. जेव्हा अग्नीद्वारे होम होत होता तेव्हा अग्नीची आवश्यकता असायची. संन्यासी होम करत नव्हते म्हणून त्यांना निरग्नी म्हणत असत.

कल्पना करा की आजच्या जगात चरखा सेवेचे साधन आहे. असे असल्यास चरख्याचा त्याग करून कोणीही संन्यासी होऊ शकत नाही.

यं सन्न्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पाण्डव ।

न ह्यसंन्यस्त सङ्कल्पो योगी भवति कश्चन ।। २

हे पांडवा, ज्याला संन्यास समजतात तोच योग आहे असे तू समज. ज्याने मनाने संकल्पाचा त्याग केला नाही तो कधीही योगी होऊ शकत नाही. २

आरुरुक्षोर्मुनेयोगं कर्म कारणमुच्यते ।

योगारूढस्य तस्यैव शमः कारममुच्यते ।। ३

योग साध्य करू इच्छिणाऱ्या माणसाकरिता कर्म साधन असते. ज्याने योग सिद्ध केला त्याच्याकरिता उपशम म्हणजेच विरती, शांती साधन असतात. ३

टीप - ज्या माणसाची आत्मशुद्धी झालेली असते, ज्याने समभावना मिळवलेली असते त्याच्याकरिता आत्मदर्शन सोपे असते.

याचा अर्थ असा नाही की योगारूढ पुरुषाने लोकसंग्रहाकरिताही कर्म करण्याची आवश्यकता नसते. लोकसंग्रहाशिवाय तो जिवंतच राहू शकत नाही. यामुळे सेवाकार्य करणे त्याच्याकरिता स्वाभाविक झालेले असते. देखाव्याकरिता तो काहीही करत नाही. या श्लोकाची अध्याय तीनमधील श्लोक ४ आणि अध्याय पाचमधील श्लोक ४ची तुलना करा.

यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।
सर्वसङ्कल्पसन्न्यासी योगारूढस्तदोच्यते ।। ४

माणूस जेव्हा इंद्रियविषय वा कर्म यांच्या संबंधात आसक्त होत नाही आणि त्याने सर्व संकल्पनांचा त्याग केलेला असतो तेव्हा त्याला योगारूढ म्हणतात. ४

उद्धरेदात्मनात्मानं नाआत्मानमवसायेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ।। ५

आत्म्याद्वारे माणसाने आत्म्याचा उद्धार करावा, त्याची अधोगती करू नये. आत्माच आत्म्याचा मित्र असतो आणि आत्माच आत्म्याचा शत्रूही असतो. ५

बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ।
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत ।। ६

ज्या माणसाने आपल्या सामर्थ्याने स्वतःवर विजय मिळवलेला असतो त्याचाच आत्मा त्याचा मित्र असू शकतो. ज्याने स्वतःवर विजय मिळवला नाही तो स्वतःशी शत्रूवत व्यवहार करत असतो. ६

जितात्मनः प्रशान्तस्य परमात्मा समाहितः ।

शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ।। ७

ज्याने आपल्या मनाला जिंकलेले असते आणि जो पूर्णपणे शांत झालेला असतो त्याचा आत्मा थंडी, उकाडा, सुखदुःख, मानापमान यांच्यात समान असतो. ७

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजेन्द्रियः ।

युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ।। ८

जो ज्ञान आणि अनुभव यांनी तृप्त झालेला असतो, जो अविचल असतो, ज्याने इंद्रियांना जिंकलेले असते आणि ज्याच्याकरिता माती, दगड आणि सोने समान असतात अशा ईश्वरपरायण माणसाला योगी म्हणतात. ८

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेषबन्धुषु ।

साधुष्वपी च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ।। ९

हितेच्छू, मित्र, शत्रू, तटस्थ, मध्यस्थ अथवा प्रिय या सर्वांबद्दल तसेच साधू आणि पापी या दोघांबद्दलही जो समभाव ठेवतो तो श्रेष्ठ योगी असतो. ९

टीप - दोन्ही पक्षांशी समान वर्तणूक करणाऱ्या या तटस्थ माणसाला बेफिकीर म्हणता येऊ शकते. परस्परांशी भांडणाऱ्या दोन्ही पक्षांचे हित पाहणाऱ्या माणसाला मध्यस्थ म्हणतात. - द. बा. कालेलकर

१९

योगी युञ्जित सततमात्मानं रहसि स्थितः ।

एकाकी यतचित्तात्मा निराशीर परिग्रहः ।। १०

योग्याने चित्त स्थिर ठेवून, वासना आणि संग्रह यांचा त्याग करून आणि एकांतात राहून आपल्या आत्म्याला परमेश्वराशी जोडले पाहिजे. १०

सुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ।

नात्युच्छ्रतं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ।। ११

तन्नैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।

उपविश्यासनेयुञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ।। १२

ना फार उंच ना फार खाली अशा पवित्र ठिकाणावर कुश, मृगचर्म, आणि वस्त्र एकावर एक अंथरलेले असतील असे आसन स्वतःकरिता तयार करून त्यावर एकाग्र चित्ताने बसून चित्त आणि इंद्रियांवर ताबा मिळवून योगी माणसाने आत्मशुद्धीकरिता योगसाधना केली पाहिजे. ११, १२

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।

संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ।। १३

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थिता ।

मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसित मत्परः ।। १४

काया, मान आणि डोळे यांना सरळ रेषेत ठेवून इकडेतिकडे न पाहता नासिकाग्रावर दृष्टी केंद्रित करून संपूर्ण शांततेने निर्भय होऊन ब्रह्मचर्यात दृढ राहून मन ताब्यात ठेवून माझ्यात परायण झालेल्या योग्याने स्थिर भावनेने माझे ध्यान करत राहिले पाहिजे. १३, १४

टीप - नासिकाचा अर्थ आहे भृकुटीचा मधील भाग. (पाहा अध्याय ५, श्लोक २७) ब्रह्मचर्याचा अर्थ केवळ वीर्यसंग्रहच नाही तर ब्रह्मप्राप्तीकरिता अहिंसादी सर्व व्रते आहे.

युञ्जनेव सदात्मानं योगीनियतमानसः ।

शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ।। १५

अशा प्रकारे मनावर नियंत्रण मिळवलेला योगी आपल्या आत्म्याला परमात्म्याशी जोडतो आणि मला मिळवल्यामुळे मिळणारी मोक्षरूपी सर्वोच्च शांतता मिळवतो. १५

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः ।

न चाति स्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ।। १६

हे अर्जुना, हा समत्वरूपी योग ना तर अतिशय खाणाराकडून होतो ना केवळ उपवास करणाराकडून. अशाच प्रकारे हा योग ना तर अतिशय झोपणाराकडून होतो ना अतिशय जागणाराकडून. १६

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।

यपकितस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ।। १७

आहारविहार, झोपणे, जागणे तसेच इतर कामे उचित प्रमाणात करून साध्य होणारा हा योग दु:खविनाशक असल्याचे सिद्ध होते. १७

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ।

निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ।। १८

चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणलेले चित्त जेव्हा आत्म्यात स्थिर होते आणि सर्व कामनांबाबत माणूस निस्पृह होतो तेव्हा त्याला योगी म्हणतात. १८

यथा दीपो निवातस्थ नेङ्गते सोपमा स्मृता ।

योगिनो यतचित्तस्य युञ्जतो योगमात्मनः ।। १९

आत्म्याला परमात्म्याशी जोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्थिरचित्त योग्याची स्थिती वारा नसलेल्या ठिकाणच्या दिव्यासारखी असते. १९

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।

यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ।। २०

सुखमात्यंतिकंयत्तदबुद्धिग्राह्यमतिन्द्रियम् ।

वेत्ती यत्र न चैवायं स्थिश्चलति तत्त्वतः ।। २१

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।

यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ।। २२

तं विद्याद् दुःख संयोगवियोगं योगसञ्ज्ञतम् ।

स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ।। २३

योगसेवनाने नियंत्रणात आलेले मन ज्या स्थितीत प्रार्थना करते, ज्यात आत्म्याला आत्म्याद्वारे ओळखून आत्म्यात माणूस संतुष्टी मिळवतो, ज्यात इंद्रियातीत आणि बुद्धिग्राह्य अनंत सुखांचा अनुभव मिळतो, ज्यात स्थिर झालेला माणूस मूळ गोष्टीपासून विचलित होत नाही, याशिवाय जे मिळवल्यानंतर त्याला इतर कोणताही लाभ मोठा वाटत नाही, आणि ज्यात स्थिर झालेला माणूस महादुःख पाहूनही डळमळत नाही अशी दुःखरहित अवस्था म्हणजे योगाची अवस्था असे आपण समजलो पाहिजे. व्याकूळ न होता आणि कंटाळा न करता या योगाची साधना केली पाहिजे. २०, २१, २२, २३

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ।

मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ।। २४

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धतिगृहितया ।

आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत ।। २५

संकल्पनांतून निर्माण होणाऱ्या सर्व कामनांचा पूर्णपणे त्याग करून, मनाद्वारे इंद्रियांच्या समूहाला सर्व दिशांतून चांगल्या प्रकारे नियंत्रणात आणून योगी व्यक्तीने अविचल बुद्धीने हळूहळू शांत व्हायला पाहिजे आणि मनाला आत्म्यात स्थिर करून इतर कोणत्याही गोष्टीचा विचार करायला नको. २४, २५

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् ।

ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ।। २६

चंचल आणि अस्थिर मन जिथेकुठे भरकटत जात असेल तिथून त्याचे नियमन करून (योगी माणसाने) आपल्या मनावर नियंत्रण मिळवले पाहिजे. २६

प्रशान्तमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम।

उपैति शान्तरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ।। २७

ज्याचे मन चांगल्या प्रकारे शांत झाले आहे, ज्याच्या विकाराचे शमन झालेले असते असा ब्रह्ममय झालेला निष्काम योगी नक्कीच श्रेष्ठ सुख प्राप्त करत असतो. २७

युञ्जनेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ।

सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यन्तं सुखमश्नुते ।। २८

अशा प्रकारे पापरहित झालेला योगी सतत आत्म्याचा शोध घेत सहजपणे ब्रह्मप्राप्तीरूपी अपार आणि अनंत सुखाचा आनंद घेत असतो. २८

सर्वभूस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ।

ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ।।२९

अशा प्रकारे पापरहित झालेला योगी स्वतःला सर्व भूतांमध्ये पाहतो व सर्व भूतांना स्वतःमध्ये पाहतो. २९

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ।

तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ।।३०

जो माणूस सर्वत्र मला पाहतो आणि सर्वांना माझ्यात पाहतो तो माझ्या दृष्टीपासून कधीही दूर होत नाही आणि मीही त्याच्या दृष्टीपासून कधीही दूर होत नाही. ३०

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ।

सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ।। ३१

अशा प्रकारे माझ्यात लीन असलेला जो योगी प्राणिमात्रांमध्ये वसत असलेल्या मला भजत असतो तो सर्व प्रकारच्या कर्मांमध्ये व्यस्त असूनही माझ्यात असतो. ३१

टीप - जोपर्यंत माणसात मीपणाचा भाव असतो तोपर्यंत परमात्मा माणसापासून दूरच राहतो. जेव्हा माणसातील मीपणा संपतो तेव्हा तो शून्य होतो आणि तेव्हाच तो एकाच परमात्म्याचे सर्वत्र दर्शन घेऊ शकतो. (पुढील अध्याय १३ श्लोक २३ची टीप पाहा.)

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जन ।

सुखं वा यदि वा दु:खं स योगी परमो मतः ।। ३२

हे अर्जुना जो माणूस सर्वांना स्वत:सारखाच समजतो आणि त्यांच्या सुखदु:खांचा त्याला तेवढाच अनुभव येतो जितका स्वतःच्या सुखदु:खांचा येतो त्याला श्रेष्ठ योगी मानतात. ३२

टीप - श्री शंकराचार्य म्हणतात की कोणाशीही प्रतिकूल आचरण न करणारा तत्त्वज्ञानात संपूर्णपणे रमलेला असा अहिंसक योगी सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ असतो. - द. बा. कालेलकर

२०

अर्जुन उवाच -

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।

एतस्याहं न पश्यामि चञ्चलत्वास्थितिं स्थिराम् ।। ३३

हे मधुसूदन, माझ्या मनाच्या चंचलपणामुळे हा समत्वरूपी जो योग तू मला समजावून सांगितला आहेस खरे परंतु त्याचे स्थैर्य मला आकळू शकले नाही. ३३

चञ्चलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।

तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ।। ३४

कारण हे कृष्णा, मन खरोखरच चंचल आहे आणि ते अतिशय ताकदवान आणि दृढ असल्यामुळे माणसाचे मंथन करण्याचे त्याच्यात सामर्थ्य आहे. ज्याप्रमाणे वायूला दाबणे वा त्याला अडवणे कठीण असते त्याचप्रमाणे मनाला ताब्यात ठेवणे फार कठीण असते. ३४

श्री भगवान उवाच -

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम ।

अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।। ३५

हे महाबाहो, मन चंचल असल्यामुळे त्याच्यावर नियंत्रण ठेवणे पार कठीण असते यातं काही संशय नाही. तरीही हे कौंतेय अभ्यास आणि वैराग्य यांच्या मदतीने मनाला जिंकता येऊ शकते. ३५

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ।

वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ।। ३६

माझे मत आहे की ज्याचे मन त्याच्या ताब्यात नाही त्याच्याकरिता योगसाधना फार कठीण असते. परंतु ज्याचे मन स्वतःच्या ताब्यात असते आणि जो प्रयत्नशील असतो तो विविध उपायांद्वारे योग साध्य करू शकतो. ३६

अर्जुन उवाच -

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलित मानसः ।

अप्राप्य योगसंसिद्धिं कां गति कृष्ण गच्छति ।। ३७

हे कृष्णा, जो श्रद्धावान आहे परंतु प्रयत्नातील शैथिल्यामुळे योगभ्रष्ट होतो त्याला यश न मिळाल्यामुळे त्याला शेवटी कोणती गती मिळते? ३७

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ।

अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ।। ३८

हे महाबाहो, योगापासून भ्रष्ट झालेल्या आणि ब्रह्ममार्गापासून च्यूत झालेल्या माणसाचा विखुरलेल्या ढगाप्रमाणे विनाश तर होत नाही? ३८

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ।

त्वदन्यः संशयस्वास्य छेत्ता न ह्युपपद्यते ।। ३९

हे कृष्णा माझा हा संशय तूच मुळापासून दूर केला पाहिजे. हा संशय दूर करू शकेल असा तुझ्याशिवाय दुसरा कोणीही मला भेटू शकत नाही. ३९

श्री भगवान उवाच -

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।

न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गति तात गच्छति ।। ४०

हे पार्थ, अशा माणसाचा ना तर या लोकी नाश होतो ना परलोकी. हे तात, कल्याण मार्गावर चालणाराची कधीही दुर्गती होत नाही. ४०

प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।

शुचिनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।। ४१

पुण्यवान लोकांना जे स्थान मिळते ते स्थान मिळवून त्या स्थानावर दीर्घकाळ राहिल्यानंतर योगभ्रष्ट माणूस साधनसंपन्न आणि पवित्र घरात जन्म घेतो. ४१

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ।

एतद्धी दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ।। ४२

अथवा ज्ञानयोगी माणसाच्या घरात जन्म घेणे अतिशय दुर्लभ असले तरी असा योगी ज्ञानयोगी माणसाच्या घरात जन्म घेतो. ४२

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदैहिकम् ।

यततेच ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ।। ४३

हे कुरुनंदन, तिथे त्याला पूर्वजन्मीचे बुद्धिसंस्कार प्राप्त होतात आणि तिथून तो मोक्षमार्गाच्या दिशेने प्रगती करतो. ४३

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्ियते ह्यवशोऽपी सः ।

जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ।। ४४

त्याच्या याच पूर्वाभ्यासामुळे तो योगाकडे आकर्षित होतो. योगाबद्दल केवळ जिज्ञासा असणारा माणूसही सकाम वैदिक कर्म करणाराच्या स्थितीपलीकडे पोहोचतो. ४४

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।

अनेकजन्मसंसिद्धस्तो याति परां गतिम् ।। ४५

याशिवाय निष्ठेने चिकाटीपूर्वक प्रयत्न करणारा योगी (हळूहळू) पापापासून शुद्ध होत परम गती प्राप्त ठरतो. ४५

तपस्विभ्योऽधिको योगी

ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ।

कर्मिभ्यश्चाधिको योगी

तस्माद्योगी भवार्जुन ।। ४६

तपस्वी माणसापेक्षा योग्याचे स्थान बरेच उंच आहे. ज्ञानी माणसापेक्षाही तो श्रेष्ठ गणला जातो. तसेच कर्मकांडापेक्षाही तो उंच असतो. यामुळे हे अर्जुना तू योगी हो. ४६

टीप - इथे तपस्वीचा अर्थ फलाशा ठेवणारा तपस्वी आहे, तसेच ज्ञानीचा अर्थ अनुभवाने ज्ञानी नाही तर शास्त्री-पंडित असा आहे.

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना ।

श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ।। ४७

सर्व योग्यांमध्ये मला मन समर्पित करून जो श्रद्धापूर्वक माझी भक्ती करतो त्याला सर्वश्रेष्ठ योगी मानत असतात. ४७

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'ध्यानयोग' नावाचा सहावा अध्याय इथे समाप्त होतो.

७. ज्ञानविज्ञानयोग

या अध्यायापासून ईश्वरतत्त्व आणि ईश्वरभक्ती यांच्या विवेचनाला सुरुवात होते.

२१

श्री भगवान उवाच -

मय्यासक्त मनाः पार्थ योगं युञ्जन्मदाश्रयः ।
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ।। १

हे पार्थ, माझ्यात मन लावून तसेच माझा आधार घेऊन योगसाधना करून निश्चितपणे आणि पूर्णपणे मला कसे ओळखता येऊ शकते ते आता ऐक. १

ज्ञानं तेऽह सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ।
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ।। २

अनुभवाने परिपूर्ण असे हे ज्ञान मी तुला पूर्णपणे सांगेन. हे कळल्यानंतर या जगात कळण्यासारखे काहीही शिल्लक राहत नाही. २

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ।। ३

हजारो माणसांमधून एखादाच याच्या सिद्धीकरिता प्रयत्न करत असतो. आणि असा प्रयत्न करणाऱ्यांमधून एखाद्यालाच माझ्या खऱ्या रूपाची ओळख पटते. ३

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बद्धिरेव च ।
अहङ्कार इतीयं मे भिन्ना प्रकृतीरष्टधा ।। ४

पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, मन, बुद्धी आणि अहंभाव अशा प्रकारे माझी आठ प्रकारची प्रकृती आहे. ४

टीप - हे आठ तत्त्वांचे स्वरूपक्षेत्र अथवा क्षरपुरुष आहेत. पाहा अध्याय १३ चा श्लोक १३ आणि अध्याय १५चा श्लोक १६.

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ।

जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ।। ५

ही जी गोष्ट मी तुला सांगितली ती अपरा प्रकृती आहे. याहूनही उंच जीवनरूपी परा प्रकृती आहे. हे महाबाहो, हे जग तिच्याच आधारावर टिकलेले आहे. ५

एतद्योनीनि भूतानी सर्वाणीत्युपधारय ।

अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ।। ६

या प्रकृतींना भूतमात्रांच्या उत्पत्तीचे तू कारण समज. संपूर्ण जगाच्या उत्पत्तीचे आणि विलयाचे कारण मी आहे. ६

मत्तः परतरं नान्यत्किंञ्चिदस्ति धनञ्जय ।

मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।। ७

हे धनंजय, माझ्यापेक्षा दुसरा कोणीही श्रेष्ठ नाही. ज्याप्रमाणे धाग्यात मणी ओवलेले असतात त्याप्रमाणे माझ्यात हे संपूर्ण विश्व ओवलेले आहे. ७

रसोऽहमप्सु कौन्तेय प्रभास्मि शशिसूर्ययोः ।

प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ।। ८

हे कौंतेय, पाण्यात मी रस आहे, सूर्य आणि चंद्रामध्ये मी कांती आहे, सर्व वेदांमध्ये मी ओंकार आहे, आकाशात मी शब्द आहे, आणि पुरुषांमध्ये मी पराक्रम आहे. ८

पुण्यो गन्धः पृथ्विव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ।

जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ।। ९

पृथ्वीत मी सुगंध आहे, अग्नीमध्ये तेज आहे, प्राणिमात्रांचे मी जीवन आहे आणि तपस्वी लोकांचे मी तप आहे. ९

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ।

बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।। १०

हे पार्थ, तू मला सर्व जीवांमधील सनातन जीव समज, बुद्धिवान लोकांची बुद्धी मी आहे, आणि तेजस्वी लोकांचे तेजही मीच आहे. १०

बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ।

धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।। ११

काम आणि रागविरहित बलवानांचे बलही मीच आहे आणि हे भरतर्षभ प्राण्यांमधील धर्मविरोधी नसलेला कामही मीच आहे. ११

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ।

मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ।। १२

जे जे सात्त्विक, राजस आणि तामस भाव म्हणजे पदार्थ आहेत ते सर्व माझ्यातून निर्माण झालेले आहेत हे तू समजून घे. परंतु याचा अर्थ त्यांच्यात मी आहे असा नसून ते माझ्यात आहेत असा आहे. १२

टीप - परमात्मा या भावांवर अवलंबून नाही तर हे भाव परमेश्वरावर अवलंबून आहेत. हे भाव परमेश्वराच्या आधारावर अवलंबून आहेत. हे भाव परमेश्वराच्या आधारावर अस्तित्वात असतात आणि त्याच्या ताब्यात असतात.

२२

त्रिभिर्गुणमैयेर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ।

मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम ।। १३

या तीनही भावांमुळे सर्व जग मोहीत झालेले आहे आणि यामुळे त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आणि अविनाशी अशा माझ्या स्वरूपाची त्यांना ओळख नाही. १३

दैवी ह्येषा गुणामयी मम माया दुरत्यया ।

मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ।। १४

तीन गुण असलेल्या या दैवी म्हणजे अद्भुत मायेला पार करणे फार कठीण आहे. परंतु जो माणूस केवळ मला शरण आलेला असतो तो या मायेला ओलांडून पलीकडे जातो. १४

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यन्ते नराधमाः ।

माययापहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ।। १५

दुराचारी, मूढ, अधम लोक माझ्या आश्रयाला येत नाहीत त्यांच्यात आसुरी भाव असतात. आणि मायेद्वारे त्यांचे हरण केले जाते. १५

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सकृतिनोऽर्जुन ।

आर्तो जिज्ञासासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ।। १६

हे अर्जुना, चार प्रकारचे लोक माझी भक्ती करत असतात - दुःखी, जिज्ञासू, काही मिळवण्याची इच्छा असणारे हितार्थी आणि ज्ञानी. १६

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।

प्रियोहि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ।। १७

त्यातही ज्याच्यात समभाव असतो आणि जो केवळ माझी एकट्याचीच भक्ती करत असतो तो ज्ञानी श्रेष्ठ असतो. अशा ज्ञानीला मी फार प्रिय असतो आणि तो मला प्रिय असतो. १७

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।

आस्थितःस हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ।। १८

हे सर्व भक्त चांगले आहेत, त्यातही ज्ञानी तर माझा आत्माच असतो.असे मला वाटते. मला प्राप्त करण्याशिवाय इतर कोणतीही श्रेष्ठ गती नाही हे माहीत असणारा योगी माझ्याच आश्रयाला येत असतो हे याचे कारण आहे. १८

बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।

वासुदेवः सर्वमिति स महात्मा सदुर्लभः ।। १९

हे संपूर्ण (विश्व) वासूदेवच आहे हे अनेक जन्मानंतर लक्षात आल्यानंतर ज्ञानी पुरुष मला शरण येत असतात, असे महात्मे फार कमी असतात. १९

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यन्तेऽन्यदेवतः ।

तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ।। २०

वेगवेगळ्या कामनांद्वारे ज्यांचे ज्ञान हरण केले गेलेले असते ते लोक आपल्या प्रकृतीधर्माला शरण जाऊन वेगवेगळ्या विधींचा आधार घेतात आणि वेगवेगळ्या देवतांना शरण जातात. २०

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ।

तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ।। २१

माणूस ज्या कोणत्या स्वरूपाची भक्ती करू इच्छित असेल त्याच स्वरूपात मी त्याची श्रद्धा दृढ करत असतो. २१

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ।

लभतेच ततः कामान्मयैव विहितान्हि तान् ।। २२

या श्रद्धेच्या बळावर तो माणूस ज्या कोणत्या स्वरूपाची आराधना करतो आणि त्या त्या आराधनेच्या मदतीने त्याने इच्छिलेल्या माझ्याद्वारे निर्मित कामनांची तो पूर्ती करत असतो. २२

अन्तवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ।

देवान्देवयजो यान्ति मद्भक्ता यान्ति मामपि ।। २३

परंतु या अल्पज्ञ लोकांना जे फळ मिळतात ते नाशमान असतात. देवांची भक्ती करणारांना देव भेटतो तर माझी भक्ती करणारांना मी भेटतो. २३

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यन्ते मामबुद्धयः ।

परं भावमजानन्तो ममाव्ययमनुत्तमम् ।। २४

माझ्या परम, अविनाशी आणि अनुपम स्वरूपाचे ज्ञान नसलेले बुद्धिहीन लोक माझ्या इंद्रियातीत स्वरूपाला बुद्धिगम्य समजतात. २४

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ।

मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ।। २५

माझ्या योगमायेने झाकलेला मी सर्वांना स्पष्टपणे दिसत नाही. या मूढ जगाला माझ्या अजन्मा आणि अव्ययी स्वरूपाची चांगल्या प्रकारे ओळख नसते. २५

टीप - या दृश्य जगाला निर्माण करण्याची शक्ती असूनही त्यापासून अलिप्त असल्यामुळे परमात्म्याचे अदृश्य असणे हे त्याच्या योगमायेमुळे होत असते.

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ।

भविष्याणि च भूतानी मां तु वेद न कश्चन ।। २६

हे अर्जुना, भूतकाळात जे प्राणी झाले आहेत, जे वर्तमानकाळात आहेत आणि जे भविष्यात निर्माण होत आहेत त्या सर्व प्राण्यांचे मला ज्ञान आहे, परंतु माझे ज्ञान कोणालाही नसते. २६

२३

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्व मोहेन भारत ।

सर्वभूतानि सम्मोहं सर्गे यान्ति परंतप ।। २७

हे परंतप भारत, इच्छा आणि द्वेष यांच्यातून निर्माण झालेल्या सुखदु:खादींच्या द्वंद्वाच्या मोहामुळे सर्व प्राणी या जगाला भुलतात. २७

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्माणाम् ।

ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढवताः ।। २८

परंतु सदाचारी असल्यामुळे ज्यांची पापे धुतली गेली आहेत आणि जे सुखदु:खादींच्या द्वंद्वातून मुक्त झाले आहेत ते अचल व्रत करणारे लोक माझी भक्ती करत असतात. २८

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतन्ति ये ।

ते ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ।। २९

जे लोक माझ्या आश्रयाने म्हतारपण आणि मृत्यू यांतून मुक्त होण्याचा प्रयत्न करत असतात त्यांना पूर्ण ब्रह्माचे, अध्यात्माचे आणि संपूर्ण कर्माचे ज्ञान असते. २९

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ।

प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ।। ३०

ज्या लोकांनी अधिभूत, अधिदैव, आणि अधियज्ञ असलेल्या माझ्या स्वरूपाला ओळखलेले असते ते समत्वप्राप्त लोक मृत्यूच्या वेळीही मला ओळखत असतात. ३०

टीप - अधिभूत आणि अधिदैव या शब्दांचा अर्थ आठव्या अध्यायात दिला आहे.

या श्लोकाचा आशय असा आहे की ईश्वराशिवाय या जगात दुसरे काहीही नाही आणि कर्मांचा भोक्ता तोच आहे असे समजून जे लोक मृत्यूच्या वेळी शांत राहतात, ईश्वरात तल्लीन झालेले असतात आणि त्या वेळी त्यांच्या मनात कोणतीही वासना नसते त्यांनी ईश्वराला ओळखलेले असते व ते मोक्षाकरिता पात्र ठरत असतात.

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला ‘ज्ञानविज्ञानयोग’ नावाचा सातवा अध्याय इथे समाप्त होतो.

८. अक्षरब्रह्मयोग

या अध्यायात ईश्वरतत्त्व अजून समजावून सांगण्यात आले आहे.

२४

अर्जुन उवाच -

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरषोत्तम ।

अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमच्युते ।। १

हे पुरुषोत्तम, या ब्रह्माचे स्वरूप काय आहे? अध्यात्म काय आहे? कर्म काय आहे? अधिभूत कशाला म्हणतात? अधिदैव कशाला म्हणतात? १

अधियज्ञः कथं कोऽन्न देहेऽस्मिन्मधुसूदन ।

प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ।। २

हे मधुसूदन, या देहात अधियज्ञ काय आहे आणि तो कशा प्रकारचा आहे? आणि संयमी माणूस मृत्यूच्या वेळी तुला कसा ओळखू शकतो? २

श्री भगवान उवाच -

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ।

भूतभावोद्भवकरो विसर्गःकर्म सञ्ज्ञितः ।। ३

जे सर्वोत्तम आणि अविनाशी आहे तेच ब्रह्म आहे. प्राणिमात्रात जे आपल्या अधिकाराने राहते ते अध्यात्म आहे. आणि प्राणिमात्रांना निर्माण करणाऱ्या सृष्टीव्यापाराला कर्म म्हणतात ३

अधिभूतम् क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ।

अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभूतांवर ।। ४

अधिभूत माझे नाशवान रूप आहे आणि त्यात स्थित ज्यात माझे जिवंत रूप अधिदैव आहे. आणि हे मानवश्रेष्ठ, अधियज्ञ या देहात असलेले परंतु यज्ञान शुद्ध झालेले जीव स्वरूप आहे. ४

टीप - याचा अर्थ अव्यक्त ब्रह्मापासून नाशमान दृश्य पदार्थांपर्यंत सर्व परमेश्वरच आहे, आणि सर्व काही त्याचीच निर्मिती आहे.

अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।

यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।। ५

जो माणूस अखेरच्या वेळी माझे स्मरण करून देह सोडतो तो माझे स्वरूप धारण करतो यात काही संशय नाही. ५

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यन्ते कलेवरम ।

तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः ।।६

किंवा हे कौंतेय, माणूस ज्या स्वरूपाचे ध्यान करतो त्याच स्वरूपाचे स्मरण करत तो देह टाकत असतो आणि त्याच भावनेने तो सदैव भारलेला असल्यामुळे, त्याच स्वरूपाशी तादात्म्य पावलेला असल्यामुळे तेच रूप त्याला मिळत असते. ६

तस्मात् सर्वेषुकालेषु मामनुस्मर युद्ध च ।

मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैषस्यसंशयम् ।। ७

यामुळे तू माझे सदैव स्मरण कर आणि (कर्मक्षेत्रात) युद्ध करत राहा. अशा प्रकारे मन आणि बुद्धी यांना माझ्यात समर्पित केल्यामुळे निश्चितच तू मला मिळवशील. ७

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ।

परमं पुरुषं दिव्य यति पार्थानुचिन्तयन ।। ८

हे पार्थ जो माणूस अभ्यासाद्वारे आपले चित्त स्थिर करतो आणि त्याला इतस्ततः भरकटू देत नाही आणि ध्यान करून आपले मन एकाग्र करतो तो दिव्य परमपुरूषपदाला पोहोचतो. ८

कवि पुराणमनुशासितार -

मणोरणीयांसमनुस्मरेद्यः ।

सर्वस्य धातारमचिन्त्यरूप -

मादित्यवर्ण तमसः परस्तात् ।। ९

प्रयाणकाले मनसाचलेन

भक्त्या युक्तो योबलेन चैव ।

भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्यसम्यक -

स तं परंपुरुषमुपैति दिव्यम् ।।१०

जो पुरूष मृत्यूसमयी स्थिर चित्ताने भक्तियुक्त होऊन योगबलाने भृकुटीच्या मध्यभागी प्राण स्थापित करून सर्वज्ञ, पुरातन नियंता, सूक्ष्मतम, सर्वांचे पालन करणारा, अचिंत्य, सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि अंधारापासून दूर राहणाऱ्या माझ्या स्वरूपाचे चांगल्या प्रकारे स्मरण करतो तो दिव्य परमपुरुषपद प्राप्त करतो. ९, १०

यदक्षरं वेदविदो वदन्ति

विशन्ति यद्यतयो वीतरागाः ।

यदिच्छन्तो ब्रह्मचर्य चरन्ति

तत्ते पदं सङ्ग्रहेण प्रवक्ष्ये ।। ११

ज्याचे वर्णन वेदांचे ज्ञान असणारे अक्षर म्हणून करतात, वितराग मुनी ज्यात प्रवेश करतात, आणि ज्याच्या प्राप्तीकरिता लोक ब्रह्मचर्याचे पालन करतात त्या पदाचे आता मी तुझ्याकरिता वर्णन करीन. ११

सर्वदाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ।

मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ।। १२

ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।

यः प्रयाति त्यजंदेहं स याति परमां गतिम् ।। १३

जो माणूस इंद्रियांची सर्व दारे बंद करून, मनाला अंतःकरणात स्थिर करून, मस्तकात प्राण धारण करून, समाधिस्थ होऊन ॐसारख्या एकाक्षरी ब्रह्माचे उच्चारण करत माझे चिंतन करतो त्याला परम गती प्राप्त होते. १२, १३

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ।

तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ।। १४

हे पार्थ, इतरत्र कुठेही आपले चित्त न लावता जो निरंतर माझे स्मरण करत असतो तो नित्ययुक्त योगी सहजपणे मला प्राप्त करत असतो. १४

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ।

नाप्नुवन्ति महात्मनः संसिद्धिं परमां गताः ।। १५

मला मिळवून परम गतीला पोहोचलेल्या महात्म्यांना दुःखाचे घर असलेल्या अशाश्वत पुनर्जन्माच्या अवस्थेतून जावे लागत नाही. १५

२५

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ।

मामुपेत्य तु कौन्तेय पुनर्जन्म न विद्यते ।। १६

हे कौंतेय, ब्रह्मलोकापासून सर्व लोक वारंवार जन्म घेत असतात परंतु मला मिळवल्यानंतर माणसाला परत जन्म घ्यावा लागत नाही, १६

सहस्रयुगपर्यन्तमहर्यद्ब्रह्मणो विदुः ।

रात्रिं युगसहस्रान्तां तेऽहोरत्रविदो जनाः ।। १७

ज्या लोकांना ब्रह्माच्या हजार युगाच्या एका दिवसाची आणि हजार युगांच्या एका रात्रीची माहिती असते त्यांना रात्रीचे आणि दिवसाचे ज्ञान असते. १७

टीप - याचा अर्थ आहे आपल्या चोवीस तासांचे दिवसरात्र या कालचक्रात एका क्षणापेक्षाही सूक्ष्म आहेत आणि त्यांना काहीही किंमत नाही. यामुळे या काळात मिळणारे भोग आकाशपुष्पासारखे असतात हे ओळखून आपण त्यांच्याबद्दल उदासीन राहायला पाहिजे आणि आपल्याजवळ जो काही वेळ आहे तो ईश्वरभक्तीत, त्याच्या सेवेत घालवून सार्थकी लावला पाहिजे, आणि आजच्या आज जरी आपल्याला ईश्वर दर्शन झाले नाही तरी आपण धीर सोडता कामा नये.

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवन्त्यहरागमे ।

रात्र्यागमे प्रलीयन्ते तत्रैवाव्यक्तसञ्जके ।। १८

(ब्रह्माचा) दिवस उगवल्यानंतर सर्व प्राणी अव्यक्तावस्थेतून व्यक्तावस्थेत येतात.आणि रात्र झाल्यानंतर त्यांचा प्रलय होतो. १८

टीप - हे कळल्यानंतर आपल्याला फार कमी अधिकार आहेत हे माणसाने लक्षात ठेवले पाहिजे. उत्पत्ती आणि विनाश हे सोबत चालत असतात.

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ।

रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे।। १९

हे पार्थ, अशा प्रकारे हा प्राणिसमुदाय उत्पन्न होतो आणि रात्र झाल्यानंतर अपरिहार्यपणे तो विलयास जातो. १९

परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ।

यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ।। २०

या अव्यक्तापलीकडे एक वेगळा सनातनभाव आहे. सर्व प्राण्यांचा नाश झाल्यानंतरही या सनातन अव्यक्तभावाचा नाश होत नाही. २०

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ।

यं प्राप्य न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।। २१

ज्याला अव्यक्त आणि अक्षर म्हणतात त्यालाच परम गती म्हणत असतात. ते माझे परंधाम आहे आणि ते प्राप्त झाल्यानंतर माणसाला पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. २१

पुरुषाः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ।

यस्यान्तःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ।। २२

हे पार्थ, ज्याच्यामध्ये सर्व भूते, सर्व प्राणिमात्र स्थित आहेत आणि ज्याने हे सर्व जग व्याप्त आहे त्या उत्तम पुरुषाचे दर्शन अनन्य भक्तीने होत असते. २२

२६

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ।

प्रयाता यान्ति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ।। २३

ज्या काळात मृत्यू होऊन योगी लोकांना मोक्षप्राप्ती होते आणि ज्या काळात मृत्यू होऊन त्यांचा पुनर्जन्म होतो त्या काळाबद्दल हे भरतर्षभ आता मी तुला सांगेन. २३

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।

तन्न प्रयाता गच्छन्ति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ।। २४

उत्तरायणाच्या सहा महिन्यात, शुक्लपक्षात ज्यावेळी दिवसा अग्निज्वाला वर उठत असतात तेव्हा मृत्यू होणारे ब्रह्मज्ञानी लोक ब्रह्मपदाला पोत्र होत असतात. २४

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ।

तत्र चान्द्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ।। २५

दक्षिणायानाच्या सहा महिन्यात, कृष्णपक्षात, रात्री जेव्हा धुके पसरलेले असते तेव्हा मरणाऱ्या लोकांना चंद्रलोक प्राप्त होतो व त्यांना पुनर्जन्म घ्यावा लागतो. २५

टीप - वरील दोन श्लोकांचा शब्दार्थ गीतेच्या शिकवणुकीशी जुळत नाही. गीतेच्या शिकवणुकीनुसार जो भक्तिभावाने परिपूर्ण आहे, जो सेवामार्गाचे अनुसरण करतो व ज्याला ज्ञान झालेले असते तो केव्हाही मरण पावला तरी त्याला मोक्ष प्राप्त होतो. यामुळे या दोन श्लोकांचा अर्थ गीतेच्या शिकवणुकीच्या विरोधी आहे.

परंतु या श्लोकाचा भावार्थ असा निघू शकतो की जे लोक यज्ञ करतात म्हणजे परोपकारात जीवन व्यतीत करतात, ज्यांना ज्ञान झालेले असते, जे ब्रह्मविद म्हणजे ज्ञानी आहेत त्यांची मृत्यूच्या वेळी तीच स्थिती कायम राहिली तर त्यांना मोक्षप्राप्ती होते. याउलट जे यज्ञ करत नाहीत, ज्यांना ज्ञान प्राप्त झालेले नसते, ज्यांना भक्तीचे ज्ञान नसते, त्यांना चंद्रलोक म्हणजे क्षणिक लोक प्राप्त होतो त्यांना संसारचक्रात परतावे लागते. चंद्राजवळ त्याचा स्वतःचा प्रकाश नसतो. (उत्तरायण आणि शुक्लपक्ष निष्काम सेवेचा मार्ग आहे, आणि दक्षिणायान व कृष्णपक्ष स्वार्थाचा मार्ग आहे. सेवेच्या मार्गाने मुक्ती मिळते तर स्वार्थीपणामुळे माणूस बंधनात अडकतो. सेवामार्ग ज्ञानमार्ग आहे तर स्वार्थाचा मार्ग अज्ञानमार्ग आहे. ज्ञानमार्गाने चालणाराला मोक्ष प्राप्त होतो. अज्ञानमार्गाने चालणारा बंधनात अडकतो. या दोन्ही मार्गांचे ज्ञान झाल्यानंतर मोहात फसून अज्ञानाचा मार्ग कोण पसंत करील?

इतके कळल्यानंतर माणसाने सर्व पुण्यफळांचा त्याग करून अनासक्त राहून आणि कर्तव्यात लीन होऊन उत्तम स्थान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.)

शुक्लकृष्णे गति ह्येते जगतः शाश्वते मते ।

एकया यात्यनावृत्तीमन्ययावर्तते पुनः ।। २६

जगात प्रकाशाचा आणि अंधकाराचा म्हणजेच ज्ञानाचा आणि अज्ञानाचा असे दोन मार्ग सनातन काळापासून चालत आलेले आहेत. यांतील एका मार्गाने म्हणजे ज्ञानमार्गाने माणसाला

मोक्षप्राप्ती होते तर दुसऱ्या मार्गाने म्हणजे अज्ञानाच्या मार्गाने माणसाला वारंवार जन्म घ्यावा लागतो. २६

नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ।

तस्मात्सर्वेषु कालेषु यौगयुक्तो भवार्जुन ।। २७

हे पार्थ, या दोन्ही मार्गांचे ज्ञान असणारा कोणताही योगी मोहात पडणार नाही. यामुळे हे अर्जुना, तू सदैव योगयुक्त राहा. २७

टीप - दोन्ही मार्गांचे ज्ञान असणारा आणि समभाव असणारा योगी अज्ञानाचा मार्ग निवडणार नाही असा मोहत न पडण्याचा इथे अर्थ आहे.

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव

दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ।

अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा

योगी परं स्थानमुपैति चाद्यम ।। २८

या गोष्टीचे ज्ञान झाल्यानंतर वेदांमध्ये, तपात, आणि दानात जे पुण्यफळ सांगितले आहे त्या सर्वांना ओलांडून योगी पुरुष उत्तम असे आदिस्थान प्राप्त करून घेतो. २८

टीप - यामुळे ज्याने ज्ञान, भक्ती आणि सेवाकार्य यांच्याद्वारे समभाव मिळवला आहे त्याला सर्व पुण्यांचे फळ मिळते, इतकेच नाही तर त्याला मोक्षपदही प्राप्त होते.

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'अक्षरब्रह्मयोग' नावाचा आठवा अध्याय इथे समाप्त होतो.

९. राजविद्या-राजगुह्ययोग

या अध्यायात भक्तिमहिमा गाईलेला आहे.

२७

श्री भगवान उवाच -

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्षाम्यनसूयते ।
ज्ञानं विज्ञानसहितं यद्ज्ञात्वा मोक्षसेशुभात ।। १

तू ईर्षा करणारा दोषदर्शी नाहीस. यामुळे मी तुला गूढाहून गूढ अनुभवाचे ज्ञान सांगेन. हे कळल्यामुळे तू अकल्याणापासून वाचशील. १

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ।
प्रत्यक्षवगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ।। २

हे ज्ञान सगळ्या विद्यांच्या राजासारखे आहे. गूढ वस्तूंमध्येही ते श्रेष्ठ आहे. ही विद्या पवित्र आहे, उत्तम आहे आणि प्रत्यक्ष अनुभवाने येण्यासारखी आहे. तसेच ही धर्मानुकूल आहे. त्याचबरोबर या विद्येनुसार आचरण करणे सोपे असून ती अविनाशी आहे. २

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परन्तप ।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि ।। ३

हे परंतप, या धर्मावर ज्यांची श्रद्धा नाही ते लोक मला प्राप्त करू शकत नाहीत. यामुळे त्यांना वारंवार संसारमार्गात परतावे लागत असते. ३

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ।
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थिता ।। ४

या संपूर्ण विश्वाला मी माझ्या अव्यक्तरूपाने व्यापले आहे. सर्व प्राणी माझ्यात आणि माझ्या आधारावर आहेत. मी त्यांच्या आधारावर नाही. ४

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।

भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ।। ५

असे असले तरी हे प्राणी माझ्यात नाहीत असेही म्हणता येऊ शकते. माझी ही योगशक्ती तू पाहा. मी सर्व प्राणिमात्रांचे भरणपोषण करणारा आहे. तरीही मी त्यांच्यात नाही. मी त्यांच्या उत्पत्तीचे कारण आहे. ५

टीप - माझ्यात सर्व लोक आहेत आणि नाहीत असेसुद्धा म्हणता येऊ शकते. मी त्यांच्यात आहेही आणि नाहीही. ही ईश्वरी योगशक्ती, त्याची माया, त्याचा चमत्कार आहे. ईश्वराचे वर्णन भगवान श्रीकृष्णालाही मानवी भाषेत करावे लागते. यामुळे ते अनेक प्रकारच्या भाषाप्रयोगाने माणसाचे समाधान करतात. सर्व काही ईश्वरमय आहे यामुळे सर्व काही ईश्वरात आहे. ईश्वर अलिप्त आहे, प्राकृत आहे, कर्ता नाही. यामुळे असे म्हणता येते की त्याच्यात प्राणिमात्र नाहीत परंतु जे लोक ईश्वराचे भक्त आहेत त्यांच्यात तो आहे. परंतु जे लोक नास्तिक आहेत त्यांच्या दृष्टीने त्यांच्यात ईश्वर नाही. हा सर्व जर ईश्वरी चमत्कार नसेल तर याला आपण अजून काय म्हणू शकतो?

यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।

तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ।। ६

ज्याप्रमाणे सर्वत्र विहरणारा वारा आकाशात विद्यमान असतो त्याप्रमाणे सर्व प्राणी माझ्यात आहेत हे तू लक्षात ठेव. ६

सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिं यांन्ति मामिकाम् ।

कल्पक्षये पुनस्तानि कल्गी विसृजाम्यहम् ।। ७

हे कौंतेय, कल्पांती सर्व प्राण्यांचा माझ्यात लय होतो. कल्पारंभ झाल्यानंतर मी परत त्यांचे सृजन करतो. ७

प्रकृतिं स्वामवष्टभ विसृजामि पुनः पुनः ।

भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ।। ८

प्रकृतीच्या अधिनस्थ असल्यामुळे, माझ्याच मायेला, प्रकृतीला हाती घेऊन परवश असलेल्या या प्राणिसमुदायाला मी निर्माण करत असतो. ८

न च मां तानि कर्माणि निबध्नति धनञ्जय ।
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ।।९

हे धनंजय, हे कर्म मला बंधनात बांधत नाहीत कारण मी त्यांच्याबद्दल उदासीन आणि अनासक्त असतो. ९

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।
हेतुनानेन कौन्तेय जगद्विपरिवर्तते ।। १०

माझ्या देखरेखीखाली प्रकृती स्थावर आणि जंगम जगाची निर्मिती करत असते. आणि या कारणामुळे हे कौंतेय, जग (राहाटाप्रमाणे) फिरत असते. १०

२८

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रित् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।। ११

प्राणी इत्यादी भूतमात्रांना माझ्या महेश्वर स्वरूपातील श्रेष्ठ रूपाची माहिती नसते आणि यामुळे मी जेव्हा मानवी रूप धारण करतो तेव्हा हे लोक माझी अवगणना करतात. ११

टीप - कारण जो माणूस ईश्वरसत्ता मानत नाही तो देहातील अंतर्यामीला ओळखत नाही. आणि मग त्याचे अस्तित्व नाकारून तो जडवादी होतो.

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचतसः ।
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनिं श्रिताः ।। १२

मोह निर्माण करणाऱ्या अशा राक्षसी वा आसुरी प्रकृतीचा आधार घेणाऱ्या या उलट्या बुद्धीच्या लोकांच्या आशा, त्यांचे कर्म, त्याचे ज्ञान इत्यादी सर्व व्यर्थ सिद्धा होतात. १२

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।

भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।। १३

या उलट हे पार्थ, भूतमात्रांचे आदिकारण आणि अविनाशी असे माझे स्वरूप ओळखून महात्मा लोक दैवी प्रकृतीचा आधार घेतात आणि एकनिष्ठ होऊन माझी भक्ती करतात. १३

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः ।

नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।। १४

दृढनिश्चयाने प्रयत्न करणारे हे महात्मा लोक सतत माझे कीर्तन करत असतात, भक्तिपूर्वक मला नमस्कार करत असतात आणि ध्यान करून माझी उपासना करत असतात. १४

ज्ञानयज्ञेन चाप्यते यजन्तो मामुपासते ।

एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ।। १५

आणि इतर काही लोक अद्वैत स्वरूपात, द्वैत रूपात अथवा अनेक रूपात विद्यमान असलेल्या माझी ज्ञानयज्ञाद्वारे भक्ती करत असतात. १५

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।

मन्तोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम ।। १६

(अशा) यज्ञाचा संक्लप मी आहे, तो यज्ञ मी आहे, यज्ञाद्वारे पितरांचा आधार मी आहे, यज्ञातील वनस्पती मी आहे, मंत्र मी आहे, घृताहुती मी आहे, अग्नी मी आहे आणि हवनद्रव्यही मीच आहे. १६

पितामहस्य जगतो माता धाता पितामहः ।

वेद्यं पवित्रमोङ्कार ऋक्साम यजुरेव च ।। १७

या जगाचा पिता मी आहे, माता मी आहे, या जगाला धारण करणारा मी आहे, पितामह मी आहे, कळण्यासारखा पवित्र औंकार मी आहे आणि ऋग्वेद, यजूर्वेद आणि सामवेदही मीच आहे. १७

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत ।
प्रभवाः प्रलयाः स्थानं निधानं बीजमव्ययम् ।। १८

(सर्वांचे) अंतिम स्थान मी आहे, (सर्वांचा) पोषक मी आहे, स्वामी मी आहे, निवास मी आहे, आश्रय मी आहे, हितचिंतक मी आहे, उत्पत्ती मी आहे, स्थिती मी आहे आणि विनाशही मीच आहे. भांडार मी आहे आणि अव्ययी बीजही मीच आहे. १८

तवाप्यहमहं वर्ष निगृह्णाम्युत्सृजामि च ।
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ।। १९

प्रकाश मी देतो, पावसाला मीच अडवतो वा पडू देतो. अमरत्व मी आहे, मृत्यू मी आहे आणि हे अर्जुन, सत्य आणि असत्यही मीच आहे. १९

२९

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा -
यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयन्ते ।
ते पुण्यमसाद्य सुरेन्द्रलोक -
मश्नन्ति दिव्यान्दिवि देवभोगान् ।। २०

तीन वेदातील कर्म करून, सोमरसाचे पान करून पापरहित जनयज्ञाद्वारे माझी पूजा करून जे स्वर्ग लोकाची याचना करतात आणि पुण्याईने मिळणारा इंद्रलोक मिळवून ते स्वर्गात दिव्य भोग भोगतात. २०

टीप - सर्व वैदिक क्रिया फलप्राप्तीकरिता होत होत्या आणि त्यातील काही क्रियांमध्ये सोमरसपान केले जात होते याचा इथे उल्लेख आहे. या क्रिया वास्तवात कशा होत्या, सोमरस कसे होते हे आज कोणीही सांगू शकत नाही.

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं -

क्षीणे पुण्ये मर्त्य लोकं विशन्ति ।

एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना -

गतागतं कामकामा लभन्ते ।। २१

त्या विशाल स्वर्गलोकाचा उपभोग घेतल्यानंतर पुण्य संपल्यानंतर ते लोक परत मृत्यू लोकात प्रवेश करतात. अशा प्रकारे तीन वेदांमधील कर्म करणारांना, फळांचा लोभ धरणारांना जन्ममरणाच्या फेऱ्यात फिरावे लागत असते. २१

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।

तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। २२

जे लोक अनन्य भावाने माझे चिंतन करत माझी पूजा करत असतात त्या लोकांच्या योगक्षेमाचा भार मीच उचलत असतो. २२

टीप - अशा प्रकारे योगीला ओळखण्याच्या तीन खुणा आहेत - समत्व, कर्मकुशलता आणि अनन्य भक्ती. या तिन्ही गोष्टी ओतप्रोत भरलेल्या असल्या पाहिजे. भक्तीशिवाय समत्व प्राप्त होऊ शकत नाही. समत्वाशिवाय भक्ती करता येऊ शकत नाही. आणि कर्मकुशलतेशिवाय भक्ती आणि समत्व यांचा केवळ आभास होऊ शकण्याची शक्यता असते.

योगक्षेम शब्दात योगचा अर्थ आहे प्राप्त न झालेली वस्तू प्राप्त करणे आणि क्षेम शब्दाचा अर्थ प्राप्त झालेली वस्तू सांभाळून ठेवणे.

येऽप्यन्यदेवता भक्ता यजन्ते श्रद्धयान्विताः ।

तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम् ।। २३

याशिवाय हे कौंतेय, जे लोक श्रद्धापूर्वक दुसऱ्या देवाची भक्ती करतात ते जरी कोणताही विधी करत नसतील तरी माझीच भक्ती करत असतात. २३

टीप - विधिशिवाय याचा अर्थ आहे अज्ञानामुळे ईश्वराला निरंजन, निराकार न मानणे.

अहं हि सर्व यज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।

न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्चवन्ति ते ।। २४

सर्व यज्ञांचा उपभोग घेणारा स्वामी मीच आहे. परंतु माझ्या या खऱ्या स्वरूपाचे ज्यांना ज्ञान नसते म्हणून त्यांचे स्खलन होते. २४

यान्ति देवव्रतादेवान्पितॄन्यान्ति पितृव्रताः ।

भूतानि यान्ति भूतेज्या यान्ति मद्याजिनोऽपि माम् ।। २५

देवतांची पूजा करणाऱ्या लोकांना देवलोकांची प्राप्ती होते, पितरांचे पूजन करणाऱ्या लोकांना भूतादी राहतात त्या लोकांची प्राप्ती होते आणि माझी भक्ती करणारांना मी मिळतो. २५

३०

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।

तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।। २६

भक्तिभावाने मला पत्र, पुष्प, फळ वा जल अर्पण करणाऱ्या शुद्ध हृदयी माणसाने अर्पण केलेल्या गोष्टींचे मी सेवन करत असतो. २६

टीप - म्हणजेच ईश्वराकरिता जे काही प्राणिमात्रांना दिले जाते त्याचे त्या प्राण्यांमध्ये राहणाऱ्या अंतर्यामी स्वरूपातील ईश्वर सेवन करत असतो.

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि दादासि यत् ।

यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।। २७

यामुळे हे कौंतेय, तू जे करतोस, खातोस, हवनमध्ये तू ज्या गोष्टींचा हवी देतोस, दान देतोस वा तप करतोस ते सर्व तू मला अर्पण कर. २७

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबधनैः ।

संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ।। २८

यामुळे शभाशुभ फळे देणाऱ्या कर्मबंधनांपासून तू सुटशील आणि फलत्यागरूपी समत्व प्राप्त करून जन्ममरणातून मुक्त होशील आणि मला मिळवशील. २८

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।

ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ।। २९

सर्व प्राण्यांमध्ये मी समभावाने राहत असतो. मला कोणीही प्रिय वा अप्रिय नाही. असे असले तरी जे लोक भक्तिभावाने माझी पूजा करतात त्यांच्यात मी आणि माझ्यात ते असतात. २९

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।

साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ।। ३०

अत्यंत दुराचारी माणूसही अनन्य भावाने जर माझी भक्ती करील तर तो साधू झाला असेच समजण्यात आले पाहिजे. आता त्याचा संकल्प शुद्ध झालेला असल्यामुळे असे होते. ३०

टीप - अनन्य भक्ती दुराचार नष्ट करत असल्यामुळे असे होते.

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।

कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तःप्रणश्यति ।। ३१

तो लगेच धर्मात्मा बनतो आणि त्याला शांती प्राप्त होते. हे कौंतेय माझ्या भक्तांचा कधीही नाश होत नाही हे तू लक्षात ठेव. ३१

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।

स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।। ३२

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ।

अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ।। ३३

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।

मामैवैष्यसि युक्तैवमात्मानं मत्परायणः ।। ३४

हे पार्थ, जे लोक माझ्या आश्रयाला येतात त्या सर्वांना, मग ते पाप योनीतील असो की स्त्रिया असोत की वैश्य असोत की शुद्र असो, परम गती प्राप्त होते. असे असताना पुण्यवान भक्त, ब्राह्मण वा राजर्षी यांच्याविषयी वेगळे काही सांगितले पाहिजे काय?

यामुळे या अनित्य आणि सुखविरहित जगात जन्म घेऊनसुद्धा तू माझी भक्ती कर. तू माझ्यात मन लाव आणि माझी भक्ती कर. माझ्या निमित्ताने यज्ञ कर आणि मला नमस्कार कर. यामुळे तू स्वतःला माझ्याशी जोडशील आणि मला श्रेष्ठ समजून मला मिळवशील. ३२, ३३, ३४

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला ‘राजविद्या-राजगुह्ययोग’ नावाचा नऊवा अध्याय इथे समाप्त होतो.

१०. विभूतियोग

सातव्या, आठव्या आणि नऊव्या अध्यायात भक्ती आदींचे निरुपण केल्यानंतर या अध्यायात भगवान आपल्या अनंत विभुतिमत्वाचेदर्शन भक्तांच्या लाभाकरिता घडवतात.

३१

श्री भगवान उवाच -

भूय एव महाबाहो श्रृणु मे परमं वचः ।

यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ।। १

हे महाबाहो, परत एकदा तू माझे परम वचन ऐक. तू मला प्रिय असल्यामुळे तुझ्या हिताकरिता मी हे सांगतो आहे. १

न मे विदुः सुरगणः प्रभवं न महर्षयः ।

अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ।। २

देवांना आणि महर्षींना माझ्या उत्पत्तीचे वा प्रभावाचे रहस्य माहीत नाही कारण देवांच्या वा महर्षींच्या उत्पत्तीचे आदिकारण मी आहे. २

यो मामजमनादिं च वेत्ती लोकमहेश्वरम् ।

असम्मूढःस मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्चते ।। ३

अजन्मा आणि अनादी असा मीच सर्व लोकांचा महेश्वर आहे. हे ज्यांना माहीत असते ते मोहरहित होऊन सर्व पापांपासून मुक्त होतात. ३

बुद्धिर्ज्ञानमसम्मोहः क्षमा सत्यं दमः शमः ।

सुखं दुःखं भवोऽभावो भयं चाभयमेव च।।४

अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ।

भवन्ति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ।। ५

बुद्धी, ज्ञान, मूढता, क्षमा, सत्य, इंद्रियनिग्रह, शांती, सुखदु:ख, उत्पत्ती, विनाश, भय आणि अभय, अहिंसा, समता, संतोष तप. दान, यशापयश असे सर्व प्राण्यांमधील सर्व प्रकारचे भाव माझ्यापासूनच निर्माण होतात. ४, ५

टीप - भावचा अर्थ आहे पदार्थ, वृत्ती, अवस्था - द. बा. कालेलकर

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।

मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ।। ६

सप्तर्षी, त्यांचे चार सनकादी आणि (चौदा) मनू माझ्या संकल्पातून निर्माण झाले आहेत आणि त्यांच्यापासून या जगातील सर्व प्राणी निर्माण झाले आहेत. ६

एतां विभूर्ति योगं च मम यो वेत्ती तत्त्वतः ।

सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ।। ७

जो माणूस माझ्या या विभुतिमत्त्वाला आणि सामर्थ्याला चांगल्या प्रकारे ओळखतो त्याच्यामध्ये अविचल श्रद्धाभाव निर्माण होतो यात काही संशय नाही. ७

अहं सर्वस्य प्रभवो मत्ताः सर्व प्रवर्तते ।

इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ।। ८

मी सर्वांच्या उत्पत्तीचे कारण आहे, आणि सर्व काही माझ्यामुळेच चालत असते. हे ओळखून शहाणे लोक भक्तिभावाने माझी पूजा करत असतात. ८

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् ।

कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ।। ९

माझ्यात चित्त एकाग्र करणारे लोक एकदुसऱ्याला उपदोश करत सदैव माझे कीर्तन करून समाधानात आणि आनंदात राहतात. ९

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतीपूर्वकम् ।

ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ।। १०

अशा प्रकारे माझ्यात तन्मय असणाऱ्या आणि प्रेमाने माझी भक्ती करणाऱ्या लोकांना मी बुद्धी, शक्ती आणि ज्ञान देत असतो. १०

तेषामेवानुकम्पार्थमहमज्ञानजं तमः ।

नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ।। ११

त्यांच्यावर अनुग्रह करून त्यांच्या अंतःकरणात वसलेला अज्ञानरूपी अंधकार मी ज्ञानरूपी प्रकाशाच्या दिव्याने दूर करत असतो. ११

३२

अर्जुन उवाच -

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।

पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ।। १२

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।

असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ।। १३

हे भगवान, तू परम ब्रह्म आहेस, परमधाम आहेस, परमपवित्र आहेस. सर्व ऋषिगण, देवर्षी नाराद, देवल आणि व्यास तुला अविनाशी दिव्य पुरुष, आदिदेव, अजन्मा आणि सर्वव्यापी म्हणत असतात. तू स्वतःही मला असेच सांगत असतो. १२, १३

सर्वमेतदुतं मन्ये यन्मां वदसि केशव ।

न हि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ।। १४

हे केशवा तू मला जे सांगतो आहेस ते मला मान्य आहे. हे भगवान, तुझे स्वरूप ना तर देवतांना माहीत आहे ना दानवांना. १४

स्यमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ।

भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ।। १५

हे पुरुषोत्तम, हे सर्व जिवांचे पिता, हे जीवेश्वर, हे जगतस्वामी, तू स्वतःच स्वतःतर्फे स्वतःला ओळखतोस. १५

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ।

याभिर्विभूतिभिर्लोकानिमास्त्वं व्याप्य तिष्ठसि ।। १६

ज्या विभूतीच्या माध्यमातून तू या जगाला व्यापले आहेस त्या सर्व विभूतींबद्दल मला कृपा करून सविस्तर सांग. १६

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिन्तयन् ।

केषु केषु च भावेषु चिन्त्योऽसि भगवन्मया ।। १७

हे योगिन, तुझे सतत चिंतन करत असताना मी तुला कसा ओळखू? हे परमेश्वरा, कोणत्या स्वरूपात मी तुझे चिंतन केले पाहिजे? १७

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन

भूयः कथय श्रृण्वतो नास्ति मेऽमृतम । १८

हे जनार्दन, तुझ्या शक्तीचे आणि विभूतिमत्वाचे वर्णन माझ्यासमोर परत एकदा सविस्तरपणे कर. तुझी अमृत वाणी कितीही वेळा ऐकली तरी माझी तृप्ती होत नाही. १८

श्री भगवान उवाच -

हन्त ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभतयः ।

प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यन्तो विस्तरस्य मे ।। १९

ठीक आहे, मी तुला माझ्या ज्या मुख्य विभूती आहेत त्यांच्याबद्दल सांगेन. परंतु हे कुरुक्षेत्र, माझ्या विस्ताराला सीमा नाही. १९

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।

अहमादिश्च मध्यं च भूतानामन्त एव च ।। २०

हे गुडाकेश, सर्व प्राण्यांमध्ये वसलेला आत्मा मी आहे. मीच सर्व भूतांचा आदी, मध्य आणि अंत आहे. २०

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ।

मरीचिर्मरुतामस्मी नक्षत्रणामहं शशी ।। २१

आदित्यांमध्ये मी विष्णू,आहे, ज्योतिषी लोकांमध्ये मी झळझळणारा सूर्य आहे, वायूमध्ये मी मरीची आहे, नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे. २१

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ।

इन्द्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ।। २२

वेदांमध्ये मी सामवेद आहे, इंद्रियांमध्ये मी मन आहे, आणि प्राण्यांमध्ये मी चैतन्य आहे.२२

रुद्राणां शङ्करश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ।

वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ।। २३

रुद्रांमध्ये मी शंकर आहे आणि राक्षसांमध्ये मी कुबेर आहे. वायूंमध्ये मी अग्नी आहे आणि पर्वतांमध्ये मी मेरू आहे. २३

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ।

सेनानीनामहं स्कन्दः सरसामस्मि सागरः ।। २४

हे पार्थ, पुरोहितांमध्ये तू मला बृहस्पती समज, सेनापतींमध्ये मी कार्तिक स्वामी आहे आणि सरोवरांमध्ये सागर आहे. २४

महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्ये कमक्षरम् ।

यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः । २५

महर्षींमध्ये मी भृगू आहे, वाणीमध्ये मी एकाक्षरी ॐ आहे, यज्ञात मी जपयज्ञ आहे आणि स्थावरांमध्ये मी हिमालय आहे. २५

अश्वत्थः सर्व वृक्षाणां देवर्षीणां च नारदः ।

गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ।। २६

सर्व वृक्षांमध्ये मी अश्वत्थ आहे, देवर्षींमध्ये मी नारद आहे, गंधर्वांमध्ये मी चित्ररथ आहे आणि सिद्धांमध्ये मी कपिलमुनी आहे. २६

उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ।

ऐरैवतं गजेन्द्राणां नराणां च नराधिपम् ।। २७

अश्वांमध्ये मी अमृतमंथनाच्या वेळी उत्पन्न झालेला उच्चैश्रवा आहे असे तू समज, हत्त्यांमध्ये मी ऐरावत आहे आणि माणसांमध्ये मी राजा आहे. २७

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ।

प्रजनश्चास्मि कन्दर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ।। २८

आयुधांमध्ये मी वज्र आहे, गायींमध्ये मी कामधेनू आहे. संततीच्या उत्पत्तीचे कारण असलेला मी कामदेव आहे आणि सर्पांमध्ये मी वासुकी आहे. २८

अनन्तश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ।

पितृणामर्थमा चास्मि यमः संयमतामहम् ।। २९

नागांमध्ये मी शेषनाग आहे, जलधरांमध्ये मी वरुण आहे, पितरांमध्ये मी अर्यमा आहे तसेच नियमनात ठेवणारा मी यम आहे. २९

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कालयतामहम् ।

मृगाणां च मृगेन्द्रोऽहं वैनतेयेश्च पक्षिणाम् ।।;३०

दैत्यांमध्ये मी प्रह्लाद आहे, गणना केली जाणारात मी काळ आहे, पशूंमध्ये मी सिंह आहे आणि पक्ष्यांमध्ये मी गरूड आहे. ३०

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ।

झषाणां मकरश्चास्मिस्त्रोतसामस्मि जाह्नवी ।। ३१

पावन करणारात मी पवन आहे, शस्त्र धारण करणारा मी (परशू) राम आहे, माशांमध्ये मी मगर आहे आणि नद्यांमध्ये मी गंगा आहे. ३१

सर्गाणामादिन्तश्च मध्यं चौवाहमर्जुन ।

अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ।। ३२

सृष्टीचा आरंभ, मध्य आणि अंत मी आहे, विद्यांमध्ये मी अध्यात्मविद्या आहे, आणि विवाद करणारातील वाद मी आहे. ३२

अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्व सामासिकस्य च ।

अहमेवाक्षयः कालो धाताहं विश्वतोमुखः ।। ३३

अक्षरांमध्ये मी अकार आहे, समासांमध्ये मी द्वंद्वसमास आहे, अक्षय काळ मी आहे, आणि चोहोकडे मुख असणारा विधाता मी आहे. ३३

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ।

कीर्तिः क्षीर्वाक्च नारीणां समृतिरमेधा धृतिः क्षमा ।। ३४

सर्वस्वाचे हरण करणारा मी मृत्यू आहे, भविष्यात उत्पन्न होणारांचे उत्पत्तीकारण मी आहे. आणि स्त्री जातींच्या नावांमध्ये कीर्ती, लक्ष्मी, वाणी, स्मृती, मेधा (बुद्धी) धृती (धीर) तसेच क्षमा मी आहे. ३४

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छन्द सामहम् ।

मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ।। ३५

सामांमध्ये बृहद सामस्तोत्र मी आहे, छंदामध्ये गायत्री छंद मी आहे, मासांमध्ये मार्गशीर्ष मास मी आहे आणि ऋतूंमध्ये वसंतऋतू मी आहे. ३५

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ।

जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ।। ३६

कपट करणारांमध्ये द्यूत मी आहे, प्रतापी पुरुषांचा प्रभाव मी आहे, विजय मी आहे, निश्चय मी आहे, तसेच सात्त्विक भाव असणारांचे सत्त्व मी आहे. ३६

टीप - कपट करणारांमध्ये द्यूत मी आहे या शब्दांमुळे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. इथे चांगल्यावाईटाचा निर्णय घेण्याचे कारण नाही. इथे सांगण्याचा आशय हाच आहे की जे काही होते ते ईश्वराच्या इच्छेशिवाय होत नाही.

आणि सर्व काही ईश्वराच्या इच्छेने होत असते हे लक्षात घेऊन कपट करणाऱ्या माणसानेही फसवणुकीचा मार्ग टाकून द्यावा.

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः ।

मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ।। ३७

यादवकुळात वासुदेव मी आहे, पांडवांमध्ये धनंजय (अर्जुन) मी आहे, मुनींमध्ये व्यास मी आहे आणि क्रांतदर्शी कवींमध्ये उशना (शुक्राचार्य) मी आहे. ३७

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ।

मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ।। ३८

राज्यकर्त्यांचा राजदंड मी आहे, विजयाची इच्छा करणाराची नीती मी आहे, गोपनीय गोष्टींमध्ये मौन मी आहे, आणि ज्ञानी लोकांचे ज्ञान मी आहे. ३८

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहर्जुन ।

न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ।। ३९

हे अर्जुना, सर्व प्राण्यांच्या उत्पत्तीचे जे बीज आहे ते मी आहे, जे काही स्थावर जंगम आहे ते माझ्याशिवाय नाही, ३९

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतानां परन्तप ।

एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ।। ४०

हे परंतप माझ्या दिव्य विभूतीचा अंत नाही. माझ्या विभूतींचे इतके सविस्तर वर्णन मी जे केले आहे ते केवळ उदाहरण म्हणून केले आहे. ४०

यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।

तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसम्भवम् । ४१

जे काही विभुतीयुक्त आहे, लक्ष्मीवान वा प्रभावशाली आहे ते सर्व माझ्या माझ्या तेजाच्या अंशातून निर्माण झाले आहे असे तू समज. ४१

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।

विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेनस्थितो जगत् ।। ४२

अथवा हे अर्जुना, हे सर्व विस्ताराने ऐकून तू काय करशील? माझ्या केवळ एका अंशाने मी हे सर्व जग धारण केले आहे. ४२

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'राजविद्या-राजगुह्ययोग' नावाचा नऊवा अध्याय इथे समाप्त होतो.

११. विश्वरूपदर्शनयोग

या अध्यायात भगवान आपले विराट रूप अर्जुनाला दाखवतात. भक्तांना हा अध्याय अतिशय प्रिय आहे. यात तर्क नसून केवळ काव्य आहे. या अध्यायाचा पाठ करताना भक्त कधीही थकत नाहीत.

३३

अर्जुन उवाच -

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्म सञ्ज्ञितम् ।

यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ।। १

माझ्यावर कृपा करून तू मला हे आध्यात्मिक रहस्य सांगितलेस. तुझ्या या वचनांनी माझा सर्व मोह दूर झाला आहे. १

भवाप्ययौहि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ।

त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्यय ।। २

सर्व भूतांच्या उत्पत्तीविषयी आणि नाशाविषयी तुझ्या तोंडून मी विस्तारपूर्वक ऐकले आहे. हे कमलपत्राक्ष, तुझे अविनाशी महात्म्य मी ऐकले आहे. २

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ।

द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ।। ३

हे परमेश्वरा, हे पुरुषोत्तमा, तू तुझ्या ज्या ईश्वरी रूपाची मला ओळख करून दिली ते ईश्वरी रूप पाहण्याची मला इच्छा आहे. ३

मन्यसे यदि तच्छकं मया द्रष्टुमिति प्रभो ।

योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्यम् ।। ४

हे प्रभो, त्या रूपाचे दर्शन करणे माझ्याकरिता शक्य आहे असे तू मान्य करत असशील तर हे योगेश्वर, तू मला तुझ्या या अव्ययी-अविनाशी रूपाचे दर्शन घडव. ४

श्री भगवान उवाच -

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्त्रशः ।

नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतिनि च ।। ५

हे पार्थ, माझ्या अनेक प्रकारच्या दिव्य आणि विविध रंगातील आणि आकारातील शेकडो आणि हजारो रूप तू पाहा. ५

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्थथा ।

बहुन्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ।। ६

हे भारत, तू आदित्य, वसू, रुद्र, दोन्ही अश्विनीकुमार आणि मरुताला पाहा. आधी न पाहिलेले अनेक आश्चर्य तू पाहा. ६

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ।

मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छासि ।। ७

हे गुडाकेश, या माझ्या शरीरात एका रूपात स्थिर असलेले सर्व चल आणि अचल जग तू पाहा. अजूनही तुला जे काही पाहायचे असेल ते आज तू पाहून घे. ७

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।

दिव्यं ददामि ते चक्षूः पश्य मे योगमैश्वरम् ।। ८

परंतु या तुझ्या चर्मचक्षूंनी तू मला पाहू शकत नाहीस. यामुळे मी तुला दिव्यचक्षू देतो. त्या डोळ्यांनी तू माझे ईश्वरी योगसामर्थ्य पाहा. ८

संजय उवाच -

एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ।

दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ।। ९

हे राजन, महायोगेश्वर कृष्णाने अर्जुनाला आपले परम विश्वरूप दाखवले. ९

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ।

अनेक दिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ।। १०

अनेक तोंड आणि डोळे असलेले, अनेक अद्भुत रूप असलेले, अनेक दिव्य आभुषण ल्यालेले आणि अनेक दिव्य शस्त्र धारण केलेले हे रूप आहे. १०

दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगंधानुलेपनम् ।

सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ।। ११

त्याने अनेक हार आणि वस्त्र धारण केलेले आहेत आणि त्याने अनेक सुगंधित लेप लावलेले आहेत. सर्व प्रकारच्या आश्चर्यांनी परिपूर्ण अनंत आणि सर्वव्यापी असे ते रूप आहे. ११

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ।

यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ।। १२

एक हजार सूर्यांचे तेज एकाच वेळी झळाळले तर ते कदाचित या महापुरुषासारखे दिसेल. १२

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकथा ।

अपश्यद्देवदेवस्य शरीरे पाण्डवस्तदा ।। १३

त्या देवाधिदेवाच्या शरीराच्या विविध भागात विभागलेल्या जगाचे पांडवाने एकाच वेळी दर्शन घेतले. १३

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमाधनञ्जयः ।

प्रणम्य शिरसा देवं कृताञ्जलिरभाषत ।। १४

त्यानंतर आश्चर्यचकित आणि रोमांचित झालेला धनंजय नतमस्तक होऊन आणि हात जोडून असे म्हणाला - १४

अर्जुन उवाच -

पश्यामि देवांस्तव देव देहे

सरवांस्तथा भूतविशेष सङ्घान् ।

ब्रह्माणमीशं कमलासनस्थ -

मृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान ।। १५

हे देवा, तुझ्या शरीरात मी सर्व देवांना, विविध प्रकारच्या सर्व प्राण्यांच्या समुदायाना, कमलासनावर स्थित ब्रह्मदेवाला, सर्व ऋषींना आणि दिव्य सर्पांना पाहतो आहे. १५

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं -

पश्यामि त्वां सर्वतोऽनन्तरूपम् ।

नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं -

पश्यामि विश्वेश्वर विश्वरूप ।। १६

अनेक हात, पोट आणि डोळे असलेले तुझे अनंत रूप मी पाहतो आहे. हे विश्वेश्वरा मला ना तर तुझा अंत दिसतो, ना मध्य दिसतो आणि ना आदी दिसतो. १६

किरीटिनं गदिनं चक्रिणं च

तेजोराशिं सर्वतो दीप्तिमन्तम् ।

पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समन्ता -

द्दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम ।। १७

मी तुला मुकुटधारी, गदाधारी, चक्रधारी, तेजःपूंज सर्व दिशांनी प्रकाशत असलेल्या तेजस्वी रूपात पाहतो आहे. तुझे रूप पाहता येणे फार कठीण आहे. अमर्यादित आणि प्रज्ज्वलित अग्नीप्रमाणे ते सर्व दिशांनी प्रकाशमान झालेले आहे. १७

त्वमक्षरं परमं वेदितव्यं -

त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।

त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता

सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ।। १८

तूच जाणून घेण्यायोग्य परम, अक्षर आणि अविनाशी आहेस. तूच या जगाचा अंतिम आधार आहेस, धर्माचा अविनाशी रक्षक आहेस, आणि तूच सनातन पुरुष आहेस. १८

अनादिमध्यान्तमनन्तवीर्य-

मनन्तबाहुं शशिसूर्यनेत्रम् ।

पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं-

स्वतेजसा विश्वमिदं तपन्तम्।। १९

ज्याचा आदी, मध्य वा अंत नाही, ज्याची शक्ती अनंत आहे, ज्याला अनेक भुजा आहेत, ज्याचे सूर्यचंद्ररूपी डोळे आहेत, ज्याचे मुख अग्नीप्रमाणे तेजस्वी आहे, आणि जो आपल्या तेजाने या जगाला उष्णता देतो असे तुझे हे अद्भुत रूप मी पाहतो आहे. १९

द्यावापृथिव्योरिदमन्तरं हि

व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ।

दृष्ट्वाद्भुतम रूपमुग्रं तवेदं-

लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ।। २०

आकाश आणि पृथ्वी यांच्यामधील अंतराला तसेच सर्व दिशांना तू एकट्यानेच व्यापले आहे. हे महात्मन तुझे अद्भुत रूप पाहून सर्व लोक थरथर कापतात. २०

अमि हि त्वां सुरसंङ्घा विशन्ति

केचिद्भीताः प्राञ्जलयो गुणन्ति ।

स्वस्तीयुक्त्वा महर्षिसिद्धसङ्घाः

स्तुवन्ति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ।। २१

आणि असे पाहा की देवांचा हा समूह तुझ्यात प्रवेश करतो आहे. भयभीत झालेले काही देव हात जोडून तुझे स्तवन करत आहेत. महर्षी आणि सिद्धांचे समूह (जगाचे) कल्याण होवो असे म्हणत विविध प्रकारे तुझे यशोगान करत आहेत. २१

रुद्रादित्या वसवो ये च साध्या -

विश्वेऽश्विनौ मरुत्तश्चोष्मपा श्च ।

गन्धर्वयक्षासुरसिद्धसङ्घा -

वीक्षन्ते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ।। २२

रुद्र, आदित्य, वसू, साध्य, विश्वदेव, अश्विनीकुमार, मरुत्गण, केवळ उष्णतापान करणारे पितर आणि गंधर्व, असुर आणि सिद्धांचे संघ हे सर्व आश्चर्यचकित होऊन तुला पाहत आहेत. २२

टीप - शरीराची उष्णता टिकून राहते तोपर्यंतच शरीरातील प्राण टिकून राहतात. ही उष्णता आपण अन्नातून मिळवतो. सूक्ष्म शरीर असलेले पितर अन्न खाऊ शकत नाहीत. यामुळे ते सरळ त्याची उष्णता पितात असा समज त्या काळात राहिला असावा. यामुळे इथे पितरांना उष्णपा म्हटलेले आहे. - द. बा. कालेलकर

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं -

महाबाहो बहुबाहूरुपादम्।

बहुदरं बहुदंष्ट्राकरालं -

दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाहम् ।। २३

हे महाबाहो, अनेक तोंड आणि डोळे असणारे, अनेक हात, पाय. आणि मांड्या असलेले, अनेक पोट आणि अनेक दाढा असल्यामुळे विकराळ दिसणारे तुझे हे विराट रूप पाहून सर्व लोक व्याकूळ झाले आहेत, आणि मीसुद्धा व्याकुळलो आहे. २३

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं -

व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ।

दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा

धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ।। २४

आकाशाला स्पर्श करणारे, झगमगित, विविध रंग असलेले उघडे तोंड व विशाल आणि तेजस्वी नेत्र असलेले तुझे हे रूप पाहून माझे हे हृदय व्याकुळले आहे आणि माझा धीर सुटला आहे. २४

दंष्ट्राकरालानि च ते मुखानी

दृष्ट्वैव कालानलसन्निभानि ।

दिशो न जाने न लभे च शर्म

प्रसीद देवश जगन्निवास ।। २५

प्रलयकाळातील अग्नीप्रमाणे प्रज्ज्वलित आणि विकराळ दाढा असलेला तुझा हा चेहरा पाहिल्यानंतर ना तर मला दिशा दिसतात, ना शांतता जाणवते. यामुळे हे देवेश, हे जगन्निवास तू आता प्रसन्न हो. २५

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः

लर्वे सहैवावनिपालसङ्घेः ।

भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ

सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ।। २६

वक्त्राणि ते त्वरमाणा विशन्ति

दंष्ट्राकरालानि भयानकानि

केचिद्विलग्ना दशनान्तरेषु

सन्दृश्यते चूर्णितैरुत्तमाङ्गैः २७

सर्व राजांच्या समुदायाबरोबर धृतराष्ट्रपुत्र, भिष्म, द्रोणाचार्य, सारथीपुत्र कर्ण आणि आपले योद्धा लोक हे सर्व तुझ्या विकराळ दाढा असलेल्या तोंडात वेगात प्रवेश करत आहेत. काही लोकांच्या डोक्याचा चुरा होऊन त्यांचे तुकडे तुकडे होऊन ते तुझ्या दाढांना चिकटलेले दिसत आहेत. २६, २७

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगः

समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।

तथा तवामी नरलोकवीरा -

विशन्ति वक्त्राण्यभिविज्वलन्ति ।। २८

ज्याप्रमाणे नद्यांचे विविध प्रवाह सागराकडे धावत असतात त्याचप्रमाणे हे लोकनायक तुझ्या मुखात प्रवेश करत आहेत. २८

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतङ्गा -

विशंन्ति नाशाय समृद्धवेगाः

तथैव नाशाय विशन्ति लोका -

स्तवापि वक्त्राणिसमृद्धवेगा ।। २९

ज्याप्रमाणे पतंग आपल्या विनाशाकरिता भडकलेल्या ज्वालांमध्ये वेगात प्रवेश करतात त्याचप्रमाणे हे सर्व लोक आपल्या नाशाकरिता तुझ्या मुखात प्रवेश करत आहेत. २९

लेलिह्यसे ग्रसमानः समन्ता -

ल्लोकान्समग्रान्वंदनैर्ज्वलद्भिः ।

तेजोभिरापूर्यजगतसमग्रं -

भासस्तयोग्राः प्रतपन्ति विष्णो ।। ३०

सर्व लोकांना चोहोबाजूने गिळून अग्निज्वालांप्रमाणे भडकलेल्या तुझ्या मुखाने तू त्यांना पाहतो आहेस. हे सर्वव्यापी विष्णू, तुझा प्रचंड प्रकाश संपूर्ण जगाला आपल्या तेजाने पोळतो आहे. ३०

आख्याहि मे को भवानुग्ररूपो -

नमोऽस्तु ते देववर प्रसीद ।

विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं -

न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ।। ३१

तू मला सांग की हे उग्र रूप धारण केलेला तू कोण आहेस? हे देवधर मी तुला नमस्कार करतो. तू प्रसन्न हो. आदिकारणरूपातील मला तुझी ओळख हवी आहे, कारण तुझ्या सर्व प्रवृत्तींचे मला ज्ञान नाही. ३१

श्री भगवान उवाच -

कालोऽस्मि लोकक्षयकृतप्रवृद्धो -

लोकान्समाहर्तुमिह प्रवत्तः ।

ऋतेऽपि त्वां न भविष्यन्ति सर्वे

येऽवस्थितः प्रत्यनीकेषु योधाः ।। ३२

लोकांचा नाश करणारा विकराळ स्वरूपातील मी काळ आहे. मानवजातीचा नाश करण्याकरिता मी इथे आलो आहे. युद्ध करण्याला जरी तू नकार दिला तरी विरोधकांच्या सैन्यातील जे योद्धागण इथे उभे आहेत त्यापैकी कोणीही जिवंत राहणार नाही. ३२

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व

जित्वा शत्रून्भूङ्क्ष्वराज्यं समृद्धम् ।।

मयैवैते निहताः पूर्वमेव

निमित्तमात्रं भव स्वयसाचिन् ।। ३३

यामुळे तू ऊठ, कीर्ती मिळव,आणि शत्रूंवर विजय मिळवून धनधान्याने समृद्ध राज्याचा उपभोग घे. मी यांना आधीच मारून टाकलेले आहे. यामुळे हे सव्यसाची तू केवळ निमित्तमात्र हो. ३३

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च

कर्ण तथान्यानपि योधवीरान ।

मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा -

युद्धस्व जेतासि रणे सपत्नान् ।।

माझ्या हातून मारले गेलेले द्रोण, भिष्ण, जयद्रथ, कर्ण, तसेच इतर योद्ध्यांना तू केवळ (नावाकरिता) मार. तू घाबरू नकोस. युद्धात लढ. तू रणांगणात शत्रूंवर नक्कीच विजय मिळवणार आहेस. ३४

३५

संजय उवाच -

एतच्छुत्वा वचनं केशवस्य

कृतांञ्जलिर्वेपमानः किरिटी ।

नमस्कृत्वा भूव एवाह कृष्णं -

सगद्गदं भीतभातः प्रणम्य ।। ३५

केशवाचे हे शब्द ऐकून मुकुटधारी अर्जुनाने थरथरत हात जोडून भयभीत होऊन वारंवार प्रणाम केला, आणि गद्गद कंठाने तो श्रीकृष्णाला म्हणाला - ३५

अर्जुन उवाच -

स्थाने हृषिकेश तव प्रकीर्त्या

जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।

रक्षांसि भीतानि दिशो द्रवन्ति

सर्वे नमस्यन्ति च सिद्धसङ्घाः ।।

हे हृषिकेश, तुझे कीर्तन करताना जगाला हर्ष होतो आहे आणि तुझ्याबद्दल प्रेमाची भावना निर्माण झाली आहे हे योग्यच आहे. भयभीत झालेले राक्षस इकडेतिकडे पळत आहेत आणि सिद्धिप्राप्त सर्व लोकांचा समुदाय तुला नमस्कार करतो आहे. (हे योग्यही आहे.) ३६

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन्

गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे

अनंत देवेश जगन्निवास

त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ।। ३७

हे महात्मन, ते तुला का नमस्कार करणार नाहीत? तू ब्रह्मापेक्षा मोठा आदिकर्ता आहेस, अनंत आहेस. हे देवेश, हे जगन्निवास, तू अक्षर - अविनाशी आहेस, सत आहेस,आणि असतही आहेस. आणि या सर्वांपलीकडे जे काही आहे तेही तूच आहेस. ३७

त्वमादिदेवः पुरुषः पुराण -

स्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ।

वेत्तासि वेद्यंच परं च धाम

त्वया ततं विश्वमनन्तरूप ।। ३८

तू आदिदेव आहेस, तू पुराणपुरुष आहेस, तू या विश्वाचा परम आश्रयस्थान आहेस. तू वेत्ता म्हणजो जाणणारा आहेस, आणि वेद्य म्हणजे जाणण्यालायकही आहेस. तू परंधाम आहेस. हे अनंतरूप या जगात तू सर्वत्र व्याप्त आहेस. ३८

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशाङ्कः

प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ।

नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्व

पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ।। ३९

तूच वायू, अग्नी, यम, वरुण चंद्र, प्रजापती आणि प्रपितामह आहेस. तुला माझे हजारो नमस्कार. आणि अजूनही परत एकदा मी तुला नमस्कार करतो. ३९

नमः पुरास्तदथ पृष्ठतस्ते

नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ।

अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं -

सर्व समाप्तोषि ततोऽसि सर्वः ।। ४०

हे सर्व, तुला मी समोरून, मागून, चोहोकडून नमस्कार करतो. तुझे शौर्य, तुझी शक्ती अनंत आहे. तुझे पराक्रम अपार आहेत. तूच सर्वांना व्यापलेले आहे. यामुळे तू सर्व आहेस. ४०

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं -

हे कृष्ण हे यादव हे सखेति ।

अजानता महिमानं तवेदं -

मया प्रमादात्प्रणयेन वापि ।। ४१

यच्चावहास्वार्थमसत्कृतोऽसी

विहारशय्यासनभोजनेषु ।

एकोऽथवाप्यच्युत तत्समक्षं -

तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ।। ४२

तुझा हा सर्व महिमा माहीत नसल्यामुळे मित्र समजून न कळत 'हे कृष्णा, हे यादवा, हे सखा' असे तुला म्हणण्यात चूकून वा प्रेमाने माझ्याकडून जो अविवेक झाला आणि विनोद

करताना, खेळताना, झोपताना, बसताना वा खाताना व अनेक लोकांमध्ये माझ्याकडून तुझा जो अपमान झाला असेल त्याकरिता हे अगम्यरूप तू मला क्षमा करावी अशी माझी तुला प्रार्थना आहे. ४१, ४२

पितासि लोकस्यचराचरस्य

त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।

न त्वतसमोऽस्त्यभ्यधिकाः कुतोऽन्यो -

लोकत्रयेऽप्यप्रतिप्रभाव ।। ४३

तू चल आणि अचल जगाचा पिता आहेस. तू त्यांचा पूज्य आणि श्रेष्ठ गुरू आहेस. हे अनुपमेय तू प्रभावशाली आहेस. जिथे तुझ्यासारखाच कोणी नाही तिथे तुझ्यापेक्षा श्रेष्ठ कोणी कसा काय असू शकेल? ४३

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं -

प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ।

पितेव पुत्रस्य सखेव सखुः

प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ।। ४४

यामुळेच तुला साष्टांग प्रणाम करत परमपूज्य अशा तुला प्रसन्न होण्याची प्रार्थना करतो. ज्याप्रमाणे वडील आपल्या मुलांना, मित्र आपल्या मित्रांना, सहन करतात त्याचप्रमाणे तू मला प्रिय असल्यामुळे माझ्या कल्याणार्थ तू मला सहन कर. ४४

अदृष्टपूर्व हृषितोऽस्मि दृष्ट्वा

भयेन च प्रव्यथितं मनो मे ।

तदेव मे दर्शय देवरूपं -

प्रसीद देवेश जगन्निवास ।। ४५

आधी न पाहिलेले तुझे हे रूप पाहून माझ्या अंगावर शहारे उभे राहिले आहेत आणि भीतीमुळे माझे मन व्याकूळ झाले आहे. यामुळे हे देवा, याआधीचे तुझे पूर्वीचे रूप तू मला दाखव. हे देवेश, हे जगन्नाथ तू मला प्रसन्न हो. ४५

किरीटिनं गदिनं चक्रहस्त -

मिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ।

तेनैव रूपेण चतुर्भुजेन

सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ।। ४६

मी तुझ्या पूर्वीच्या मुकुटगदाधारी रूपाचे दर्शन घेऊ इच्छितो. हे सहस्रबाहो, हे विश्वमूर्ती, तू तुझे पूर्वीचे चतुर्भूज रूप धारण कर. ४६

३६

श्री भगवान उवाच -

रूपं परं दर्शितमात्मयोगात् ।

तेजोमयं विश्वमनन्तमाद्यं -

यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ।। ४७

हे अर्जुना तुझ्यावर प्रसन्न होऊन मी माझ्या योगशक्तीने माझे तेजोमय, विश्वव्यापी, अनंत, परम, आदी रूप दाखवले. तुझ्या आधी कोणीही माझे हे रूप पाहिले नाही. ४७

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानेर्-

न च क्रियाभिर्नतपोभिरुग्रैः ।

एवंरूपः शक्य अहं नृलोके

द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ।। ४८

हे कुरुप्रवीर, वेदाभ्यासाने, यज्ञाने, इतर शास्त्रांच्या अभ्यासाने, दानाने, क्रियांनी, कठोर तपांनी तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणीही माझे हे रूप पाहिले नाही. ४८

मा ते व्यथा मा च विमूढभावो-

दृष्ट्वारूपं घोरमीदृङ्ममेदम् ।

व्यपेतभीः प्रीतमनः पुनस्त्वं -

तदैव मे रूपमिदं प्रपश्य ।। ४९

माझे हे विकराळ आणि भव्य रूप पाहून तू घाबरू नकोस, चिंतित होऊ नकोस. भीती सोडून तू शांतचित्त हो आणि माझे हे परिचित रूप तू परत पाहा. ४९

संजय उवाच -

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा

स्वकं रूपं दर्शयामासभूयः ।

आश्वासयामास च भीतमेनं -

भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ।। ५०

असे म्हणून वासुदेवाने अर्जुनाला परत आपले पूर्वीचे रूप दाखवले. शांत मूर्तीचे रूप परत धारण करून त्या महात्म्याने अर्जुनाला धीर दिला. ५०

अर्जुन उवाच -

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ।

इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ।। ५१

हे जनार्दन, तुझे सौम्य मानवरूप पाहून मी शांत आणि प्रसन्नचित्त झालो आहे आणि आता मी परत स्वाभाविक स्थितीत आलो आहे. ५१

श्री भगवान उवाच -

सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।

देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ।। ५२

तू माझे जे रूप पाहिले त्याचे दर्शन फार दुर्लभ आहे. देवसुद्धा त्या दर्शनाकरिता लालायित असतात. ५२

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ।

शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ।। ५३

तुला माझे जे दर्शन झाले ते ना तर वेदांनी, ना तपाने, ना दानाने, ना यज्ञाने होऊ शकते.५३

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ।

ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परन्तप ।। ५४

परंतु हे अर्जुना, हे परंतप, माझ्याबद्दलचे असे ज्ञान, माझे असे दर्शन आणि माझ्यात असा खरा प्रवेश या गोष्टी केवळ माझ्या अनन्य भक्तांनाच प्राप्त होत शकतात. ५४

मत्कर्म कृन्मत्परमो मद्भक्तः सङ्‌वर्जितः ।

निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पाण्डव ।। ५५

हे पांडवा, जो माणूस आपले सर्व कर्म मला अर्पण करतो, माझ्यात परायण - लीन असतो, माझा भक्त होतो, आसक्ती सोडतो आणि प्राणिमात्रांबद्दल द्वेषरहित होऊन राहतो तो मला प्राप्त करून घेतो. ५५

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'विश्वरूपदर्शनयोग' नावाचा अकरावा अध्याय इथे समाप्त होतो.

१२. भक्तियोग

पुरुषोत्तमाचे दर्शन अनन्य भक्तीनेच होऊ शकते. अशी स्थिती असल्यामुळे परमेश्वराच्या दर्शनानंतरच भक्तीचे स्वरूप निश्चित करता येऊ शकते.

हा बारावा अध्याय सर्वांनी मुखोद्गत केला पाहिजे. हा गीतेतील सर्वात लहान अध्याय आहे. यात भक्ताचे जे लक्षण सांगितले आहे त्याचे सर्वांनी मनन केले पाहिजे.

३७

अर्जुन उवाच -

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ।

ये चाप्यक्षरंव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ।। १

अशा प्रकारे जे भक्त तुझे ध्यान करत तुझी उपासना करतात आणि जे तुझ्या अविनाशी अव्यक्त स्वरूपाचे ध्यान करतात यातील कोणता योगी श्रेष्ठ समजला जाईल? १

श्री भगवान उवाच -

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।

श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ।। २

जे लोक नित्य माझे ध्यान करत माझ्या ठिकाणी मन लीन करून परम श्रद्धेने माझी उपासना करतात त्यांना मी श्रेष्ठ योगी समजतो. २

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ।

सर्वत्रगमचिन्त्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ।। ३

सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ।

ते प्राप्नुवन्ति मामेव सर्वभूतहिते रताः ।। ४

जे लोक सर्व इंद्रियांना ताब्यात ठेवून, सर्वांबद्दल समभाव ठेवून माझ्या अचिंत्य, दृढ, अचल, धीर सर्वव्यापी, अव्यक्त, अवर्णनीय आणि अविनाशी स्वरूपाची उपासना करतात ते सर्व प्रांण्यांच्या हिताच्या भावनेने ओतप्रोत होऊन मला प्राप्त करतात. ३, ४

क्लेशोऽअधिकतरस्तेषांव्यक्तासक्तचेतसाम् ।
अव्यक्ता हि गतिर्दुःखम देहवद्भिरवाप्यते ।। ५

ज्या माणसाचे चित्त अव्यक्तात गुंतलेले असते त्याला अधिक त्रास होत असतो. देहधारी माणूस अत्यंत कष्ट सहन करूनच अव्यक्त गती प्राप्त करू शकतो. ५

टीप - देहधारी माणूस अमूर्त स्वरूपाची केवळ कल्पनाच करू शकतो. त्याच्याजवळ अव्यक्त स्वरूपाकरिता नेमका शब्दसुद्धा नाही. यामुळे 'नेती' या शब्दावरच त्याला समाधान मानावे लागते. यामुळे मूर्तीपूजेचा निषेध करणारे लोकसुद्धा सूक्ष्म रूपाने पाहिले असता मूर्तिपूजक असतात. पुस्तकाची पूजा करणे, चर्चमध्ये जाऊन पूजा करणे, एकाच दिशेने तोंड करून पूजा करणे या सर्व साकार पूजेच्या खुणा आहेत. असे असतानाही साकाराच्या पलीकडे निराकार अचिंत्य स्वरूप आहे हे सर्वांनी समजून घेतलेच पाहिजे. भक्ताने परमेश्वरात विलीन व्हावे आणि अखेरीस केवळ अद्वितीय निराकार परमेश्वराचेच अस्तित्व राहावे यातच भक्तीची पराकाष्ठा आहे. परंतु ही स्थिती साकाराच्या मदतीने सहजपणे प्राप्त करता येणे शक्य शकते. यामुळेच निराकाराकडे सहज पोहोचण्याचा मार्ग कष्टसाध्य आहे असे म्हणतात.

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ।
अनन्येनैव योगेन मां ध्यायन्त उपासते ।। ६
तेषामहं समुद्धर्ता मृत्युसंसारसागरात् ।
भवामि नचिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ।। ७

परंतु हे पार्थ, जे लोक माझ्यात परायण होऊन मलाच सर्व कर्म अर्पण करतात, निष्ठापूर्वक माझे ध्यान करून माझी उपासना करतात, आणि ज्याचे चित्त माझ्यात गुंतलेले असते अशा माणसाचा या मरणमार्गी संसारसागरातून मी लगेच उद्धार करतो. ६, ७

मय्येन मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ।

निवसिष्यसि मय्येव अत उर्ध्व न संशयः ।। ८

तू तुझे मन माझ्यात लावून ठेव. तुझी बुद्धी माझ्यात गुंतवून ठेव. असे केले असता या जन्मानंतर नक्कीच तू मला मिळवशील. ८

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम ।

अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनञ्जय ।।९

आता तू जर तुझे मन माझ्यात स्थिर करण्यात असमर्थ असशील तर हे धनंजया, अभ्यासयोगाद्वारे तू मला मिळवण्याचा प्रयत्न कर. ९

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव।

मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ।। १०

असा अभ्यास करणेसुद्धा जर तुला शक्य नसेल तर तू तुझी सर्व कर्मे मला अर्पण कर. अशा रितीने माझ्या निमित्ताने कर्म करत असतानाही तुला मोक्षप्राप्ती होऊ शकेल. १०

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ।

सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ।। ११

आणि माझ्या निमित्ताने कर्म करण्याचेही तुझ्यात सामर्थ्य नसेल तर तू प्रयत्नपूर्वक सर्व कर्मांच्या फळांचा त्याग कर. ११

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।

ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ।। १२

अभ्यासमार्गापेक्षा ज्ञानमार्ग अधिक चांगला आहे. ज्ञानमार्गापेक्षा ध्यानमार्ग अधिक चांगला आहे, आणि ध्यान मार्गापेक्षा कर्मफलत्यागाचा मार्ग अधिक चांगला आहे कारण या मार्गाच्या अखेरीस लगेच शांती मिळते. १२

टीप - अभ्यासाचा अर्थ आहे चित्तवृत्तीच्या निरोधाची साधना. ज्ञानाचा अर्थ आहे श्रवण, मनन इत्यादी. ध्यानाचा अर्थ आहे उपासना. हे सर्व केल्यानंतरही जर कर्मफलत्याग आढळला नाही तर असा अभ्यास अभ्यास राहत नाही, ज्ञान ज्ञान राहत नाही आणि ध्यान ध्यान राहत नाही.

टीप - चित्त अशांत असले तर ध्यान होऊ शकत नाही आणि अशांतीची कारणे तर अनेक प्रकारची फलेच्छाच असते. यामुळे आधी फलत्याग केला पाहिजे. या त्यागामुळे ध्यानाकरिता आवश्यक शांती लगेच मिळेल. - द. बा. कालेलकर.

३८

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहङ्कारः समदुःसुखः क्षमी ।। १३
सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ।। १४

प्राणिमात्रांबद्दल जो द्वेषरहित असतो, सर्वांचा मित्र असतो, दयावान आणि क्षमावान असतो, अहंता आणि ममताविरहित असतो, सुखदुःखांना समान समजणारा असतो, नेहमी समाधानी असतो, योगयुक्त असतो, इंद्रियनिग्रह करत असतो आणि दृढनिश्चियी असतो. तसेच ज्याने आपले मन आणि बुद्धी मला समर्पित केलेली असते तो भक्त मला प्रिय असतो. १३, १४

यस्मान्नोद्विजते लोको लोकोन्नोद्विजते च यः ।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ।। १५

ज्याच्यामुळे लोक उद्विग्न होत नाहीत, जो हर्ष, खेद, क्रोध, ईर्षा, भय आणि उद्वेग यांच्यापासून मुक्त असतो तो भक्त मला प्रिय असतो. १५

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ।
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रिय ।। १६

जो इच्छारहित असतो, पवित्र असतो, दक्ष म्हणजे सावध असतो, फलप्राप्तीबद्दल तटस्थ असतो, भय आणि चिंता यांपासून मुक्त असतो, ज्याने सर्व संकल्पांचा त्याग केलेला असतो असा माझा भक्त मला प्रिय असतो. १६

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्य स मे प्रियः ।। १७

जो हर्षित होत नाही, जो द्वेष करत नाही, जो चिंता करत नाही, जो अपेक्षा करत नाही, जो शुभाशुभाचा त्याग करतो तो भक्तिपरायण पुरुष मला आवडतो. १७

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः ।। १८
तुल्यनिंदास्तुतिर्मौनी सन्तुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ।। १९

शत्रू- मित्र, मानापमान, उकाडा-थंडी, सुखदुःख या सर्वांविषयी जो समभाव ठेवतो, ज्याने आसक्ती सोडलेली आहे, जो निंदा आणि स्तुती यांच्याकडे सारख्याच दृष्टीने पाहतो आणि मौन धारण करतो, जो जे काही मिळवतो त्यातच समाधान मानतो, ज्याच्याजवळ कोणतेही निवाऱ्याचे ठिकाण नसते आणि जो स्थिरचित्त असतो असा भक्त मला प्रिय असतो. १८, १९

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ।
श्रद्द्धाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ।। २०

जे लोक माझ्यात परायण राहून श्रद्धापूर्वक या अमृतरूपी ज्ञानाचे श्रवण करतात ते माझे अतिशय प्रिय भक्त असतात. २०

ॐ तत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला ‘भक्तियोग’ नावाचा बारावा अध्याय इथे समाप्त होतो.

१३. क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग

या अध्यायात शरीर आणि शरीरी यांच्यातील भेद दाखवण्यात आला आहे.

३९

श्री भगवान उवाच -

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।

एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ।। १

हे कौंतेय, या शरीराला क्षेत्र म्हणतात आणि याचे ज्याला ज्ञान असते त्याला लोक तत्त्वज्ञानी म्हणतात. १

क्षेत्रज्ञ चापि मां विद्धि सर्व क्षेत्रेषु भारत ।

क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ।।२

आणि हे भारत, सर्व क्षेत्रात - शरीरात राहणाऱ्या मला तू क्षेत्री समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांतील भेद जाणणे हे खरे ज्ञान आहे असे माझे मत आहे. २

तत्क्षेत्रं यच्च यादृक्च यद्विकारि यतश्च यत् ।

स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ।। ३

हे क्षेत्र काय आहे, कसे आहे, त्याला कशा प्रकारचे विकार आहेत, ते कोठून आले तसेच क्षेत्रज्ञ कोण आहे आणि त्याची शक्ती काय आहे हे तू माझ्याकडून संक्षेपाने ऐक. ३

ऋषिभिर्बहुधा गीतं छन्दोभिरविविधैः पृथक् ।

ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितै ।। ४

वेगवेगळ्या छंदाप्रमाणे, विविध प्रकारे, ऋषींनी याचे खूप गान केले आहे. उदाहरणे आणि तर्क यांच्याद्वारे ब्रह्मसूचक वाक्यातूनही याचे निरुपण केले आहे, ४

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च ।

इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ।। ५

इच्छा द्वेषः सुखं दु:खं सङ्गातश्चेतना धृतिः ।

एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ।। ६

महाभूत, अहंता, बुद्धी, प्रकृती, दशेंद्रिये, पाच विषय तसेच इच्छा, द्वेष, सुखदु:ख, संघात, चैतन्यशक्ती, घृती या सर्वांना त्यांच्या विकारांसह क्षेत्र म्हणतात. ५, ६

टीप - महाभूत पाच आहेत - पृथ्वी, जल, वायू, तेज आणि आकाश. अहंकाराचा अर्थ आहे शरीराविषयी असणारी अहंता. अहंप्रत्यय, अहंभाव, अव्यक्तचा अर्थ आहे अदृश्य असलेली माया, प्रकृती. दहा इंद्रियांमध्ये पाच ज्ञानेंद्रिये आहेत - नाक, कान, डोळे जीभ आणि त्वचा. आणि पाच कर्मेंद्रिये आहेत - हात पाय, तोंड आणि दोन गुह्येंद्रिये. पाच गोचर म्हणजे ज्ञानेंद्रियांचे पाच विषय आहे. वास घेणे, ऐकणे, पाहणे, चव घेणे आणि स्पर्श. संघातचा अर्थ आहे शरीराच्या अवयवांची परस्परांशी सहकार्य करण्याची शक्ती. इथे धृतीचा अर्थ आहे धैर्य म्हणजे निर्भयता. हा नैतिक गुण नाही तर या शरीराच्या परमाणूंचा परस्परांशी संबंधित राहण्याचा गुण आहे. हा गुण अहंभावामुळेच शक्य होतो आणि अहंता अव्यक्त प्रकृतीमध्ये असते. अमूर्च्छ - जागृत मनूष्य या अहंपणाचा जाणीवपूर्वक त्याग करतो. यामुळेच मृत्यूच्या वेळी वा इतर आघातांच्या वेळी तो दु:खी होत नाही. ज्ञानी, अज्ञानी या सर्वांनाच शेवटी या विकारी क्षेत्राचा त्याग करावा लागत असतो.

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् ।

आचार्योपासनम् शौचं स्थैर्यमात्मविनिग्रह ।। ७

जन्ममृत्युजराव्याधिदु:खदोषानुदर्शनम् ।। ८

असक्तिरनभिश्वंगः पुत्रदारगृहादिषु ।

नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ।। ९

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ।

विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ।। १०

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थ दर्शनम् ।

एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ।। ११

अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षमा, सरळपणा, आचार्यसेवा, शुद्धता, स्थिरता, आत्मसंयम, इंद्रियविषयांबद्दल वैराग्य, अहंकाराचा अभाव, जन्म, मरण, जरा, व्याधी, यांसंबंधीचे दु:ख आणि दोषांचे निरंतर, भान,पुत्र, पत्नी, घर आदींबद्दल मोह वा ममता यांचा अभाव, प्रिय वा अप्रिय जे काही नशिबी येईल त्याबद्दल समभाव, अनन्य ध्यान करून माझी भक्ती, अध्यात्मिक ज्ञान या सर्वांबद्दल स्थिर निष्ठा आणि आत्मदर्शन या सर्वांना ज्ञान म्हणतात.याविपरीत जे काही आहे ते अज्ञान आहे. ७, ८, ९, १०, ११

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ।

अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्चते ।। १२

ज्याचे ज्ञान झाल्यामुळे माणसाला मोक्षप्राप्ती होते ते ज्ञेय काय आहे हे आता मी तुला सांगेन. ते अनादी परब्रह्म आहे. त्याला ना तर सत म्हणता येऊ शकते ना असत. १२

टीप - परमेश्वराला सत वा असत असे काहीही म्हणता येत नाही. ते असे गुणातीत रूप आहे की ज्याची कोणत्याही एका शब्दाने व्याख्या करता येऊ शकत नाही.

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।

सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।। १३

त्याचे हात, पाय, डोळे, डोके, तोंड, कान सर्वत्र विद्यमान असतात या लोकात त्याने सर्वांना व्यापलेले असून त्यात तो स्थित आहे. १३

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ।

असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृच ।। १४

त्याच्यात सर्व इंद्रियांच्या गुणांचा आभास होतो आणि तरीही ते स्वरूप इंद्रियविरहित आहे आणि सर्वांपासून अलिप्त आहे. असे असूनही तो सर्वांना धारण करणारा आहे. तो गुणरहित आहे आणि तरीही गुणांचा भोक्ता आहे. १४

बहिरन्तश्च भूतानमचरं चरमे च ।

सूक्षमत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ।। १५

तो भूतांच्या बाहेरही आहे आणि आतही आहे. तो गतिमानही आहे आणि स्थिरही आहे. सूक्ष्म असल्यामुळे त्याला जाणता येत नाही तो दूरही आहे आणि जवळही आहे. १५

टीप - जो माणूस त्याला ओळखतो तो त्याच्या आत असतो.गती आणि स्थैर्य, शांती आणि अशांती या दोघांचाही आपल्याला अनुभव येत असतो. आणि हे भाव त्यातूनच येत असतात. यामुळे तो गतिमान आणि स्थिर असा दोन्ही आहे.

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ।

भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रासिष्णु प्रभविष्णु च ।। १६

अविभक्त असूनही भूतांमध्ये तो विभक्तासारखा राहतो. जाणून घेण्यालायक (ब्रह्म) प्राण्यांचे तो पालन करणारा आहे, नाश करणारा आहे आणि परत त्यांना उत्पन्न करणारा आहे. १६

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्चते ।

ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य विष्ठितम ।। १७

तो ज्योतींचीही ज्योत आहे, अंधकारापासून तो परका आहे असे म्हटले जाते. ज्ञान तोच आहे, जाणून घेण्यासारखे तोच आहे आणि ज्ञानप्राप्तीने जे मिळते तेही तोच आहे. १७

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ।

मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ।। १८

अशा प्रकारे क्षेत्र, ज्ञान आणि ज्ञेय यांविषयी मी तुला सांगितले. हे कळलेला माझा भक्त माझ्यापर्यंत पोहोचण्याकरिता पात्र ठरतो. १८

४०

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ।

विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृति सम्भवान् ।। १९

प्रकृती आणि पुरुष दोन्ही अनादी आहेत आणि आणि तू लक्षात ठेव की सर्व विकार आणि गुण प्रकृतीपासून प्राप्त होत असतात. १९

कार्यकरणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ।

पुरुषः सुखदुःखानाम भोक्तृत्वे हेतुरुच्यते ।। २०

कार्यकारणाची उत्पत्ती प्रकृतीपासून झाली असे मानले जाते तर सुखदुःखाचा अनुभव पुरुषामुळे येतो असे समजतात. २०

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुङ्क्ते प्रकृतिजान्गुणान् ।

कारणं गुणसङ्कोऽस्य सदसद्योनिजन्मसु ।। २१

प्रकृतीत स्थित पुरुष प्रकृतीपासून निर्माण होणाऱ्या गुणांचा उपभोग घेत असतो. आणि गुणांचा हा सहवासच बऱ्यावाईट योनीतील जन्मासाठी कारणीभूत ठरत असतो. २१

टीप - प्रकृतीला लौकिक भाषेत आपण माया म्हणून ओळखत असतो. पुरुष जीव आहे, मायेला म्हणजे मूळ स्वभावाला वश झाल्यामुळे सत्त्व, रजस आणि तमसमुळे होणाऱ्या कार्याचे फळ जीव भोगतो आणि यांमुळे तो कार्यानुसार पुनर्जन्म घेतो.

उपद्रष्टानुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वरः ।

परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ।। २२

या देहात राहणाऱ्या त्या परमपुरुषाला सर्वसाक्षी, अनुमता (अनुमती देणारा), भर्ता, भोक्ता, महेश्वर आणि परमात्माही म्हणतात. २२

य एनं वेत्ति पुरुषं प्रकृतीं च गुणैः सह ।

सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ।। २३

जो माणूस अशा प्रकारे प्रकृती आणि पुरुष यांना ओळखतो तो सर्व प्रकारचे कार्य करत असतानाही परत जन्म घेत नही. २३

टीप - दुसऱ्या, नऊव्या आणि बाराव्या आणि इतर अध्यायांच्या मदतीने आपल्याला कळू शकते की हा श्लोक स्वेच्छाचाराचे समर्थन करत नाही. हा केवळ भक्तीचा महिमा सांगतो. कर्ममात्र जीवाकरिता बंधनकारक होत असतात. परंतु माणसाने आपली सर्व कर्मे ईश्वराला अर्पण केली तर तो बंधमुक्त होतो. अशा प्रकारे ज्या माणसाच्या अंतःकरणातून कर्तेपणाचा अहंकार मिटलेला असतो आणि जो चोवीसही तास प्रभूला साक्षी ठेवून कर्म करतो तो कोणतेही पापकर्म करू शकत नाही. अभिमानच पापाचे मूळ आहे. जिथे 'मी' मिटलेला असतो तिथे पापाची शक्यताच शिल्लक राहत नसते.

हा श्लोक पापकर्म न करण्याची युक्ती सांगतो.

ध्यानेनात्मनी पश्यन्ति केचिदात्मा नमात्मना ।

अन्ये साङ्ख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ।। २४

काही लोक ध्यानमार्गाने आत्म्याद्वारे आत्म्याला स्वतःमध्ये पाहतात, तर काही ज्ञानमार्गाने. उलट काही कर्ममार्गाने हेच काम करतात. २४

अन्ये त्वेवमजानन्तः श्रुत्वानेभ्य उपासते ।

तेऽपि चातितरन्त्येव मृत्यूं श्रतिपरायणाः ।।२५

इतर काही लोकांना हा मार्ग माहीत नाही. यामुळे इतर लोकांकडून परमेश्वराबद्दल ऐकून, ऐकलेल्या गोष्टीवर श्रद्धा ठेवून, त्यातच मन लावून ते परमेश्वराची उपासना करतात. असे लोकही मृत्यूयुक्त संसार पार करतात. २५

४१

यावत्सञ्जायते किंचित्सत्त्वं स्थावरजङ्गमम् ।

क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ।। २६

हे भरतर्षभ, जे काही चराचर निर्माण होते ते क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ म्हणजे प्रकृती आणि पुरुष यांच्या मीलनातून निर्माण होते हे तू लक्षात ठेव. २६

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठतं परमेश्वरम् ।

विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति ।। २७

सर्व नाशिवंत प्राण्यांमध्ये परमेश्वर समभावाने वसलेला आहे असे जे लोक समजतात तेच त्याला ओळखतात. २७

समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।

न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।। २८

समभावाने स्थित अशा ईश्वराला जो माणूस पाहतो तो स्वतःचा घात करू शकत नाही आणि यामुळे तो परमगतीला पात्र होतो. २८

टीप - समभावाने अस्तित्वात असलेल्या परमेश्वराला जो माणूस सर्वत्र पाहतो तो स्वतःच ईश्वरात विलीन होऊन जातो आणि त्याला दुसरे काहीही दिसत नाही. यामुळे तो विकारवश होत नाही. परिणामी त्याला मोक्षप्राप्ती होते आणि तो स्वतःचा शत्रू होत नाही.

प्रकृत्यैव च कर्माणी क्रियमाणानि सर्वशः ।

यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ।। २९

सर्वत्र प्रकृतीच कर्म करत असते असे जो समजतो आणि म्हणून जो आत्म्याला अकर्ता समजतो तोच खरा यथार्थज्ञानी असतो. २९

टीप - ज्याप्रमाणे झोपलेल्या माणसाचा आत्मा निद्रेचा कर्ता नसतो परंतु प्रकृती निद्रेचे काम करत असते तसेच हे.

निर्विकार माणसाचे डोळे कोणतीही वाईट गोष्ट पाहू शकत नाहीत. प्रकृती स्वतः व्यभिचारिणी नाही. अभिमानी पुरुष जेव्हा तिचा स्वामी होतो तेव्हा त्या मीलनातून विषय, विकार निर्माण होतात.

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।

तत एव च विस्तारं ब्रह्म सम्पद्यते तदा ।। ३०

(हे कळून) जेव्हा तो जिवाचे अस्तित्व वेगवेगळे असतानाही एकातच स्थित असलेले पाहतो आणि संपूर्ण विस्तार त्यातून झाला असे समजतो तेव्हा त्याला ब्रह्मप्राप्ती होते. ३०

टीप - अनुभवाने सर्वांना ब्रह्मात पाहणे म्हणजेच ब्रह्मप्राप्ती. अशा परिस्थितीत जीव शिवापासून वेगळा राहत नाही.

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्यवः ।

शरीरस्थोऽपि कौन्तेय न करोति न लिप्यते ।। ३१

हे कौंतेय, हा अविनाशी परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे तो शरीरात राहत असतानाही ना तर काही करतो ना कशाने लिप्त होतो. ३१

यथा सर्वगतम् सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।

सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ।। ३२

ज्याप्रमाणे सर्वत्र पसरलेले आकाश सूक्ष्म असल्यामुळे कशानेही लिप्त होत नाही त्याचप्रमाणे सर्व शरीरांमध्ये राहणारा आत्माही लिप्त होत नाही. ३२

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।

क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ।। ३३

ज्याप्रमाणे एकच सूर्य या संपूर्ण जगाला प्रकाश देतो त्याचप्रमाणे हे भारत, क्षेत्री क्षेत्राला प्रकाशित करत असतो. ३३

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमन्तरं ज्ञानचक्षुषा ।

भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यान्ति ते परम ।। ३४

अशा प्रकारे ज्या माणसाला ज्ञानचक्षूंद्वारे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांतील भेद माहीत असतो, तसेच प्रकृतीच्या बंधनातून प्राण्याची मुक्ती कशी होते हेही कळते त्या माणसाला ब्रह्मप्राप्ती होते. ३४

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग' नावाचा तेरावा अध्याय इथे समाप्त होतो.

१४. गुणत्रयविभागयोग

गुणमयी प्रकृतीची थोडी ओळख करून दिल्यानंतर स्वाभाविकपणेच तिच्या तीन गुणांचे वर्णन या अध्यायात येते. या तीन गुणांचे वर्णन करत असतानाच गुणातीत माणसाची चिन्हेही भगवान इथे सांगतात.

दुसऱ्या अध्यायात स्थितप्रज्ञ माणसाची जी लक्षणे सांगितली आहेत तशीच लक्षणे या अध्यायात गुणातीत माणसाची सांगितली आहेत.

४२

श्री भगवान उवाच -

परं भूयः प्रवक्ष्यामी ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।

यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ।। १

सर्व ज्ञानांमध्ये जे उत्तम ज्ञान आहे आणि ज्याचा अनुभव घेऊन या देहाचे बंधन सुटल्यानंतर मुनिगण परमगती प्राप्त करता ते ज्ञान मी तुला परत सांगतो. १

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।

सर्गेऽपि नोपजायन्ते प्रलये न व्यथन्ति च ।। २

या ज्ञानाचा आधार घेऊन जे लोक माझ्याशी एकाकार झाले त्यांना उत्पत्तीच्या वेळी जन्म घ्यावा लागत नाही आणि प्रलयकाळी व्यथा भोगाव्या लागत नाहीत. २

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम ।

सम्भवः सर्वभूतानां ततो भवति भारत ।। ३

हे भारत, महद्ब्रह्म म्हणजेच प्रकृती माझी योनी आहे. तिच्यात मी गर्भधारणा करतो आणि त्या गर्भापासून सर्व प्राणी उत्पन्न होतात. ३

सर्वयोनिषु कौन्तेय मूर्तयः सम्भवन्ति याः ।

तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदाः पिता ।। ४

हे कौंतेय, सर्व योनींमध्ये ज्या ज्या जिवाची उत्पत्ती होते त्या सर्वांच्या उत्पत्तीचे स्थान महद्ब्रह्म म्हणजे माझी प्रकृती आहे आणि तिच्यात बीजारोपण करणारा पिता - पुरुषही मीच आहे. ४

सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसम्भवाः ।

निबध्नन्ति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ।। ५

हे महाबाहो, प्रकृतीपासून निर्माण होणारे तत्त्व सत्त्व, रजस आणि तमस गुण अविनाशी देहधारी जिवाला बांधून टाकतात. ५

तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनायम् ।

सुखङ्गेन बघ्नाति ज्ञानसङ्गेन चानघ ।। ६

या गुणांमध्ये सत्त्वगुण निर्मळ असल्यामुळे तो प्रकाशित करणारा आणि स्वास्थ्यवर्धक आहे. आणि हे अनघ, तो देहीला सुख आणि आसक्ती यांच्यामध्ये बांधतो. ६

रजो रागात्मकं विद्धि तष्णासङ्गसमुद्भवम् ।

तन्निबघ्नाति कौन्तेय कर्मसङ्गेन देहिनम् ।। ७

हे कौंतेय, रजोगुण अनुरागस्वरूप असल्यामुळे तो तृष्णा आणि आसक्तीचे मूळ आहे. देहधारीला तो मोहपाशात बांधतो. ७

तमस्तज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ।

प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नति भारत ।। ८

हे भारत, तमोगुण अज्ञानातून निर्माण होत असल्यामुळे तो सर्व देधारींना मोहात टाकून देहीला असावधानता, आळस आणि निद्रेच्या पाशात बांधतो. ८

सत्त्वं सुखेसञ्जयति रजः' कर्माणि भारत ।

ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे सञ्जयत्युत ।। ९

हे भारत, सत्त्वगुण आत्म्याचा शांतिसुखाशी संयोग घडवतो. रजोगुण कर्माबरोबर आत्म्याचा संयोग घडवतो आणि तमोगुण ज्ञानाला झाकून प्रमादाबरोबर आत्म्याचा संयोग घडवतो. ९

रजस्तमश्चभिभूय सत्त्वं भवति भारत ।

रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ।। १०

हे भारत, जेव्हा रजस आणि तमस दबतात, तेव्हा सत्त्वगुण वर येतो, जेव्हा सत्त्व आणि तमस दबतात तेव्हा रजोगुण वर येतो आणि सत्त्व आणि रजोगुण जेव्हा दबतात तेव्हा तमोगुण वर येतो. १०

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ।

ज्ञानं यदा यदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ।। ११

जेव्हा सर्व इंद्रियांद्वारे या देहात प्रकाश आणि ज्ञान यांचा उद्भव होतो तेव्हा सत्त्व गुणाची वृद्धी झाली आहे असे आपण समजायला पाहिजे. ११

लोभः प्रकृतिरारम्भः कर्मणामशमः स्पृहा ।

रजस्येतानि जायन्ते विवृद्धे भरतर्षभ ।। १२

हे भरतर्षभ, जेव्हा रजोगुणाची वृद्धी होते तेव्हा लोभ, प्रवृत्ती, कर्मारंभ, अशांती (अतृप्ती) आणि इच्छा यांचा उदय होतो. १२

अप्रकाशोऽप्रवृत्तीश्च प्रमादो मोह एव च ।

तमस्येतानि जायन्ते विवृद्धे कुरुनन्दन ।। १३

हे कुरुनंदन, जेव्हा तमोगुणाची वृद्धी होते तेव्हा अज्ञान, शिथिलता, असावधानता आणि मूढपणा या गोष्टी निर्माण होतात. १३

यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।

तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ।। १४

सत्त्वगुणाच्या वृद्धीच्या अवस्थेत देहधारीचा जेव्हा मृत्यू होतो तेव्हा त्याला उत्तम ज्ञानीच्या श्रेष्ठ लोकांची प्राप्ती होते. १४

रजसि प्रलयं गत्वा कर्सङ्गिषु जायते ।

तथा प्रलिनस्तमसि मूढयोनिषु जायते ।। १५

रजोगुणाची वृद्धी झाली असताना मृत्यू झाला तर तेव्हा देहधारीला कर्मसंगीच्या म्हणजे कर्मात आसक्ती असणाऱ्या माणसाच्या लोकात जन्म घ्यावा लागतो, आणि तमोगुणाची वृद्धी झाली असताना मरण पावणारा देहधारी माणूस मूढ योनीत जन्म घेतो. १५

टीप - कर्मसंगतीचे लोक म्हणजे मनुष्य लोक आणि मूढ योनी पशू इत्यादी लोक.

कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलम् ।

रजसस्तु फलं दु:खमज्ञानं तमसः फलम् ।। १६

सत्कर्माचे फळ सात्त्विक आणि निर्मळ असते. राजसी कर्माचे फळ दु:खद असते आणि तामसी कर्माचे फळ अज्ञान असते. १६

टीप - साधारण व्यवहारात ज्याला आपण सुख आणि दु:ख समजतो तसा सुखदु:खाचा अर्थ इथे घेतला जाऊ नये. इथे सुखाचा अर्थ आहे आत्मानंद, आत्मप्रकाश याहून जे विरोधी असेल ते दु:ख. १७व्या श्लोकात ही गोष्ट स्पष्ट झाली आहे.

सत्त्वात्सञ्जायते ज्ञानं रजसो लोभ एव च ।

प्रमादमहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ।। १७

सत्त्वगुणापासून ज्ञान निर्माण होते, रजोगुणापासून लोभ उत्पन्न होतो आणि तमोगुणापासून बेसावधपणा, मोह, आणि अज्ञान निर्माण होतात. १७

ऊर्ध्वं गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः ।

जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ।। १८

सात्त्विक माणूस उंच चढतो, राजसी मध्ये राहतो आणि ज्यांच्यात तामसी हा अखेरचा गुण असतो त्यांची अधोगती होतो. १८

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ।

गुणेभ्यश्च परं वेत्ती मद्भावं सोऽधिगच्छन्ति ।। १९

तत्त्वदर्शी ज्ञानी जेव्हा पाहतो की गुणांशिवाय दुसरा कोणताही कर्ता नाही.व गुणातील ईश्वराची त्याला ओळख पटते तेव्हा त्याला माझे स्वरूप प्राप्त होते. १९

टीप - गुणांनाच कर्ता समजणाराच्या मनात अहंभाव निर्माण होत नाही. यामुळे त्याची सर्व कामे स्वाभाविकपणे घडतात व ते शरीरयात्रा चालवण्याकरिता होत असतात. आणि अशा माणसाची शरीरयात्रा परमार्थ साधण्याकरिता होत असते. यामुळे त्याच्या प्रत्येक कार्यात त्यागाची आणि वैराग्याचीच भावना असते. असा ज्ञानी सहजपणेच गुणातीत परमेश्वराची कल्पना करतो, त्याला ओळखतो, आणि त्याची भक्ती करतो.

गुणानेतानतित्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ।

जन्ममृत्यूजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ।। २०

देहाच्या सोबतीमुळे निर्माण होणाऱ्या या तीन गुणांना ओलांडून देहधरी (माणूस) जन्म, मृत्यू आणि वार्धक्य यांच्या दुःखातून सुटतो आणि त्याला मोक्षप्राप्ती होते. २०

४३

अर्जुन उवाच -

कैर्लिङ्गैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवती प्रभो ।

किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ।। २१

हे प्रभो, या तीन गुणांपलीकडे जाणारा माणूस कोणत्या लक्षणांमुळे ओळखता येऊ शकतो? आणि या तीन गुणांपलीकडे तो कसा जातो? २१

श्री भगवान उवाच -

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेह च पाण्डव ।

न द्वेष्टि सम्प्रवृत्तानी न निवृत्तानी काङ्क्षति ।। २२

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ।

गुणा वर्तन्त इत्येव योऽवतिष्ठति नेङ्गते ।। २३

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकाञ्चनः ।

तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ।। २४

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ।

सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्चते ।। २५

हे पांडवा, प्रकाश, प्रवृत्ती आणि मोह यांच्या प्राप्तीनंतर जो दुःखी होत नाही आणि ते मिळाले नाही तर त्यांची आशा करत नाही, जो त्यांच्याबाबतीत उदासीन असल्यासारखा स्थिर राहतो, ज्याला गुण हलवू वा विचलित करू शकत नाहीत, गुण त्यांचे स्वतःचे काम करत आहेत असे समजून जो स्थिर राहतो, विचलित होत नाही, जो सुखदुःखात समभावाने राहतो, मातीचे ढेकूळ, दगड यांना जो समान मानतो, प्रिय वा अप्रिय वस्तू प्राप्त झाल्यानंतरही जो जसाच्या तसाच राहतो, निंदास्तुतीला जो समान लेखतो, मित्रपक्ष आणि शत्रूपक्ष यांच्याबाबतीत जो समभाव ठेवतो आणि ज्याने सर्व आरंभांचा त्याग केलेला असतो अशा बुद्धिमान पुरुषाला गुणातीत म्हणतात. २२, २३, २४, २५

टीप - इथे २२ ते २५ क्रमांकाच्या श्लोकांचा एकाच वेळी विचार केला पाहिजे. मागील श्लोकात सांगितल्याप्रमाणे प्रकाश, प्रवृत्ती आणि मोह क्रमशः सत्त्वगुण, रजोगुण, तमोगुण यांचे परिणाम आणि खुणा आहेत. यामुळे इथे जे सांगितले आहे त्याचा आशय असा आहे की जो माणूस गुणातीत झाला आहे त्याच्यावर यांचा कोणताही परिणाम होत नाही. दगड प्रकाशाची इच्छा करत नसतो तसेच तो प्रवृत्ती वा जडता यांचा द्वेष करत नसतो. त्याची इच्छा नसली तरी तो शांत असतो आणि कोणी त्याला गती दिली तरी तो त्याचा द्वेष करत नाही. गती दिल्यानंतर कोणी त्याला स्थिर केले व त्यामुळे आपली प्रवृत्ती (गती) थांबली, तिच्यात मोह वा जडत्व निर्माण झाले असे समजून तो दुःखी होत नाही, उलट या तिन्ही स्थितींमध्ये तो समान राहतो.

दगड आणि गुणातीत माणसात अंतर हे आहे की गुणातीत चेतनामय असतो आणि त्याने जाणूनबुजून गुणांच्या परिणामांचा, त्यांच्या स्पर्शाचा त्याग केलेला असतो, आणि एका दृष्टीने तर तो जड दगडासारखा झालेला असतो. दगड गुणांचा साक्षी असतो परंतु त्यांचा कर्ता नसतो. अशा ज्ञानींबद्दल अशी कल्पना करता येऊ शकते की तो २३व्या श्लोकात सांगितल्याप्रमाणे 'गुण आपले काम करतात' असे समजून अस्थिर होत नाही आणि अचल राहतो. उदासीन माणसाप्रमाणे तो बसलेला असतो म्हणजे अढळ असतो.

गुणांमध्ये तन्मय झालेले आपण लोक या स्थितीची कल्पना करून धीराने ती गोष्ट समजून घेतो परंतु या गोष्टीचा आपल्याला अनुभव येऊ शकत नाही. परंतु ही स्थिती डोळ्यांसमोर ठेवून आपण दिवसेंदिवस 'मी'पणा कमी करत गेलो तर आपण गुणातीत माणसाच्या स्थितीजवळ पोहोचू शकतो आणि त्याचे ओझरते दर्शन घेऊ शकतो. गुणातीत माणूस आपल्या स्थितीचा अनुभव घेऊ शकतो, तिचे वर्णन करू शकत नाही. जो माणूस तिचे वर्णन करू शकतो तो गुणातीत नसतो कारण त्याच्यात अहंभाव शिल्लक असतो. सर्व लोक सहजपणे ज्याचा अनुभव घेऊ शकतात त्या गोष्टी शांती, प्रकाश, गडबडगोधळ, प्रवृत्ती वा जडपणा आणि मोह या आहेत. गीतेत ही गोष्ट अनेक ठिकाणी स्पष्ट करण्यात आलेली आहे. सात्विकता ही गुणातीततेच्या सर्वात जवळची स्थिती आहे.

यामुळे प्रत्येक माणसाचा प्रयत्न सत्त्वगुणाच्या विकासाच्या दिशेने असला पाहिजे. याच्या परिणामी अखेरीस आपल्याला गुणातीत परिस्थिती प्राप्त होईल असा विश्वास त्याने बाळगला पाहिजे.

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।
स गुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ।। २६

जो माणूस एकनिष्ठ होऊन भक्तियोगाद्वारे माझी सेवा - उपासना करतो तो या तिन्ही गुणांपलीकडे जाऊन ब्रह्मरूप बनण्यायोग्य होतो. २६

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ।

शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकान्तिकस्य च ।। २७

ही ब्रह्मस्थिती म्हणजेच मी आहे. शाश्वत मोक्षाची स्थिती मीच आहे. अशाच प्रकारे सनातन धर्माची तसेच उत्तम सुखाची स्थितीही मीच आहे. २७

ॐ तत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'गुणत्रयविभागयोग' नावाचा चौदावा अध्याय इथे समाप्त होतो.

१५. पुरुषोत्तमयोग

या अध्यायात क्षर आणि अक्षर यांपलीकडील आपले स्वरूप भगवान कृष्णाने समजावून सांगितले आहे.

४४

श्री भगवान उवाच -

ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।
छन्दांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ।। १

ज्याचे मूळ वर आहे आणि शाखा खाली आहेत आणि वेद ज्याची पाने आहेत असा जो अविनाशी अश्वत्थ संसारवृक्ष आहे त्याचे ज्ञान असणाऱ्या माणसाला वेदज्ञ म्हणतात. १

टीप - 'श्वः'चा अर्थ आहे भावी काळ. यामुळे अश्वत्थचा अर्थ झाला भावी काळापर्यंत न टिकणारा संसार. संसाराचे दरक्षणी रुपांतर होत असते. यामुळे तो अश्वत्थ आहे. परंतु अशा परिस्थितीत तो राहणार आहे यामुळे त्याचे मूळ उर्ध्व म्हणजे ईश्वर आहे. यामुळे तो शाश्वत म्हणजे तो अविनाशी आहे. त्याला वेदांची म्हणजे धर्माची शुद्ध ज्ञानरूपी पाने नसतील तर त्याला शोभा येणार नाही. अशा रीतीने ज्याला संसाराचे आणि धर्माचे खरे ज्ञान आहे तोच खरा ज्ञानी.

अधश्चौर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसन्ततानी
कर्मानुबन्धीनी मनुष्यलोके ।। २

गुणाच्या स्पर्शाने फोफावलेल्या, विषयरुपी अंकुर फुटलेल्या या अश्वत्थ वृक्षाच्या फांद्या वरखाली पसरलेल्या आहेत. कर्मबंधन निर्माण करणारी त्याची मुळे मनुष्य लोकांमध्ये खालपर्यंत पसरलेली आहेत. २

टीप - अज्ञानी माणसाच्या दृष्टिकोनातून संसारवृक्षाचे हे वर्ण केलेले आहे. वर ईश्वरावर स्थित मुळे तो पाहत नाही उलट विषयांच्या रमणीयतेत मुग्ध होऊन तीन गुणांद्वारे तो या वृक्षाचे पोषण करतो आणि मनुष्य लोकात कर्मबंधनात बांधला जातो.

न रूपमस्येह तथोपलभ्यते
नान्तो न चादिर्न च सम्प्रतिष्ठा
अश्वत्थमेनं सुविरूढमूल -
मसंङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ।। ३
ततः पदं तत्परिमार्गितव्य
यस्मिगता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तीः प्रसृता पुराणी ।। ४

या वृक्षाचे खरे स्वरूप पाहायला मिळत नाही. ना याचा अंत आहे ना आदी आहे आणि ना याला कोणता आधार आहे. अतिशय खोलवर मुळे पोहोचलेल्या या अश्वत्थ वृक्षाला असंगरूपी बलवान शस्त्राने कापून माणसाने अशी प्रार्थना केली पाहिजे - "ज्यातून या सनातन प्रवृत्तीचा म्हणजे मायेचा प्रसार झाला आहे त्या आदी पुरुषाला मी शरण जातो." आणि माणसाने त्या स्थानाचा शोध घेतला पाहिजे जे मिळवणाराला परत जन्ममृत्यूच्या फेऱ्यात फसावे लागत नाही. ३, ४

टीप - असंगाचा अर्थ आहे असहकार, वैराग्य. जोपर्यंत माणूस विषयांशी असहकार करत नाही, त्यांच्या प्रलोभनापासून दूर राहत नाही तोपर्यंत तो त्यात फसतच राहील.

हे दोन श्लोक हेच सांगतात की विषयांशी खेळ खेळणे आणि तरीही त्यांचा स्पर्श न होऊ न देणे अशक्य आहे.

निर्मानमोहा जितसङ्गदोषा -

अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः

द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसञ्ज्ञे -

र्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत् ।। ५

ज्यांनी मान आणि मोहाचा त्याग केला आहे, ज्यांनी आसक्तीपासून निर्माण होणारे दोष दूर केले आहेत, जे नेहमी आत्म्यात मग्न असतात, ज्यांचे विषय शांत झाले आहेत त्या ज्ञानी लोकांना अविनाशी पद प्राप्त होते. ५

न तद्भासयते सूर्यो न शसाङ्को न पावकाः ।

यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।। ६

जिथे सूर्याला, चंद्राला वा अग्नीला प्रकाश पोहोचावावा लागत नाही, जिथे जाणाऱ्या माणसाला परत जन्म घ्यावा लागत नाही तेच माझे परंधाम आहेत. ६

४४ अ.

ममैवांशो जीवलोको जीवभूतः सनातनः ।

मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानी कर्षति ।। ७

माझाच सनातन अंश जीव लोकात प्रकृतीत राहणाऱ्या पंचेद्रियांना आणि मनाला आकर्षित करत असतो. ७

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।

गृहीत्वैतानि संयाति वायुर्गन्धानिवाशयात् ।। ८

शरीराचा स्वामी जीव जेव्हा शरीर सोडतो अथवा धारण करतो तेव्हा ज्याप्रमाणे वारा फुले वगैरेंचा सुगंध घेऊन जातो त्याप्रमाणे जीव इंद्रियांबरोबर मनाला आपल्याबरोबर घेऊन जातो. ८

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ।

अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ।। ९

आणि कान, डोळे, कातडी, जीभ, नाक आणि मन यांचा आधार घेऊन तो विषयसेवन करतो. ९

टीप - इथे विषय शब्दाचा अर्थ बिभत्स विलास नाही तर त्या त्या इंद्रियांचे स्वाभाविक कार्य आहे. उदाहरणार्थ डोळ्यांचा विषय पाहणे, कानांचा ऐकणे, जिभेचा स्वाद घेणे आहे. या क्रिया जेव्हा विकारयुक्त असतात, अहंयुक्त असतात तेव्हा त्या दुषित, बिभत्स आहेत असे समजले जाते. जेव्हा या क्रिया विकारविरहित असतात तेव्हा त्या निर्दोष आहेत असे समजले जाते. लहान बाळ एखादी गोष्ट पाहत असेल तर त्याला विकारी समजले जात नाही. यामुळेच पुढील श्लोकात म्हटले आहे -

उत्क्रामन्त स्थितं वापि भुञ्जानम वा गुणान्वितम् ।

विमूढा नानुपश्यन्ति पश्यन्ति ज्ञानचक्षुषः ।। १०

शरीराचा त्याग करणारे वा त्यात राहणारे आणि गुणांचा आधार घेऊन भोग घेणारे (या आंशिक) ईश्वराला मूर्ख लोक पाहत नाहीत. केवळ दिव्य चक्षू असलेले ज्ञानी लोकच ही गोष्ट पाहू शकतात. १०

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् ।

यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्तचेतसः ।। ११

प्रयत्न करणारे योगी आपल्या आतील या ईश्वराला पाहू शकतात. परंतु ज्यांनी स्वतःला प्रशिक्षितच केले नाही, आत्मशुद्धी केली नाही असे मूर्ख लोक प्रयत्न केल्यानंतरसुद्धा या ईश्वराला ओळखू शकत नाहीत. ११

टीप - यात आणि नऊव्या अध्यायात देवाने भक्तांना जे वचन दिले आहे त्यात काहीही विरोध नाही. अकृतात्माचा अर्थ आहे भक्तिहीन, स्वेच्छाचारी, दुराचारी.

जो माणूस नम्रतापूर्वक ईश्वराची भक्ती करतो तो क्रमशः शुद्ध होत जातो व ईश्वराला ओळखू लागतो. जो माणूस यमनियमादींची पर्वा न करता केवळ बुद्धिप्रयोगाने ईश्वराला ओळखू पाहतो तो अचेता - चित्तविरहित, रामहीन असतो. असा माणूस रामाला कसा ओळखू शकेल?

४५

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ।। १२

सूर्यातील जे तेज जगाला प्रकाशित करते, आणि जे तेज चंद्र आणि अग्नीमध्ये विराजमान असते ते तेज माझेच आहे असे तू समज. १२

गामविश्य च भूतानी धारयाम्यहमोजसा ।
पुण्यामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकाः ।। १३

पृथ्वीत प्रवेश करून मी माझ्या शक्तीने प्राण्यांना धारण करतो आणि रस निर्माण करणारा चंद्र होऊन सर्व वनस्पतींचे मी पोषण करतो. १३

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रिताः ।
प्राणापानसमायुक्तः पंचाम्यन्नं चतुर्विधम् ।। १४

जठराग्नीच्या रूपाने प्राण्यांच्या शरीराचा आधार घेऊन प्राण आणि अपान वायूद्वारे मी चार प्रकारचे अन्न पचवतो. १४

टीप - अन्न चार प्रकारचे आहे - १. चावून खावे लागणारे २. पिता येण्यासारखे ३. चोखण्यासारखे ४. चाटण्यासारखे - द. ब. कालेलकर

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो -
मत्तः स्मृतिर्ज्ञापनमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो -
वेदान्तकृद्वेदविदेव चाहम् ।। १५

मी सर्वांच्या हृदयात विद्यमान आहे. माझ्यातच स्मृती, ज्ञान आणि अपोहन (बुद्धीत असणारे संशय, विपर्यास आदी दोष दूर करण्याला अपोहन म्हणतात.) असतात. सर्व वेदांद्वारे जाणण्यायोग्य मीच आहे, आणि वेदांतातून प्रकट होणारा अर्थही मीच आहे. १५

४६

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ।

क्षरः सर्वाणि भूतानि कुटस्थोऽक्षर उच्चते ।। १६

या जगात क्षर म्हणजे नाशिवंत आणि अक्षर म्हणजे अविनाशी असे दोन पुरुष आहेत. सर्व 'भूत' क्षर आहेत, आणि त्यात स्थित असलेल्या 'अंतर्यामीला' अक्षर म्हणतात. १६

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्थुदाहृतः ।

यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ।। १७

याशिवाय एक वेगळा उत्तम पुरुषही आहे, त्याला परमात्मा म्हणतात. तो अव्ययी ईश्वर तिन्ही लोकांत प्रवेश करून त्यांचे पोषण करतो. १७

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।

अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ।। १८

मी क्षरत्वाच्या पलीकडे असल्यामुळे आणि अक्षरत्वापेक्षाही उत्तम असल्यामुळे जगात आणि वेदात मी पुरुषोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. १८

यो मामेवमसम्मूढो जानाति पुरुषोत्तमम् ।।

स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ।। १९

हे भारत, जो माणूस मोहरहित होऊन मला, पुरुषोत्तमाला, अशा प्रकारे ओळखतो त्याला सर्व काही माहीत असते आणि तो माझी पूर्ण भावाने भक्ती करत असतो. १९

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।

एतद्बुद्ध्वा बुद्धिमानस्याकृतकृतश्च भारत ।। २०

हे अनघ, गुढाहून गूढ असे हे शास्त्र मी तुला सांगितले आहे. हे भारत, हे लक्षात घेऊन माणसाने बुद्धिमान व्हायला पाहिजे आणि आपले जीवन सफल केले पाहिजे. २०

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्ण-अर्जुन संवाद असलेला 'पुरुषोत्तमयोग' नावाचा पंधरावा अध्याय इथे समाप्त होतो.

१६. दैवासुरसंपदाविभाग योग

या अध्यायात दैवी आणि आसुरी संपत्तीचे वर्णन करण्यात आले आहे.

दैवी संपत्तीचा अर्थ आहे धर्मवृत्ती. आसुरी संपत्तीचा अर्थ आहे अधर्मवृत्ती.

४७

श्री भगवान उवाच -

अभयं सत्त्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ।

दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आवर्जम् ।। १

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।

दया भूतेश्वलोलुप्त्वं मार्दवं हृरिचापलम् ।। २

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहोनातिमानता ।

भवन्ति सम्पदं दैवीमभिजातस्य भारत ।। ३

हे भारत, अभय, अंतःकरणाची शुद्धी, ज्ञान आणि योग यांच्याबद्दल निष्ठा तसेच दान, दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, सरळपणा, अहिंसा, सत्य, अक्रोध, त्याग, शांती, अपैशुन, भूतदया, अलोलूपता, मृदुता, मर्यादा, अचंचलता, तेज, क्षमा, धृती, शुची, अद्रोह, निरभिमान, हे सर्व गुण त्या माणसात असतात जो दैवी संपदा घेऊन जन्माला आलेला असतो. १, २, ३

टीप - दमचा अर्थ आहे इंद्रियनिग्रह. अपैशुनचा अर्थ आहे कुणाचीही चुगली न करणे. अलोलूपताचा अर्थ आहे लालसा न करणे, लंपट न होणे. तेजचा अर्थ आहे प्रत्येक प्रकारच्या हीन वृत्तीचा विरोध करण्याचा उत्साह. अद्रोहचा अर्थ आहे कुणाचेही वाईट करायचे नाही आणि कुणाचेही वाईट चिंतायचे नाही.

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ।

अज्ञानं चाभिजातस्य पार्थ पारुष्यमेव च ।। ४

हे पार्थ दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, कठोरता आणि अज्ञान आसुरी संपदा घेऊन जन्माला येणाऱ्या माणसात असतात. ४

टीप - जी गोष्ट आपल्यामध्ये नसेल ती आहे असे दाखवणे म्हणजे दंभ, ढोंग आणि पाखंड. दर्पचा अर्थ आहे अहंकार.

दैवि सम्पद्विमोक्षाय निबन्धायासुरी मता ।

मा शुचाः सम्पदं दैवींमभिजातोऽसीपाण्डव ।। ५

दैवी संपत्ती मोक्ष देणारी आणि आसुरी संपत्ती बंधनात टाकणारी आहे. हे पांडवा तू शोक करू नकोस. तू दैवी संपत्ती घेऊन जन्माला आला आहेस. ५

४८

द्वौ भूतसर्गो लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ।

दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे श्रृणु ।। ६

या लोकात दोन प्रकारची सृष्टी आहे - दैवी आणि आसुरी. हे पार्थ, दैवी सृष्टीचे मी विस्ताराने वर्णन केले आहे. आता तू माझ्याकडून आसुरी संपत्तीचे वर्णन ऐक. ६

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुरा ।

न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ।। ७

आसुरी लोकांना प्रवृत्ती काय आहे आणि निवृत्ती काय आहे हे माहीत नसते. काय केले पाहिजे आणि काय करायला नको हे आसुरी लोकांना माहीत नसते. याचप्रमाणे त्यांना शुद्धीचे वा आचरणाचे भान नसते आणि त्यांच्यात सत्यही नसते. ७

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।

अपरस्परसम्भूतं किमन्यत्कामहैतुकम ।। ८

ते (आसुरी संपदेचे लोक) म्हणत असतात, जग असत्य, आधारविरहीत, ईश्वरविहीन आहे. ते केवळ नरनारीसंबंधातून निर्माण झाले आहे. विषयोपभोगाशिवाय त्यात दुसरा कोणता हेतू असू शकतो? ८

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ।

प्रभवन्त्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ।। ९

असा समज घट्ट धरून ठेवून भयंकर कार्य करणारे हे मंदबुद्धी, दुष्ट लोक जगाचे शत्रू बनून त्याचा नाश करण्याकरिता निर्माण होत असतात. ९

काममाश्रित्य दुष्पुरं दम्भमानमदान्विता ।

मोहाद्गृहीत्वासद्ग्राहानप्रवर्तन्तेऽसुचिव्रताः ।। १०

तृप्त होणार नाही अशा कामनांचा आधार घेऊन हे दांभिक, मानी, मदांध आणि अशुभ निश्चय असणारे लोक मोहामुळे दुष्ट इच्छा ठेवून चालत असतात. १०

चिन्तामपरिमेयां च प्रलयान्तामुपाश्रिताः ।

कामोपभागपरमा एतावदिती निश्चिताः ।। ११

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ।

ईहन्ते कामभोगार्थमन्यायेनार्थसञ्चयान् ।। १२

प्रलय होईपर्यंत जिचा अंत होणार नाही अशा अपार चिंतेचा आधार घेऊन विषयोपभोमागे पडणारे 'भोगच सर्व काही आहे' अशी निश्चित धारणा असणारे, आशाजालात फसलेले, कामी आणि क्रोधी शेकडो लोक विषयोपभोगाकरिता अन्यायाने द्रव्यसंचय करू इच्छितात. ११, १२

इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ।

इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ।। १३

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ।

ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ।। १४

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ।

यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ।। १५

अनेकचित्तविभ्रान्ता मोहजालसमावृताः

प्रसक्ताः कामभोगेषु पतन्ति नरकेऽशुचचौ ।। १६

आज मी हे मिळवले आणि उद्या इतके धन माझ्याजवळ होईल, या शत्रूला मी मारले आणि आता इतर शत्रूंनाही मी मारून टाकेन, मी सर्वसंपन्न आहे, भोगी आहे, सिद्ध आहे. बलवान आहे आणि मी सुखी आहे, श्रीमंत आहे, कुलीन आहे. माझ्यासारखा या जगात कोण आहे? मी यज्ञ करेन, दान देईन, आनंदाचा उपभोग घेईन - अशा प्रकारे अज्ञानाने मूढ झालेले लोक खुश होत असतात आणि विविध भ्रमांत पडून, मोहजालात फसून, विषयोपभोगात लीन होऊन अशुभ नरकात पडत असतात. १३, १४, १५, १६

आत्मसम्भाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।

यजन्ते नामयज्ञैस्ते दम्भेनाविधिपूर्वकम् ।। १७

स्वतःच स्वतःला महान समजणारे, धन आणि मोठेपणात मग्न असलेले हे हट्टी लोक वैधतेचा विचार न करता दांभिकपणाने केवळ नावाकरिता यज्ञ करत असतात. १७

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।

मामात्मपरदेहेषु प्रद्विषन्तोऽभ्यसूयका ।। १७

अहंकार, बळ, मोठेपणा, काम आणि क्रोध यांचा आधार घेणारे, निंदा करणारे तसेच त्यांच्या आणि इतरांमध्ये वसलेल्या माझ्या हे लोक द्वेष करत असतात. १८

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ।

क्षिपाम्यजस्त्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ।। १९

त्या नीच, द्वेषी, क्रूर आणि अमंगल नराधमांना या जगातील आसुरी योनीतच मी वारंवार टाकत असतो. १९

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।

मामप्राप्यैव कोन्तेय ततो यान्त्यधमा गतिम् ।। २०

हे कौंतेय, प्रत्येक जन्मात आसुरी योनी मिळाल्यामुळे आणि मी न मिळाल्यामुळे या लोकांची अजूनच अधोगती होत असते. २०

४९

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।

कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।। २१

काम, क्रोध आणि लोभ ही आत्म्याचा नाश करणारी नरकाची तिहेरी दारे आहेत. यामुळे माणसाने या तिघांचाही त्याग केला पाहिजे. २१

एतैर्विमुक्तः कौन्तेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ।

आचरत्यातमनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ।। २२

हे कौंतेय, नरकाच्या तिहेरी दारांपासून दूर राहणारा माणूस आत्म्याचे कल्याण करतो आणि परम गती मिळवतो. २२

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्ते कामकारतः ।

न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ।। २३

जो माणूस शास्त्रविधी सोडून भोगांमध्ये लडबडलेला असतो त्याला ना तर सिद्धी प्राप्त होते ना सुख. त्याला परमगतीही प्राप्त होत नाही. २३

टीप - इथे शास्त्रविधीचा अर्थ धर्मशास्त्रात सांगितलेल्या विविध क्रिया नसून अनुभवी, ज्ञानी सत्पुरुषांनी सांगितलेला संयमाचा मार्ग आहे.

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।

ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ।। २४

यामुळे कार्य आणि अकार्य यांच्यासंबंधी निर्णय घेताना तू शास्त्रप्रामाण्य मान्य केले पाहिजे. शास्त्रविधी काय आहे हे समजून घेऊन तू काम केले पाहिजे. २४

टीप - वर जो शास्त्राचा अर्थ सांगितला आहे तोच इथे गृहीत धरला पाहिजे.

या श्लोकाचा आशय हा आहे की आपापला कायदा बनवून कोणी स्वेच्छाचारी व्हायला नको, तर धर्मातील अनुभवी पुरुषांचे वचन प्रमाण मानायला पाहिजे.

ॐ तत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्णार्जुन संवाद असलेला 'दैवासुरसंपदायोग' नावाचा सोळावा अध्याय इथे समाप्त होतो.

१७. श्रद्धात्रयविभागयोग

शास्त्रांना म्हणजेच शिष्टाचारांना प्रमाण मानले पाहिजे. हे ऐकल्यानंतरही माणूस शिष्टाचारांना प्रमाण मानत नसेल, परंतु श्रद्धापूर्वक आचरण करत असेल तर त्याला कोणती गती मिळेल अशी शंका अर्जुनाच्या मनात निर्माण झाली. या शंकेचे उत्तर देण्याचा प्रयत्न या अध्यायात करण्यात आला आहे. परंतु शिष्टाचाररूपी द्वीपस्तंभ सोडल्यानंतर जी श्रद्धा शिल्लक राहते तिच्यात अनेक धोके शिल्लक राहतात हे दाखवून भगवान श्रीकृष्णाने समाधान मानले आहे. आणि यामुळेच श्रद्धा आणि तिच्या आधारे होणारे यज्ञ. तप, ज्ञान उत्यादींचे त्याने गुणानुसार तीन विभाग केले आहेत, आणि अखेरीस ॐ, तत, सतचा महिमा त्यात गाईला आहे.

५०

अर्जुन उवाच -

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।

तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ।। १

हे कृष्णा, जो माणूस शास्त्रविधी म्हणजे शिष्टाचार सोडून केवळ श्रद्धेने पूजा, उपासना वगैरे करत असतो त्याची वृत्ती कशी आहे असे समजले जाईल? सात्त्विक, राजसी की तामसी? १

श्री भगवान उवाच -

त्रिविधा भवन्ति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।

सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रृणु ।। २

माणसाची त्याच्या स्वभावाप्रमाणे तीन प्रकारची श्रद्धा असते. सात्त्विक, राजस आणि तामस. ते तू ऐक - २

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।

श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्ध स एव सः ।। ३

हे भारत प्रत्येकाची श्रद्धा त्याच्या स्वतःच्या प्रकृतीचे - स्वभावाचे अनुसरण करत असते. माणसात कोणत्या ना कोणत्या प्रकारची श्रद्धा असतेच. जशी ज्याची श्रद्धा तसाच तो होतो. ३

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।

प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ।। ४

सात्त्विक माणसे देवाची भक्ती करतात, राजसी माणसे यक्षांची आणि राक्षसांची पूजा करतात आणि तामसी माणसे भूतप्रेतांची पूजा करतात. ४

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः ।

दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ।। ५

कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः

मा चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ।। ६

दांभिक आणि अहंकारी तसेच काम आणि राग यांच्या शक्तीने प्रेरित झालेले जे लोक शास्त्रीय विधिविरहित जे घोर तप करतात ते मूढ लोक विद्यमान असलेल्या पंचमहाभूतांना आणि अंतःकरणात वसलेल्या मलाही कष्ट पोहोचवतात. अशा लोकांची निष्ठा आसुरी असते असे तू समज. ५, ६

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ।

यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं श्रृणु ।। ७

आहारसुद्धा माणसांना तीन प्रकारचा प्रिय असतो. याचप्रमाणे तीन प्रकारचे यज्ञ, तप आणि दानही माणसांना प्रिय असतात. आता तू यांच्यातील भेद ऐक. ७

आयुः सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ।

रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ।। ८

आयुष्य, सात्त्विकता, शक्ती, स्वास्थ्य, सुख, आणि रुची वाढवणारे रसपूर्ण, स्निग्ध, पोषक आणि मनाला समाधान देणारा आहार सात्त्विक लोकांना प्रिय असतो. ८

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।

आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ।। ९

तिखट, आंबट, कडू, अतिशय गरम, अतिशय चटपटित, शुष्क आणि शरीरात आग उत्पन्न करणारा आहार राजस लोकांना प्रिय असला (असे असले तरी) तरी तो दुःख, शोक आणि रोग उत्पन्न करणारा असतो. ९

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।

उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ।। १०

तासंतास पडून असलेले, बिघडलेले, वास येणारे, रात्रीचे शिळे, उष्टे, अपवित्र जेवण तामसी लोकांना आवडत असते. १०

अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।

यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ।। ११

फलाशेशिवाय विधिपूर्वक कर्तव्य समजून एकाग्र आणि स्थिर चित्ताने करण्यात आलेला यज्ञ सात्त्विक असतो. ११

अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।

इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ।। १२

हे भरतश्रेष्ठ, जो यज्ञ फळाच्या उद्देशाने आणि दांभिकपणे करण्यात येतो तो राजसी असतो असे तू समज. १२

विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।

श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ।। १३

ज्या यज्ञात विधी नसतो, अन्नची उत्पत्ती आणि तृप्ती नसते, मंत्र नसतो, त्याग नसतो आणि श्रद्धा नसते त्याला तामसी यज्ञ म्हणतात. १३

देवद्विजगुरूप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।

ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्चते ।। १४

देव, ब्राह्मण, गुरू यांची पूजा तसेच पावित्र्य, सरळपणा, ब्रह्मचर्य आणि अहिंसा यांना शारीरिक तप म्हणतात. १४

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।

स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्चते ।। १५

कुणालाही दु:ख होणार नाही असे सत्य, प्रिय आणि हितकारी वचन आणि धर्मग्रंथांचे अध्ययन यांना वाचिक तप म्हणतात. १५

मन:प्रसादः सौम्यत्वं मौनमात्यविनिग्रहः ।

भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्चते ।। १६

मनाची प्रसन्नता, सौम्यपणा, मौन, आत्मसंयम आणि भावना यांची शुद्धी यांना मानसिक तप म्हणतात. १६

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधम नरैः ।

अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ।। १७

समभावी पुरुष जेव्हा फलाशेचा त्याग करतो, परम श्रद्धेने वरील तीन प्रकारचे तप करतो तेव्हा बुद्धिमान लोक त्याला सात्त्विक तप म्हणतात. १७

सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।

क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम ।। १८

जे तप सत्कार, मान आणि पूजेकरिता दांभिकपणे केले जाते त्या अस्थिर आणि अनिश्चित तपाला राजस तप म्हणतात. १८

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।

परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ।। १९

जे तप त्रास सहन करून दुराग्रहाने इतरांच्या नाशाकरिता केले जाते त्याला तामस तप म्हणतात. १९

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।

देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम् । २०

दान देणे योग्य आहे अशा समजुतीने आणि मोबदल्याच्या अपेक्षेशिवाय काळ आणि पात्र पाहून जे दान दिले जाते त्याला सात्त्विक ज्ञान म्हणतात. २०

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ।

दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ।। २१

जे दान मोबदल्याच्या अपेक्षेने किंवा फलाशेने दुःखी अंतःकरणाने केले जाते त्याला राजसी दान म्हणतात. २१

आदेशकाले यद्दानमपात्रेभेश्च दीयते ।

अस्त्कृतंवज्ञातं तत्तामसमुदाहृतम ।। २२

जे दान अस्थानी, कुवेळी आणि अपात्राला सन्मानाशिवाय, तिरस्कृत भावनेने केले जाते त्या दानाला तामसी दान म्हणतात. २२

५१

ॐतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधा स्मृतः ।

ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ।। २३

ब्रह्माचे वर्णन ' ॐ, तत, सत' अशा प्रकारे तीन प्रकारांनी करण्यात आले आहे आणि त्याच्याकडून सृष्टीच्या आरंभी ब्राह्मण, वेद आणि यज्ञ यांची रचना झाली होती. २३

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।

प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ।। २४

याच कारणामुळे ब्रह्मवादी लोकांच्या यज्ञ, दान आणि तपरूपी क्रिया नेहमी ॐचा उच्चार करून विधिवत होत असतात. २४

तदित्यनभिसन्धाय फलं यज्ञतपःक्रियाः ।

दानक्रियाश्य विविधाः क्रियन्ते मोक्षकाङ्क्षिभिः ।। २५

याशिवाय मोक्षाची अभिलाशा ठेवणारी माणसे 'तत्'चा उच्चार करून फलाशा न ठेवता, यज्ञ, तप आणि दानरूपी विविध प्रकारच्या क्रिया करतात. २५

सद्भावे साधुभावे च सदित्येप्रयुज्यते ।

प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ।। २६

सत्य आणि कल्याण या अर्थाने सत् या शब्दाचा प्रयोग होत असतो. आणि हे पार्थ शुभ कामांमध्येसुद्धा सत् शब्दाचा उपयोग होत असतो. २६

यज्ञे तपसि ज्ञाने च स्थितिः सदिती चोच्यते ।

कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधियते ।। २७

यज्ञ, तप आणि ज्ञानासंबंधीच्या निर्धारालाही सत् असे म्हणतात. यांच्याकरिताच कर्म आहे अशा संकल्पालाही सत् म्हणत असतात.

टीप - वरील तीन श्लोकांचा भावार्थ असा आहे. - ॐ हेच सत् आहे, सत्य आहे. यामुळे प्रत्येक कर्म ईश्वरार्पण करूनच केले पाहिजे. त्याला अर्पण केलेले कर्मच फलदायी होते.

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।

असदित्युच्चते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ।। २८

हे पार्थ, यज्ञ, दान, तप आणि अशीच जी इतर कामे श्रद्धेशिवाय केली जातात त्यांना असत् म्हणतात. त्यांच्यामुळे ना तर या लोकात लाभ होतो ना परलोकात. २८

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्णार्जुन संवाद असलेला 'श्रद्धात्रयविभागयोग' नावाचा सतरावा अध्याय इथे समाप्त होतो.

१८. संन्यासयोग

हा अध्याय उपसंहाराच्या स्वरूपाचा आहे. असे समजले जाईल. या अध्यायाचा तसेच गीतेचा प्रेरक मंत्र 'सर्व धर्मांचा त्याग करून तू मला शरण ये', हाच खरा संन्यास आहे असे म्हटले जाईल. परंतु सर्व धर्मांचा त्याग सर्व कर्मांचा त्याग नाही. परोपकाराची कामेही ईश्वरार्पण केली पाहिजे आणि फलाशा सोडली पाहिजे. हेच सर्वात श्रेष्ठ कर्म आहे. हाच सर्वधर्मत्याग अथवा संन्यास आहे.

५२

अर्जुन उवाच -

सन्नासस्य महाबाहो तत्त्वमिच्छावेदितुम ।

त्यागस्थ च हृषिकेश पृथक्केशिनिषूदन ।।

अर्जुन म्हणाला हे महाबाहो, हृषिकेषा, कैषिदैत्यांतिका मी संन्यास आणि त्याग शब्दाचा खरा अर्थ जाणू इच्छितो.

श्री भगवान उवाच -

काम्यानांकर्मणा न्यासं सन्न्यासं कवयो विदुः ।

सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ।। २

कामनांपासून म्हणजे काम्य कर्मांपासून निर्माण होणाऱ्या कर्माच्या त्यागाला ज्ञानीलोक संन्यास म्हणून ओळखतात. सर्व कर्मांच्या त्यागाला बुद्धिमान लोक त्याग म्हणतात. २

त्याज्यं दोषवदित्येके कर्मप्राहुर्मनीषिणः ।

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिती चापरे ।। ३

काही विचारवंत पुरुष म्हणतात की सर्व कर्म दोषयुक्त असतात आणि यामुळे ती त्याज्य असतात. इतर काही म्हणतात की यज्ञ, दान, तप इत्यादी कर्म त्याग करण्यासारखे नाहीत. ३

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ।

त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ।। ४

हे भरतसत्तम, या त्यागासंबंधी तू माझा निर्णय ऐक - हे पुरुषव्याघ्र, त्याग तीन प्रकारचा असतो असे म्हणतात. ४

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ।

यज्ञो दानं तपश्चैव पावनानी मनीषिणाम् ।। ५

यज्ञ, दान आणि तपरूपी कर्म त्यागण्या योग्य नाहीत, करण्या योग्य आहेत. यज्ञ, दान आणि तप विवेकी माणसाला पावन करत असतात. ५

एतान्यपि तू कर्माणि सङ्गं त्यक्त्वा फलानि च ।

कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम ।। ६

हे पार्थ, ही कर्मेसुद्धा आसक्तिविरहित होऊन फलत्यागाच्या भावनेने केली पाहिजे असे माझे निश्चित आणि उत्तम मत आहे. ६

नियतस्य तू सन्न्यासः कर्मणो नोपपद्यते ।

मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ।। ७

नियत कर्मांचा त्याग उचित नाही. मोहवश होऊन जर यांचा त्याग केला तर तो त्याग तामस आहे असे समजले जाईल. ७

दु:खमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ।

स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लाभेत ।। ८

जो माणूस एखाद्या कर्माचा त्याग ते दु:खकारक आहे असे समजून करतो व ते कर्म करताना होणाऱ्या शारीरिक कष्टाच्या भीतीमुळे तो त्या कर्माचा त्याग करत असेल तर तो त्याग राजस असतो आणि म्हणून त्याला त्या कर्मत्यागाचे फळ मिळत नाही. ८

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ।

सङ्गमत्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्त्विको मतः ।। ९

हे अर्जुना, केलेच पाहिजे असे समजून आसक्ती आणि फळ यांच्या त्यागाच्या भावनेने नियत कर्म जेव्हा केले जाते तेव्हा तो त्याग सात्त्विक गणला जातो. ९

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ।

त्यागी सत्त्व समाविष्टो मेघावी छिन्नसंशयः ।। १०

संशयरहित झालेला, शुद्ध भावना असणारा त्यागी आणि बुद्धिमान पुरुष गैरसोयीच्या कामाचा द्वेष करत नाही आणि सोयीस्कर कामांनी प्रसन्न होत नाही. १०

न हि देहभृता शक्यं त्यक्तुंकर्माण्य शेषतः ।

यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ।। ११

सर्व कर्मांचा त्याग करणे देहधारीकरिता शक्य नाही. परंतु जो माणूस कर्मफलाचा त्याग करतो त्याला त्यागी म्हणतात. ११

अनिष्टमिष्टम् मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम ।

भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित ।। १२

त्याग न करणाऱ्या माणसाला मृत्यूनंतर तीन प्रकारचे कर्मफल मिळते. अशुभ, शुभ आणि शुभ-अशुभ. जो माणूस त्यागी (संन्यासी) असतो त्याच्या संबंधात असे कधीही घडत नाही. १२

५३

पञ्चैतानी महाबाहो कारणानि निबोध मे ।

साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्माणम् ।। १३

हे महाबाहो, प्रत्येक कर्माच्या सिद्धाविषयी सांख्यशास्त्रात पाच कारणे सांगितली आहेत. ती तू माझ्याकडून समजून घे. १३

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।

विविधाश्च पृथक्चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम् ।। १४

क्षेत्र, कर्ता, वेगवेगळी साधने, वेगवेगळ्या क्रिया, आणि देव ही ती पाच कारणे आहेत. १४

शरीरवाङ्मनोभिर्यतकर्म प्रारभते नराः ।

न्याय्यं वा विपरितं वा पञ्चैते तस्य हेतवाः ।। १५

शरीराने, वाणीने, अथव मनाने माणूस नीतीनुसार वा नीतीविरोधी जे कोणते कर्म करतो त्याची ही पाच कारणे असतात. १५

तत्त्वै सति कर्तारमात्मानं केवेलं तु यः ।

पश्यत्यकृत बुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ।। १६

असे असतानाही संस्कारविरहित बुद्धीमुळे जो माणूस केवळ स्वतःलाच कर्ता समजतो तो मूढबुद्धी असणारा माणूस असतो. त्याला काहीही कळत नसते. १६

यस्य नाहङ्कृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।

हत्वापि स इमॉंल्लोकान्न हन्ति न निबध्यते ।। १७

ज्या माणसाला (माझ्याप्रमाणे) अहंकाराची भावना नसते त्याची बुद्धी (आसक्तीने) मलीन झालेली नसते. तो या जगाला मारत असतानाही मारत नसतो आणि तो बंधनातही अडकत नाही. १७

टीप - वरवर वाचला असता हा श्लोक माणसाला बुचकळ्यात टाकणारा आहे असे वाटते. गीतेतील अनेक श्लोक काल्पनिक आधार घेणारे आहेत. त्याचे प्रत्यक्ष उदाहरण या जगात आढळू शकत नाही. परंतु उपयोगाकरिता ज्याप्रमाणे भूमितीतील काल्पनिक आकृतीची गरज असते त्याचप्रमाणे धर्माचरणासंबंधीही काल्पनिक आदर्श आवश्यक असतात. यामुळे या श्लोकाचा अर्थ असा केला जाऊ शकतो -

ज्या माणसाने अहंता - अहंकार जाळून भस्मसात केला आहे आणि ज्याच्या बुद्धीत किंचितही मलीनता नाही तो हवे तर सर्व जगाला मारून टाकू शकतो. परंतु ज्याच्यात अहंता नसते त्याला शरीरच नसते. ज्याची बुद्धी

विशुद्ध असते तो त्रिकालदर्शी असतो. असा पुरुष केवळ एक परमेश्वरच असू शकतो. तो कर्म करत असतानाही अकर्ता असतो. वध करत असतानाही अहिंसक असतो. यामुळे माणसाकरिता कुणालाही न मारण्याचा आणि शिष्टाचाराचे - शास्त्राचे पालन करण्याचा एकमेव मार्ग शिल्लक राहतो.

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ।

करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसङ्ग्रहः ।। १८

कर्माच्या प्रेरणेत तीन तत्त्वांचा समावेश असतो - ज्ञान, ज्ञेय आणि परिज्ञाता. अशाच प्रकारे कर्माचेही तीन प्रकारचे भाग असतात - इंद्रिये, कर्ता, आणि क्रिया. १८

टीप - यात विचार आणि आचार यांचे समीकरण आहे. जो माणूस काय करायचे आहे (ज्ञेय) याची रीत (ज्ञान) आधी समजून घेतो तो परिज्ञाता होतो. अशा प्रकारे कर्माची प्रेरणा झाल्यानंतर तो इंद्रियाद्वारे क्रिया करणारा होतो. हाच कर्मसंग्रह आहे.

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ।

प्रोच्यते गुणसङ्ख्याने यथावच्छृणु तान्यपि ।। १९

गुणभेदानुसार ज्ञान, कर्म आणि कर्ता तीन प्रकारचे असतात. गुणगणनेत यांचे जे वर्णन करण्यात आले आहे ते तू ऐक. १९

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ।

अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धी सात्त्विकम् ।। २०

ज्या ज्ञानामुळे माणूस सर्व प्राणिमात्रांकडे एकाच भावनेने पाहतो तसेच विविधतेत एकता पाहतो ते ज्ञान सात्त्विक आहे असे तू समज. २०

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ।

वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ।। २१

(दर्शनी स्वरूपात) वेगवेगळे असल्यामुळे माणूस ज्याप्रमाणे सर्व प्राण्यांना वेगवेगळे पाहतो ते ज्ञान राजस आहे असे तू समज. २१

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन्कार्ये सक्तमहैतुकम् ।

अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ।।२२

ज्या ज्ञानामुळे अकारण एकाच गोष्टीत सर्व काही सामावलेले आहे असे समजून माणूस आसक्त राहतो आणि जे ज्ञान रहस्यहीन आणि तुच्छ असते ते ज्ञान तामस आहे असे म्हणतात. २२

नियतं सङ्गरहितमराग द्वेषतः कृतम् ।

अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्त्विकमुच्यते ।। २३

फलेच्छा, आसक्ती आणि रागद्वेष यांपासून मुक्त होऊन जे नियत कर्म करण्यात येते त्याला सात्विक कर्म म्हणतात. २३

टीप - नियत कर्मचा अर्थ आहे मनाद्वारे इंद्रियांना नियंत्रणात ठेवून करण्यात आलेले कर्म. पाहा टीप, अध्याय ४, श्लोक ८

यत्तूकामेप्सुना कर्म साहङ्कारेण वा पुनः ।

क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ।। २४

भोगेच्छा ठेवणारा माणूस 'मी करतो आहे' या भावनेने घाईगडबडीत शक्तीचा अतिरिक्त उपयोग करून जे काम करतो त्याला राजस कर्म म्हणतात. २४

अनुबन्धं क्षयं हिसामनवेक्ष्य च पौरुषम् ।

मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ।। २५

परिणामांचा, नुकसानाचा, हिंसेचा किंवा आपल्या शक्तीचा विचार न करता मोहवश होऊन माणूस ज्या कामाची सुरुवात करतो त्याला तामस कर्म म्हणतात. २५

टीप - मूळ श्लोकात ‘अनुबंध’ हा जो शब्द आला आहे त्याचा ‘परिणाम’ या शब्दापेक्षा अधिक खोल आशय आहे. ज्या कोणत्या कर्माचा तिथे कुठे प्रत्यक्ष वा परोक्ष संबंध असतो आणि त्यामुळे जे काही प्रभावित होते त्या संपूर्ण विस्ताराला अनुबंध म्हणतात. - द. बा. कालेलकर

मुक्तसंङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योनिर्विकारः कर्ता सात्त्विक उच्चते ।। २६

ज्याच्यात आसक्ती आणि अहंकार नाही, ज्याच्यात निर्धार आणि उत्साह आहे, आणि जो यशापयश, शोक वा दुःख मानत नाही त्याला सात्त्विक कर्ता म्हणतात. २६

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्ष शोकान्विताः कर्ता राजसाः परिकीर्तितः ।। २७

जो रागी असतो, कर्माची इच्छा ठेवणारा असतो, लोभी असतो, हिंसा करणारा असतो, ज्याचे मन मलीन असते आणि जो हर्ष वा शोक करणारा असतो तो राजस कर्ता असतो. २७

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ।
विषादी दीर्घसुत्री च कर्ता तामस उच्चते ।। २८

जो अव्यवस्थित, असंस्कारी, घमेंडी, धूर्त, दुष्ट, क्रूर, आळशी, शोकाकूल आणि दीर्घसूत्री असतो तो तामस कर्ता आहे असे म्हणतात. २८

बुद्धिर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु।
प्रोच्चमानमशेषेण पृथक्त्वेन धनञ्जय ।। २९

हे धनंजय, आता मी तुला गुणानुसार बुद्धी आणि घृतीचे विस्ताराने वेगवेगळे तीन प्रकार सांगतो. ते ऐक - २९

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।
बन्धंमोक्षंच या वेत्ति बद्धिः सा पार्थ सात्त्विकी ।। ३०

प्रवृत्ती आणि निवृत्ती, कार्य आणि अकार्य, भय आणि अभय तसेच बंधन आणि मोक्ष यांच्यातील भेद जी बुद्धी चांगल्या प्रकारे जाणते ती सात्त्विक बुद्धी असते. ३०

यथा धर्मंमधर्मं च कार्य चाकार्यमेव च ।

अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ।। ३१

जी बुद्धी धर्म आणि अधर्मात, कार्य आणि अकार्यात विवेक करत नाही म्हणजे चुकीच्या पद्धतीने विचार करते ती बुद्धी हे पार्थ राजसी असते. ३१

अधर्म धर्ममिती या मन्यते तमसावृता ।

सर्वार्थान्विपरितांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ।। ३२

हे पार्थ, जी बुद्धी अहंकाराने घेरलेली असल्यामुळे अधर्मालाच धर्म समजते आणि सर्व गोष्टींकडे उलट्या दृष्टीनेच पाहते ती बुद्धी तामसी असते. ३२

धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः ।

योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्त्विकी ।। ३३

ज्या एकमेव धृतीने माणूस मन, प्राण आणि इंद्रिये यांच्या क्रिया साम्यबुद्धीने धारण करतो ती धृती हे पार्थ, सात्त्विकी असते. ३३

यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन ।

प्रसङ्गेन फलाकाङ्क्षी धृतिः सा पार्थ राजसी ।। ३४

हे पार्थ, ज्या धृतीमुळे माणूस फलाकांक्षी होऊन धर्म, अर्थ आणि काम यांना आसक्तीने धारण करतो ती धृती राजसी असते. ३४

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ।

न विमुञ्चति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ।। ३५

ज्या धृतीमुळे दुष्टबुद्धीचा माणूस निंदा, भय, शोक, खेद आणि मद यांना सोडू शकत नाही ती धृती हे पार्थ तामसी असते. ३५

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ।

अभ्यासाद्रमते यत्र दु:खान्तं च निगच्छति ।। ३६

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ।

तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ।। ३७

हे पार्थ आता माझ्याकडून तीन सुखांचे वर्णन ऐक -

अभ्यासाने ज्यामुळे माणूस आनंदित होतो, ज्यामुळे त्याच्या दु:खाचा अंत होतो, जे सुख सुरुवातीला विषासमान वाटते परंतु परिणामी अमृतमय असल्याचे सिद्ध होते, आणि जे आत्मज्ञानाच्या प्रसन्नतेतून निर्माण होते त्या सुखाला सात्त्विक म्हणतात. ३६, ३७

विषयेन्द्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ।

परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ।। ३८

विषय आणि इंद्रियांच्या संयोगाने जे सुख सुरुवातीला अमृतासारखे वाटते परंतु परिणामी विषासारखे असल्याचे सिद्ध होते ते सुख राजस आहे असे म्हणतात. ३८

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मना: ।

निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ।। ३९

जे सुख सुरुवातीपासून आणि परिणामांच्या दृष्टीनेही आत्म्याला मोहात टाकणारे असते आणि निंदा, आळस आदी दोषातून निर्माण होते ते तामस असते. ३९

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ।

सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणो ।। ४०

पृथ्वीवर वा स्वर्गातील देवांमध्ये असा एकही प्राणी नाही की जो प्रकृतीपासून निर्माण झालेल्या या गुणांपासून मुक्त असेल. ४०

५४

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परन्तप ।

कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ।। ४१

हे परंतप, ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र यांच्या कर्माचेही स्वभावजन्य गुणांमुळे विभाग करण्यात आले आहेत. ४१

शमो दमस्तपाः शौचं क्षान्तिरार्जवमेव च ।

ज्ञानंविज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ।। ४२

शम, दम, तप, शौच, क्षमा, सरलता, ज्ञान यांच्यातून निर्माण झालेले विज्ञान आणि आस्तिकता ही ब्राह्मणांची स्वभावजन्य कर्मे आहेत. ४२

शौर्य तेजो धतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ।

दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम। ४३

शौर्य, तेज, धृती, दक्षता, युद्धात माघार न घेणे, दान आणि प्रभुत्वशक्ती ही सर्व क्षत्रियाची स्वभावजन्य कर्मे आहेत. ४३

कृषिगौरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ।

परिचर्यात्मकं कर्म शुद्रस्यापि स्वभावजम् ।। ४४

शेती, गोरक्षण आणि व्यापार ही वैश्याची स्वभावजन्य कर्मे आहेत, आणि शुद्रांची स्वभावजन्य कर्म सेवाचाकरी आहे. ४४

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।

स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ।। ४५

आपापल्या कर्मात रत राहिल्यामुळे माणसाला मोक्षप्राप्ती होते. आपल्या कर्मात रत राहिल्यामुळे माणसाला मोक्ष कसा मिळतो हे तू आता ऐक. ४५

यतः प्रवृत्तीर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।

स्वकर्मणा तमभर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।। ४६

ज्यामुळे प्राण्यांची प्रवृत्ती चालते, ज्याने हे संपूर्ण विश्व व्याप्त आहे त्या परमेश्वराची जो माणूस आपल्या कर्माद्वारे भक्ती करतो त्याला मोक्ष प्राप्त होतो. ४६

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात ।

स्वभावनियतं कर्म कुर्वान्नाप्नोति किल्बिषम ।। ४७

परधर्म सोपा असला तरी गुणरहित स्वधर्म त्यापेक्षा अधिक चांगला असतो. स्वभावाप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या कर्मामुळे माणसाला पाप लागत नाही. ४७

टीप - स्वधर्माचा अर्थ आहे आपले कर्तव्य. गीतेचा मध्यबिंदू आहे कर्मफलत्याग. आणि स्वधर्माऐवजी माणूस जेव्हा दुसरे कर्म शोधतो तेव्हा फलत्यागाला अवकाशच राहत नाही. यामुळे स्वधर्म श्रेष्ठ आहे असे म्हटले आहे. सर्व धर्मांचे फळ त्यांच्या पालनात असते.

सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत ।

सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।। ४८

हे कौंतेय, सहजप्राप्त कर्म दोषपूर्ण असले तरी ते सोडायला नको. ज्याप्रमाणे आगीबरोबर धूर असतो त्याचप्रमाणे प्रत्येक कर्माला दोष हा लागलेलाच असतो. ४८

असक्तबुद्धीः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ।

नैष्कर्म्यसिद्धिं परमा सन्न्यासेनाधिगच्छति ।। ४९

ज्या

ने आपल्या आसक्तीला चोहोकडून ओढून घेतले आहे, ज्याने कामनांचा त्याग

केला आहे, ज्याने स्वार्थावर विजय मिळवला आहे तो माणूस संन्यासाद्वारे नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त करतो. ४९

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ।

समासेनैव कौन्तेय निष्ठा ज्ञानस्य या परा ।। ५०

हे कौंतेय, ही सिद्धी प्राप्त केल्यानंतर माणूस ब्रह्मपद कसे मिळवतो हे तू आता माझ्याकडून संक्षेपात ऐक. ज्ञानाची हीच परमोच्च अवस्था आहे. ५०

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।

शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ।। ५१

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।

ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रिताः ।। ५२

अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ।

विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते ।। ५३

ज्याची बुद्धी शुद्ध झालेली असते असा योगी निर्धाराने स्वतःवर विजय मिळवून शब्दरूपरस इत्यादी विषयांचा त्याग करून, रागद्वेषांना जिंकून, एकांताचे सेवन करून, आहार अल्प करून, वाणी, शरीर आणि मनाला संयमात ठेवून, ध्यानयोगात सदैव मग्न राहून, वैराग्याचा आधार घेऊन, अहंकार, बल, दर्प, काम, क्रोध आणि परिग्रह यांचा त्याग करून तसेच ममतारहित आणि शांत होऊन ब्रह्मभाव प्राप्त करण्यायोग्य होतो. ५१, ५२, ५३

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ।

समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ।। ५४

अशा प्रकारे ब्रह्मभाव प्राप्त झालेला प्रसन्नचित्त माणूस ना तर शोक करतो ना कोणत्याही गोष्टीची इच्छा करतो. भूतमात्रांबद्दल समभाव ठेवून तो माझ्या परमभक्तीकरिता पात्र होत असतो. ५४

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ।

ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ।। ५५

मी किती महान आहे आणि मी कोण आहे ही गोष्ट त्याला भक्तीद्वारे यथार्थपणे कळलेली असते, आणि अशा प्रकारे माझे यथार्थ रूप कळल्यानंतर तो माझ्यात प्रवेश करतो. ५५

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयाः ।

मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ।। ५६

माझा आश्रय घेणारा माणूस सदैव सर्व कर्म करत असतानाही माझ्या कृपेमुळे शाश्वत, अव्यय, पद प्राप्त करत असतो. ५६

५५

चेतसा सर्वकर्माणि मयि सन्न्यस्य मत्परः ।

बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ।। ५७

मनाने सर्व कर्मे मला समर्पित करून, माझ्यात लीन होऊन, विवेकबुद्धीचा आधार घेऊन तू सदैव माझ्यात चित्त लावून ठेव. ५७

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ।

अथ चेत्वमहङ्कारात्र श्रोष्यसि विनङ्क्ष्यसि ।। ५८

माझ्यात चित्त लावल्यामुळे माझ्या कृपेने अडचणींरूपी सर्व पर्वत तू सहजपणे ओलांडू शकशील. परंतु अहंकाराला वश होऊन तू माझे ऐकणार नसशील तर तुझा नाश होईल. ५८

यदहङ्कारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ।

मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ।। ५९

अहंकाराला वश होऊन 'मी युद्ध करणार नाही' असे जर तू ठरवलेस तर तुझा तो निश्चय व्यर्थ असेल, कारण तुझा स्वभावच तुला युद्धाकडे बळजबरीने ओढत घेऊन जाईल. ५९

स्वभावजेन कौन्तेय निबद्धः स्वेन कर्मणा ।

कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ।। ६०

हे कौंतेय, तुझ्या स्वभावजन्य कर्माने बांधलेला तू जरी मोहवश होऊन कार्य करू इच्छित नसशील तरी विवश होऊन तुला कार्य करावेच लागेल. ६०

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।

भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारूढानि मायया ।। ६१

हे अर्जुना, ईश्वर सर्व प्राण्यांच्या अंतःकरणात वास करत असतो आणि आपल्या मायेच्या शक्तीने कुंभाराच्या चाकाप्रमाणे त्यांना गोलगोल फिरवत असतो. ६१

तमेव शरण गच्छ सर्वभावेन भारत ।

तत्प्रसादात्परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।। ६२

हे भारत, तू अंतःकरणापासून त्याचाच आधार घे. त्याच्या कृपेमुळे तू परम शांतिमय अमरपद प्राप्त करशील. ६२

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।

विमृश्यैतदशेषेण यथेच्छसी तथा कुरू ।। ६३

अशा प्रकारे मी तुला हे गूढाहून गूढ ज्ञान सांगितले आहे. यावर विचार करून तू तुला योग्य वाटेल तसे कर. ६३

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ।

इष्टोऽसि मे दृढमिती ततो वक्ष्यामि ते हितम् ।। ६४

याशिवायही सर्वाधिक रहस्यपूर्ण माझे वचन तू आता ऐक. तू मला अतिशय प्रिय असल्यामुळे तुझ्या हिताची गोष्ट आता मी तुला सांगतो. ६४

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।

मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ।। ६५

तू माझ्यात मग्न हो. माझा भक्त हो. माझ्याकरिता यज्ञ कर. मला प्रणाम कर. तू मलाच मिळवशील हे माझे सत्य प्रतिज्ञेवर वचन आहे. ६५

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।

अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामीमा शुचः ।। ६६

सर्व धर्मांचा त्याग करून तू मलाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. तू शोक करू नकोस. ६६

५६

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।

न चाशुश्रूषवे वाच्य न च मां योऽभ्यसूयति ।। ६७

जो माणूस तपस्वी नाही, जो भक्त नाही, ज्याची ऐकण्याची इच्छा नाही, आणि जो माझा द्वेष अथवा ईर्षा करतो त्याला तू हे (ज्ञान) कधीही सांगू नकोस. ६७

य इमं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यस्ति ।

भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ।। ६८

परंतु हे अतिशय गूढ ज्ञान जो माझ्या परम भक्तांना देईल तो माझी परम भक्ती केल्यामुळे निश्चितपणे मला मिळवील. ६८

न च तस्मानमनष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ।

भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ।। ६९

माणसांमध्ये त्याच्यापेक्षा मला कोणीही अधिक प्रिय सेवक नाही आणि या पृथ्वीवर त्याच्यापेक्षा अधिक प्रिय मला कोणी होणारही नाही. ६९

टीप - इथे सांगण्याचा आशय हा आहे की या ज्ञानाचा ज्याने अनुभव घेतला आहे तोच हा अनुभव दुसऱ्याला देऊ शकतो. केवळ शुद्ध उच्चारण करून इतरांना हे ज्ञान सांगण्याकरिता वरील दोन श्लोक नाहीत.

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ।

ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ।। ७०

आपल्यामधील या धार्मिक आणि पवित्र संवादाचा जो माणूस अध्ययन करील तो माझी ज्ञानयज्ञाद्वारे भक्ती करील असे माझे मत आहे. ७०

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ।

सोऽपि मुक्तः शुभॉंल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ।। ७१

याशिवाय जो माणूस द्वेषरहित होऊन श्रद्धापूर्वक केवळ हा संवाद ऐकेल तोसुद्धा पापमुक्त होऊन तो शुभलोक मिळवील जिथे पुण्यवान लोक राहतात. ७१

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ।

कच्चिदज्ञानसम्मोहः प्रनष्टस्ते धनञ्जय ।। ७२

हे पार्थ, हे सर्व तू एकाग्र चित्ताने ऐकले आहेस काय? हे धनंजय, अज्ञानामुळे तुला जो मोह झाला होता तो नाहीसा झाला काय? ७२

अर्जुन उवाच -

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ।

स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।। ७३

हे अच्युत, तुझ्या कृपेमुळे माझा मोह नष्ट झाला आहे. मला परत शहाणपण सुचले आहे. शंकासमाधान झाल्यामुळे मी आता स्वस्थ झालो आहे. तू सांगितल्याप्रमाणेच मी वागेन. ७३

संजय उवाच -

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ।

संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ।। ७४

अशा प्रकारे वासुदेव आणि महात्मा अर्जुन यांच्यामध्ये झालेला रोमांचित करणारा अद्भुत संवाद मी ऐकला. ७४

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ।

योगं योगेश्वरात्कृष्णात्क्षात्कथयतः स्वयम् ।। ७५

व्यासांच्या कृपेने योगेश्वर कृष्णाच्या मुखातून मी हा रहस्यमय परमयोग ऐकला. ७५

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ।

केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ।। ७६

हे राजन, केशव आणि अर्जुन यांच्यामध्ये झालेला हा अद्भुत संवाद आठवून मी अतिशय आश्चर्यचकित झालो आहे. आणि मी सारखा हर्षभरित होतो आहे. ७६

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।

विस्मयो मे महान् राजन्हृष्यमि च पुनः पुनः ।। ७७

आणि हे राजन, हरीचे ते अद्भुत रूप आठवता आठवता मी आश्चर्यचकित होतो आणि वारंवार आनंदविभोर होतो. ७७

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर ।

तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिमीतिर्मम ।।७८

माझे स्पष्ट मत आहे की जिथे योगेश्वर कृष्ण आहे आणि धनुर्धारी अर्जुन आहे तिथे श्री आहे, विजय आहे, वैभव आहे आणि अविचल नीती आहे. ७८

टीप - योगेश्वर कृष्ण म्हणजेच अनुभवसिद्ध शुद्ध ज्ञान आणि धनुर्धारी अर्जुन म्हणजेच त्या ज्ञानानुसार होणारी क्रिया. या दोघांचा जिथे संगम होतो तिथे संजयने सांगितल्यापेक्षा दुसरा काय परिणाम होऊ शकतो?

ॐतत्सत

श्री भगवान श्रीकृष्णांनी गायीलेल्या उपनिषदातील ब्रह्मविद्या आणि योगशास्त्र असलेली ही जी गीता आहे तिच्यातील श्रीकृष्णार्जुन संवाद असलेला 'संन्यायोग' नावाचा अठरावा अध्याय इथे समाप्त होतो.

* * * * *